# ‘‘मारूतराव घुले पाटील यांचे अहमदनगर जिल्ह्यातील सहकार व राजकीय क्षेत्रातील योगदान’’

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

सामाजिक शास्त्रे विद्याशाखा अंतर्गत राज्यशास्त्र विषयात

विद्यानिष्णात (एम.फिल) पदवीकरिता सादर केलेला लघु—शोधप्रबंध


**संशोधक**

**सोपान बाळासाहेब नवथर**

**मार्गदर्शक**

**प्रा. डॉ. नीता बोकील**

राज्यशास्त्र विभाग प्रमुख,

एच. व्ही. देसाई महाविद्यालय, पुणे.


**(२०१६)**

## प्रतिज्ञापत्र

मी प्रतिज्ञापूर्व घोषित करतो की, **''मारूतराव घुले पाटील यांचे अहमदनगर जिल्ह्यातील सहकार व राजकीय क्षेत्रातील योगदान''** हा संशोधन विषय मी प्रा. डॉ. नीता बोकील यांच्या मार्गदर्शनाखाली केलेल्या प्रत्यक्ष कार्यावर आधारीत आहे. या सशोधनासाठी इतर व्यक्ती, संस्थांनी केलेले कार्य आणि इतर स्त्रोतांकडून मिळालेल्या माहितीचा निर्देश संदर्भसूची मध्ये करण्यात आलेला आहे. संशोधक या नात्याने असेही घोषित करतो की, ही माहीती इतर कोणत्याही परीक्षेसाठी सादर केलेली नाही.

ठिकाण : पुणे

दिनांक : ३० मार्च २०१६

संशोधक

(सोपान बाळासाहेब नवथर)

# मार्गदर्शकाचे प्रमाणपत्र

मी असे प्रमाणित करते की, प्रस्तुत लघुप्रबंध हे सोपान बाळासाहेब नवथर यांचे स्वत:चे लेखन असून ते माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केलेले आहे. प्रस्तुत संशोधनासाठी वापरलेल्या साधनांचा योग्य तो श्रेयनिर्देश त्यांनी केलला आहे. टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या एम.फिल. (राज्यशास्त्र) या पदवीच्या पूर्ततेसाठी हा लघुप्रबंध सादर करण्यात येत आहे.

सदर लघु—शोधप्रबंधामध्ये त्यांनी नमूद केलेली माहिती व संशोधनात्मक विधाने ही माझ्या माहितीप्रमाणे बरोबर आहेत. सदर माहिती त्यांनी इतरत्र कोठेही वापरलेली नाही.

ठिकाण : पुणे

दिनांक : ३० मार्च २०१६

मार्गदर्शक

(डॉ. नीता बोकील)

# ऋणनिर्देश

''मारूतराव घुले पाटील यांचे अहमदनगर जिल्ह्यातील सहकार व राजकीय क्षेत्रातील योगदान'' या विषयावर लघु संशोधनासाठी मान्यता दिल्याबद्दल संशोधक या नात्याने टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे यांचा ऋणी आहे.

प्रस्तुत प्रबंध अभ्यास आणि लेखनासाठी मार्गदर्शक म्हणुन आदरनीय गुरूवर्य प्रा. डॉ. नीता बोकील (एच. व्ही. देसाई महाविद्यालय, पुणे) यांचे अनमोल मार्गदर्शन लाभले. सतत माझ्यासाठी आवर्जून वेळ काढून चर्चा करणे, संदर्भ ग्रंथांची माहीती व ते मिळवून देणे, वेळोवेळी चर्चा करणे, आत्मियतेने कामातील प्रगती पाहणे अशा प्रकारे काम पूर्ण होण्यासाठी त्यांनी विविधांगी मार्गदर्शन केले. याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे. तसेच मला कायम प्रोस्ताहन देवून माझ्या कामात जातीने लक्ष घालून कामाची प्रगती व लेखण पध्द्तीतील महत्वाच्या चुका शोधून त्या लक्षात आणून दिल्या याबद्दल टि.म. वि. चे राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. माणिकराव सोनवणे यांचाही मी अत्यंत ऋणी आहे.

कोणतेही काम वा यश हे कोणत्याही एका व्यक्तिचे नसते त्यामध्ये अनेकांचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष वाटा असतोच. याप्रमाणे मला प्रस्तुत प्रबंध पुर्ण करण्यासाठी अनेकांचे सहकार्य लाभले, यामध्ये सर्वप्रथम माझ्या आई—वडिलांचे ऋण व्यक्त करेल. त्याच बरोबर मला कायमच सहकार्य करणारे माजी आमदार मा. नरेंद्रजी घुले पाटील, ज्ञा.स.सा.का. चे चेअरमन मा. चंद्रशेखर घुले पाटील तसेच जिल्हा सहकारी बॅकेचे माजी अध्यक्ष मा. गुलाबराव घुले पाटील, श्री. ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याचे जनरल व्यवस्थापक काकासाहेब शिंदे, प्रशासकीय अधिकारी कारभारी गायके, कार्यकारी संचालक अनिल शेवाळे, दत्तात्रय गडाख, दिलीप नवथर, सकाहरी घुले पाटील तसेच कारखान्याचे सर्वच पदाधिकारी यांचेही ऋण व्यक्त करणे मी माझे आद्यकर्तव्य मानतो.

या विषयावर संशोधन करण्यासाठी ज्यांनी मला मोलाचे सहकार्य व मार्गदर्शन केले असे माझे आजोबा लक्ष्मण बाबा नवथर, माझे गुरूवर्य न्यु आर्टस् कॉलेजचे प्राचार्य डॉ. लक्ष्मणराव मतकर, उपप्राचार्य रावसाहेब कासार, प्रा. पुरूषोत्तम कुंदे, प्रा. संदीप मिरे, प्रा. अनिता आढाव, प्रा. संजय चव्हाण, प्रा. किसनराव चव्हाण (राज्य प्रवक्ते, भारतीय टायगर फोर्स), प्रा. गणेश शेळके रांजणीचे सरपंच अरूण थोरात, रामभाऊ शिदोरे यांचाही मी अत्यंत ऋणी आहे.

वरिल सर्वांच्या सहकार्याने मी हा प्रबंध पुर्ण करू शकलो. या बहुमोल सहकार्याबद्‌दल मी सर्वांचे पुनश्च: आभार मानतो.

संशोधक

सोपान बाळासाहेब नवथर

## तक्ता सूची


| तक्ता. क्रं | नाव | पृष्ठ क्रं |
|---|---|---|
| १.१ | १९५७ ची विधानसभा निवडणूक | ५ |
| १.२ | १९५७ ची लोकसभा निवडणूक | ५ |
| १.३ | सांसद आदर्श ग्राम योजनेतील गावे | १७ |
| १.४ | अहमदनगर जिल्हा विशेष | १८ |
| १.५ | लोकसभा मतदार संघ ३७ | २० |
| १.६ | लोकसभा मतदार संघ ३८ | २० |
| ३.१ | विधानसभा निवडणूक १९६२ | ७३ |
| ३.२ | विधानसभा निवडणूक १९६७ | ७६ |
| ३.३ | विधानसभा निवडणूक १९७२ | ७८ |
| ३.४ | विधानसभा निवडणूक १९९० | ८० |
| ४.१ | नियुक्त संचालक मंडळ : १९५८ | ९९ |
| ४.२ | मारूतरावांचा जिल्हा बॅकेतील कार्यकाल | १०० |
| ४.३ | ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना चेअरमन | १०४ |
| ४.४ | कारखाना कामकाज सर्वसाधारण माहिती | १०७ |
| ४.५ | पहिले नियुक्त संचालक मंडळ, श्री. दत्त पाणी पुरवठा सह. संस्था मर्या, दहिगाव—ने | ११५ |
| ४.६ | पाणी पुरवठा सहकारी संस्था | ११६, ११७ |
| ५.१ | जनता शिक्षण प्रसारक मंडळाची विद्यालये | १२९ |
| ५.२ | मारूतराव घुले पाटील शिक्षण संस्थेचे विद्यालये | १३० |

## अनुक्रमणिका


| अ.क्र | प्रकरण | प्रकरणाचे नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | पहिले | प्रास्ताविक व संशोधन पध्द्ती | १ ते ४० |
| २ | दुसरे | मारूतराव घुले पाटील : जीवनचरित्र | ४१ ते ५५ |
| ३ | तिसरे | राजकीय व सामाजिक कार्य | ५६ ते ८५ |
| ४ | चौथे | सहकार : कृषी व सामाजिक कार्य | ८६ ते १२१ |
| ५ | पाचवे | शैक्षणिक क्षेत्रातील योगदान | १२२ ते १३४ |
| ६ | सहावे | निष्कर्ष व मुल्यमापन | १३५ ते १४० |
| ७ | **परिशिष्ट** | | |
| | | अ) प्रश्नावली | १४१, १४२ |
| | | ब) मुलाखत | १४३ — १५५ |
| | | क) कार्यकतृत्वाचा थोडक्यात आढावा | १५५ — १५७ |
| | | ड) पुरस्कार | १५७ — १५९ |
| | | इ) छायाचित्रे | १६० — १६७ |
| | | ई) वंशावळ | १६८ |
| **८** | **संदर्भग्रंथ** | | १७०—१७३ |

# प्रकरण पहिले

# प्रास्ताविक व संशोधन पध्द्ती

## १. प्रास्ताविक :

आशिया खंडामध्ये हिमालय या जगातील सर्वोच्च पर्वतरांगांच्या पायथ्याशी अरबी समुद्र, हिंदी महासागर व बंगालचा उपसागर या तीन समुद्रांनी वेढलेले जगातील सर्वात मोठे व्दीपकल्प म्हणजे भारत. जगातील प्राचीन संस्कृतीं पैकी भारत हा दक्षिण आशियातील एक महत्वाचा देश आहे. जवळपास १५० वर्ष इंग्रजांच्या गुलामीत घातल्यानंतर १५ ऑगष्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले आणि जगाच्या पाठीवर सर्वांत मोठे लोकशाही राष्ट्र म्हणून भारत आज बिरूदावली मिरवत आहे. स्वातंत्र्यानंतर सर्वांत मोठा प्रश्न होता तो प्रशासनाचा व ते योग्य पध्द्तीने चालावे म्हणून घटनेचा. सुरूवातीला घटना निर्मितीवरून घटनाकारांत मतभेद होते, परंतु राष्ट्रहित विचारार्थ असल्याने ते अल्पकाळातच संपुष्टात आले आणि २६ जानेवारी १९५० रोजी जगातील सर्वांत मोठी व जनहिताची राज्यघटना भारताला मिळाली. भारत हा क्षेत्रफळाने मोठा असल्याने प्रशासनाच्या दृष्टीने तो एकप्राय ठेवणे अवघड होते. कारण विविध भाषा, कला, पेहराव अशा अनेक गोष्टींच्या विविधतेने भारत नटलेला आहे. प्रशासनास सोयिस्करपणे काम करता यावे यासाठी भारताचे अनेक राज्यांत विभाजन करण्यात आले. केंद्रस्तरावर लोकसभा (कनिष्ठ सभागृह) व राज्यसभा (वरिष्ठ सभागृह) स्थापन करण्यात आले. तसेच प्रत्येक घटक राज्यात विधानसभेची स्थापना करण्यात आली तर काही घटकराज्यात विधानपरिषद स्थापन करून व्दिगृही कायदेमंडळ स्विकारण्यात आले. महाराष्ट्र, कर्नाटक, उत्तर प्रदेश, बिहार, जम्मू काश्मीर, आंध्रप्रदेश आणि तेलंगणा या सात राज्यांत व्दिगृही कायदेमंडळ अस्तित्वात आहे.

१ मे १९६० रोजी स्वतंत्र मराठी भाषिकांचे महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले. या राज्याच्या निर्मितीचा इतिहास पुढील प्रमाणे —

## २. महाराष्ट्र राज्यनिर्मिती :

महाराष्ट्र राज्य आज सधन व प्रगतशिल राज्यांपैकी एक महत्वाचे राज्य म्हणून गणले जाते मात्र या राज्याच्या निर्मिती साठी अनेक रथीमहारथींनी आपले जीव पणाला लावलेले आहेत. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भाषावार प्रांतरचनेसाठी सामान्य जनांतून आग्रह धरला गेला. स्वातंत्र्योत्तर कालखंडात केली गेलेली भाषावार प्रांतरचनेची मागणी तशी नवी नव्हती. १९०५ साली लॉर्ड कर्झन यांनी जेंव्हा बंगालची फाळणी करण्याचे घोषीत केले तेंव्हापासून भाषावार प्रांतरचना चळवळीने जोर धरला होता. हे धोरण राष्ट्रीय कॉंग्रेसलाही मान्य होते. त्याचे दृष्य स्वरूप १९२० च्या नागपूर अधिवेशनात दिसून येते. या अधिवेशनात कॉंग्रेसने भाषावार प्रांतरचनेचा ठरावही प्रथमच मांडला होता. यानंतर ग. त्र्यं. माडखोलकर, दत्तो वामन पोतदार, प्राध्यापक धनंजय गाडगीळ, पत्रकार लालजी पेंडसे, प्रबोधनकार ठाकरे, शंकरराव देव, आचार्य विनोबा भावे यांनी विविध माध्यमांमधून महाराष्ट्र राज्य — निर्मितीची मागणी लावून धरली होती. याच कारणासाठी जुलै १९४६ साली मुंबई येथे संयुक्त महाराष्ट्र परिषदेची स्थापना झाली.[१] १९४७ साली देशाला जेंव्हा स्वातंत्र्य मिळाले तेंव्हा मात्र कॉंग्रेसच्या केंद्रीय मंत्र्यांनी आपल्या सोईने या मागणीचे खंडण केले व भाषावार प्रांतरचनेचा मुद्दा दडपून टाकण्याचा प्रयत्न केला मात्र भाषावार प्रांतरचनावाद्यांनी केंद्रसरकारवर कडाडून टिका चालविली. प्रश्न दिवसेंदिवस ज्वलंत होत चालला, महारष्ट्रात तर कॉंग्रेसविरूध्द् जनसामान्य अशी धारणा झाली, तेव्हां कुठे केंद्र सरकारला जाग आली. आणि जून १९४८ मध्ये दार समितीची स्थापना केली. श्री. दार यांनी डिसेंबर १९४८ साली आपला अहवाल सादर केला. मात्र त्यांनीही भाषावाद्यांची उपेक्षाच केली. त्यांनी अहवालात स्पष्टपणे नमूद केले की, सद्या देशावर आणिबाणीच सावट असताना सर्वांनी त्याकडे लक्ष द्यावे भाषावार प्रांतरचनेचा प्रश्न यासाठी गौण आहे. श्री. दार समितीचे हे वाक्य जिव्हारी लागणारे ठरले आणि मोठ्या प्रमाणावर या समितीला विरोध झाला. हा विरोध केवळ एखाद दुसऱ्या राज्यात झाला नसून तो देशव्यापी होता.[२]

दिवसेंदिवस वाढतच चाललेला विरोध कुठेतरी थांबावा यासाठी प्रयत्न म्हणून कॉंग्रेसने १९४८ च्या अखेरीस भाषिक राज्यांच्या प्रश्नाचा विचार करण्यासाठी आपली 'जे.व्ही.पी' समिती नेमली. यामध्ये पंडित नेहरू, वल्लभभाई पटेल व पटट्भि सीतारामय्या यांसारखे महत्वाचे नेते होते. एप्रिल १९४९ पर्यंत समितीने आपले काम पूर्ण करून अहवाल सादर केला. मात्र या समितीनेही दार समितीचीच री ओढल्याने पुन्हा विरोध हुसाळला व कॉंग्रेसविरोधी जनतेचा रोष वाढू लागला. एवढेच काय तर १६ ऑगष्ट १९५१ रोजी भाषावार प्रांतरचना समर्थकांनी गांधीजींच्या उपोषणाचा मार्ग अवलंबला. यामध्ये प्रामुख्याने स्वामी सीताराम यांचा उल्लेख करावा लागेल कारण त्यांनीच आपल्या अनुयायांना घेवून हे उपोषण सुरू केले होते. मात्र आचार्य विनोबांनी त्यांची समजूत काढत हे उपोषण मागे घेण्यास विनंती केली. आणि हे उपोषण मागे घेण्यात आले. तेलगू भाषिकांचे आंध्रप्रदेश स्वतंत्र राज्य व्हावे यासाठी श्री. पोट्टीश्रीरामुलु यांनी एकूण ५६ दिवस उपोषण केले अखेर १५ डिसेंबर १९५२ रोजी त्यांनी बलिदान दिले. यामुळे तेलगू भाषिकांनी दंगे केले आणि याचा परिणाम कॉंग्रेस नेतृत्वावर झाला. अखेर केंद्रसरकारने १ ऑक्टोबर १९५३ रोजी मद्रासचे विभाजन करून तेलगू भाषिक स्वतंत्र आंध्रप्रदेश राज्य बनवले. केंद्राने भाषावार प्रांतरचनेचा मुद्दा परिस्थिती बाहेर जात असल्याचे ओळखून अखेर फाजल अली यांच्या अध्यक्षतेखाली २२ डिसेंबर १९५२ रोजी राज्य पुनर्रचना समितीची घोषणा केली. या समितीत सदस्य स्वरूपात पं. ह्दयनाथ कुंझरू आणि के. एम. पण्णीकर यांचा समावेश होता. संयुक्त महारष्ट्राची मागणी तशी १९४६ पासूनच करण्यात येत होती. संयुक्त महाराष्ट्राच्या समर्थकांनी आपले सविस्तर म्हणने आयोगापुढे मानले. एकीकडे मुंबईतील मराठी भाषिक प्रदेशाची संयुक्त महाराष्ट्र पुरस्कर्त्यांनी मागणी केली तर दुसरीकडे मुंबईतीलच गुजराती भाषिक प्रदेशाची मागणी महागुजरात परिषदेने उचलून धरली. आयोगाने शेवटोपरी या दोन्ही मागण्या फेटाळल्या व विदर्भाचे स्वतंत्र राज्य असावे असे सुचविले. उरलेल्या मराठी व गुजराती भाषिकांचे संतुलित असे व्दैभाषिक राज्य निर्माण करावे.[३]

मुंबई महाराष्ट्रात विलीन होऊ नये यासाठी गुजराथी धनिक व त्यांचे पाठीराखे राजकीय नेते त्यांची ही धार्जिना संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीला मोठा अडसर ठरला होता. सर्वांत महत्वाचे म्हणजे पंडीत नेहरू, सरदार पटेल यांसारखे नेतेच मुळात मुंबई महाराष्ट्रात विलीन होऊ नये यासाठी छुप्या पध्द्तीने विरोध करत होते. पंडीत नेहरूंनी तर यासाठी पर्यायही शोधले होते. मुंबईचे नगरराज्य करावे या पर्यायापासून ते मुंबई हा केंद्रशासित प्रदेश असावा इथपर्यंत हे पर्याय होते. मुंबई म्हणजे महाराष्ट्राचा आत्मा आहे त्यामुळे मुंबई बाबतीत कुठलीही तडजोड होणार नाही अशी तंबीच संयुक्त महाराष्ट्र समितीने दिली. तरीही केंद्राने आपला हटट् कायम ठेवत नेहरूंनी १६ जानेवारी १९५६ रोजी मुंबईस केंद्रशासित प्रदेशाचा दर्जा दिला. याचा निषेध म्हणून सार्वत्रिक हरताळ पाळण्यात आला. विशेष म्हणजे यात कामगार व विद्यार्थी वर्ग मोठ्या प्रमाणावर होता. हरताळ चालू असताना १६ जानेवारीच्या रात्री ठाकूरव्द्वार येथे पोलिसांनी गोळीबार केला व यात १०५ व्यक्तिंना बलिदान करावे लागले. या घटनेनंतर कॉंग्रेस नेते राजीनामे देतील अशी अपेक्षा होती मात्र २३ जानेवारीचा भारताचे अर्थमंत्री सी. डी. देशमुख यांचा राजीनामा सोडता कोणीही राजीनामा दिला नाही. दिवसेंदिवस प्रश्न गंभीर होत चालला होता. संयुक्त महाराष्ट्राचे स्वप्न पूर्ण करायचे असेल तर कॉंग्रेसला शह दिल्याशिवाय पर्याय नाही याची जाणीव सर्व बिगर कॉंग्रेस पक्षांना झाली. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी कॉंग्रेस इच्छूक नसल्याचे जाणून ६ फेब्रुवारी १९५६ मध्ये पुण्यात सर्व विरोधी पक्षांनी एकत्रीत येवून युती केली. व कॉंग्रेसला एकत्रित विरोध केला. २७ जुलै १९५६ रोजी मराठी जनतेचा पहिला सत्याग्रही मोर्चा भारताच्या राजधानीमध्ये दिग्विजय करून आला. संयुक्त महाराष्ट्राचे नारे लोकसभा दरबारी दनाणले.[४] याची कॉंग्रेसने चांगलीच धास्ती घेतली. पुढे केंद्रसरकारने काहीसे धोरण बदलत १ नोव्हेंबर १९५६ रोजी व्दैभाषिक मुंबई राज्याची स्थापना केली. हे व्दैभाषिक मुंबई राज्य मराठी व गुजराथी अशा दोन्ही भाषिकांच्या जिव्हारी पडल्यागतच होते. मात्र असे असले तरी यात गुजराथी भांडवलदारांचेच हित अधिक होते. कारण संयुक्त महाराष्ट्रात मुंबई कोणत्याही परिस्थितीत विलीन

होवू द्यायची नाही असेच त्यांनी ठाणले होते. महाराष्ट्रीयन जनतेचे कॉंग्रेसविरोधी मत निर्माण करण्यात संयुक्त महाराष्ट्र चळवळीला चांगलेच यश मिळाले. याचे दृष्य परिणाम १९५७ च्या निवडणूकांत दिसून आले —

**तक्ता क्र. १.१ : १९५७ ची निवडणूक (राज्यविधिमंडळ)**

| **विधिमंडळ** | **एकूण जागा** | **कॉंग्रेस** | | **संयुक्त महाराष्ट्र समिती** | |
|---|---|---|---|---|---|
| | | **जिंकलेल्या जागा** | **टक्केवारी** | **जिंकलेल्या जागा** | **टक्केवारी** |
| मुंबई शहर | २४ | १३ | ५४.५ | ११ | ४५.५ |
| मराठवाडा | ४२ | ३५ | ८३.३ | ७ | १६.७ |
| विदर्भ | ६६ | ५५ | ८३.३ | ११ | १६.७ |
| पश्चिम महाराष्ट्र | १३५ | ३३ | २४.५ | १०२ | ७५.५ |
| **एकूण** | २६७ | १३६ | ५०.९ | १३१ | ४९.१ |

(व.मं.सिरसीकर, आधुनिक महाराष्ट्राचे राजकारण, पान.क्रं.४७ वरून)

**तक्ता क्रं. १.२ : १९५७ ची लोकसभा निवडणूक**

| **निवडणूक प्रांत** | **एकूण जागा** | **कॉंग्रेस** | | **संयुक्त महाराष्ट्र समिती** | |
|---|---|---|---|---|---|
| | | **जिंकलेल्या जागा** | **टक्केवारी** | **जिंकलेल्या जागा** | **टक्केवारी** |
| मुंबई शहर | ४ | २ | ५० | २ | ५० |
| मराठवाडा | ६ | ६ | १०० | — | — |
| विदर्भ | ९ | ९ | १०० | — | — |
| पश्चिम महाराष्ट्र | २२ | २ | ९.५६ | २० | ९०.५ |
| **एकूण** | ४१ | १९ | ४६ | २२ | ५४ |

(व.मं.सिरसीकर, आधुनिक महाराष्ट्राचे राजकारण, पान.क्रं.४७ वरून)

वरील तक्ता क्रं. १.१ (१९५७ ची राज्यविधिमंडहळाची निवडणूक) व तक्ता क्रं. १.२ (१९५७ ची लोकसभा निवडणूक) चा विचार करता असे दिसून येते की या दोन्ही निवडणूकांत जनमत हे संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या बाजूने कौल देणारे होते. यामध्ये पश्चिम महाराष्ट्रातून कॉंग्रेसला कडाडून विरोध झालेला स्पष्टपणे दिसून येतो. या निवडणूकांमुळे कॉंग्रेसला चांगलाच चपराक बसला. कॉंग्रेस नेतृत्वाला या निवडणूकीने विचार करण्यास भाग पाडले असे म्हंटलं तरी वावगं ठरणार नाही. या निवडणूकीत कॉंग्रेसला जरिही सत्ता मिळाली असली तरी ती विदर्भाच्या मेहरबानीनेच मिळाली असे म्हणावे लागेल. यामागचे कारण विदर्भाला मुंबईमध्ये जास्त रस नसावा असेही घेता येईल मात्र पश्चिम महाराष्ट्राने मात्र विधिमंडळ व लोकसभेत कॉंग्रेसला चांगलाच शह दिला.

संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे प्रवर्तक व महाराष्ट्र पंचक प्रबोधनकार ठाकरे, आचार्य अत्रे, सेनापती बापट, माधवराव बागल, प्रभातकार कोठारी यांनी थेट कॉंग्रेसच्या छुप्या नेतृत्वावरच टिका सुरू केली होती. आचार्य अत्रे तर मराठा या वृत्तपत्रातून जाहीरपणे आपली आग्रही भूमिका मांडत होते. यामध्ये सर्वांगिन रूजलेले नेतृत्व एस. एम. जोशी यांची भूमिका ही सर्वांत महत्वाची ठरते. संयुक्त महाराष्ट्रवाद्यांची टिका एवढी प्रभावी होती की कॉंग्रेस पुरती हवालदिल होवून गेली. कॉंग्रेसला उतरती कळा लागली असतानाच पक्षाचे महाराष्ट्रातील नेतृत्व श्री. यशवंतराव चव्हाण यांच्याकडे आले. १९५६ च्या व्दैभाषिक मुंबई राज्याचे त्यांनी मुख्यमंत्री पद स्विकारले तेव्हांपासूनच त्यांनी पक्ष सुधारणेवर भर दिला व राज्यात पडझडीला आलेली कॉंग्रेस सावरण्याचा एक प्रामाणिक प्रयत्न केला.[५] व्दैभाषिक राज्यातील कॉंग्रेसला आलेली मरगळ झटकून टाकायची असेल तर मुंबईसह स्वतंत्र महाराष्ट्र स्थापन केल्याशिवाय पर्याय नाही. याची जाणीव यशवंतरावांना होती. त्यांनी नेहरूंची भेट घेवून त्यांना हा मुद्दा पटवून दिला आणि नेहरूंचे मन ओळविण्यात यश मिळाले. आणि अखेर यशवंतराव चव्हाण यांच्या मध्यस्तीने महाराष्ट्र राज्याची मागणी मान्य करण्यात आली आणि कामगार दिनाचे औचित्य साधून १ मे १९६० रोजी मराठी बहुभाषिक स्वतंत्र

महाराष्ट्र राज्याची स्थापना करण्यात आली. महाराष्ट्राच्या स्थापनेसाठी १०५ हुतात्मे, श्रीपाद डांगे, एस. एम. जोशी, प्र. के. अत्रे, प्रबोधनकार ठाकरे, यशवंतराव चव्हाण यांसारख्या नेत्यांचे योगदान विसरून चालणार नाही. त्यांनी दिलेल्या लढ्यामुळेच आजचा महाराष्ट्र उभा आहे.[६]

स्थापनेवेळी महाराष्ट्र देशातील १४ वे राज्य ठरले. महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर गुजरात, मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश, छत्तीसगढ, कर्नाटक व गोवा ही राज्ये तर दमण, दादरा व नगर हवेली हे केंद्रशासित प्रदेश असे शेजारीही मिळाले. मात्र २ जून २०१४ रोजी आंध्रप्रदेशपासून विभक्त होवून नव्याने निर्माण झालेले २९ वे तेलंगणा राज्य आंध्रप्रदेश ऐवजी नव्याने शेजारी लाभला आहे. महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी बनली तर नागपूर उपराजधानी बनली. १९६० ते १९८० पर्यंत महाराष्ट्रात केवळ २६ जिल्हे होते. आज या जिल्ह्यांची संख्या ३६ एवढी झाली आहे. राजकीय व सहकाराच्या अंगाने विचार करता महाराष्ट्राला विशेष महत्व प्राप्त झालेले आहे.

स्वतंत्र महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री होण्याचा मान मा. यशवंतराव चव्हाण यांना मिळाला. त्यांनी महाराष्ट्रातील राजकारण, अर्थकारण, समाजकारण व सहकार अशा घटकांना चालना दिली. आज महाराष्ट्र राज्य हे देशातील अग्रगण्य राज्य ठरले आहे. महाराष्ट्राची निर्मिती झाली त्यावेळी महाराष्ट्राच्या वाटेला ३,०७,७१३ चौ.किमी. भूखंड मिळाला. क्षेत्रफळाने महाराष्ट्राचा देशात तिसरा क्रमांक आहे व लोकसंख्येने व्दितीय. याबरोबरच महाराष्ट्राला अरबी समुद्राचा ७२० किमी. लांबीचा समुद्रकिनारा लाभला आहे. तसेच छ. शिवाजीराजे भोसले, छ. संभाजीराजे भोसले, महात्मा ज्योतीराव फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शाहू महाराज यांसारखी समाजसुधारक याच महाराष्ट्राच्या मातीची सुपुत्र आहेत. आजही महाराष्ट्र या थोर महापुषांचा वारसा पुढे चालवत आहे. प्रशासकीय कामांच्या व्यापाचा समतोल राखला जावा म्हणून महाराष्ट्राने एकूण सहा महसूल/प्रशासकीय विभाग निर्मिले आहेत. त्यांची नावे — कोकण, पुणे, नाशिक, अमरावती, औरंगाबाद आणि नागपूर अशी आहेत. ५ जानेवारी २००९ रोजी औरंगाबाद या प्रशासकीय

विभागाचे विभाजन करून नांदेड या सातव्या प्रशासकीय विभागाची घोषणा करण्यात आली होती, मात्र अजूनही हा निर्णय कागदोपत्री आहे. या सहा प्रशासकीय विभागात एकूण ३६ जिल्ह्यांचे विभाजन करण्यात आलेले असून सदर जिल्ह्यांपैकीच नाशिक प्रशासकीय विभागात येणारा एक महत्वाचा जिल्हा म्हणजे अहमदनगर जिल्हा होय.

## ३. अहमदनगर जिल्हा — दृष्टीक्षेप :

महाराष्ट्रातील प्रमुख जिल्ह्यापैंकी अहमदनगर हा एक महत्वाचा जिल्हा असून या जिल्ह्याची ऐतिहासिक, भौगोलिक, राजकीय व सामाजिक पार्श्वभूमी पुढील प्रमाणे —

### ३.१. ऐतिहासिक :

महाराष्ट्रातील पहिल्या मानवाचे अस्तित्व अहमदनगर जिल्ह्यातील नेवासे या ठिकाणी आढळल्याचे डेक्कन कॉलेजने कलेल्या पुरातत्व सर्व्हेक्षणात निष्पण्ण झाले आहे. अहमदनगर जिल्ह्याची खरी ओळख इ.स.पूर्व १५०० ते ५०० इथपासून झाली असे म्हणता येईल. अगस्ती ऋषींनी विंध्य पर्वत ओलांडून गोदावरी नदीच्या किनाऱ्यावर म्हणजे सध्याच्या नगर जिल्ह्याच्या परिसरात वसाहत स्थापन केल्याचे आणि त्यांची व प्रभू श्री रामचंद्रांची भेट याच परिसरात झाल्याचे मानले जाते.

पंधरावे शतक उजडण्यापूर्वीच्या काही काळ आधी म्हणजेच इ.स. १४८६ मध्ये त्याकाळी अस्तित्वात असलेले बहामनी राज्य पाच भागात विखुरले गेले. अशा स्वतंत्र झालेल्या पाच भागांपैकी एक भाग घेवून पूर्वीपासून अस्तित्वात असलेल्या भिंगार शहराजवळील सीना नदीकाठी १४९० मध्ये मलिक अहमदशहा बहीरी याने नवीन शहर वसविण्यास सुरूवात केली. त्याच्या नावावरूनच या शहराला अहमदनगर असे नाव देण्यात आलेले आहे. अहमदनगर शहर मोठया वेगाने भरभराटीला येवू लागले आणि अवघ्या चार वर्षातच १४९४ मध्ये अहमदनगर निजामशहाची राजधानी बनली. या शहराला

एवढे महत्व प्राप्त झाले की त्याची तुलना त्याकाळी कैरो, बगदाद या वैभवसंपन्न शहरांशी केली जायची.[७] मलिक अहमदशहा बहिरीनंतर १६३६ मध्ये शहाजहानने हा प्रांत काबीज करून विकास घडवून आणण्यावर भर दिला. निजामशहाचे अतिशय प्रामाणिक मराठा सरदार म्हणून शहाजीराजे भोसले यांची इतिहासात नोंद आहे. शहाजीराजे पराक्रमी असल्याने निजामशाही दरबारात त्यांना मोठा मान होता. निजामांनी मालोजीराजांची जहागीर शहाजीराजेंना दिली होती. निजामशाहीची पडझड होत असताना छोटया मूर्तझा निजामशहाला मांडीवर घेवून शहाजी राजे भोसले यांनी नगरचा कारभार सांभाळला. जेंव्हा मुघल बादशाहाने निजामशाही जिंकायचा बेत आखला तेव्हां विजापूरचा आदिलशाहाही त्याला जाऊन मिळाला. निजामशाहीच्या रक्षणासाठी मलिक अंबर व शहाजीराजे यांनी दोन्ही फौजांविरोधात अहमदनगर जवळ असलेल्या भातवाडी येथे यशस्वी लढा दिला. या लढाईमध्ये शहाजीराजेंचे बंधू शरीफजी मारले गेले. शहाजीराजेंनी या लढाईत यश मिळविल्याने त्यांची एवढी वाहवा झाली की दरबारातील काहींना ते खुपले आणि उभयतांमध्ये दरी निर्माण झाली. शहाजीराजे निजामशाही सोडून विजापूरच्या आदिलशहाला जाऊन मिळाले. आदिलशहाने त्यांना ‘सरलष्कर’ हा किताब देऊन त्यांचे स्वागत केले. शहाजीराजांनी निजामशाही सोडल्यानंतर निजामशाहीला चांगलीच उतरती कळा लागली. वजीर मलिक अंबरचा मृत्यू झाला. त्याच्यानंतर त्याचा मुलगा फत्तेखान वजीर झाला. फत्तेखान कटकारस्थानी असल्याने त्याची निजामशाहीला चांगलीच झळ पोहचली. निजामशाहीला शहाजीराजेंची खुपच गरज असल्याचे जाणून निजामशाहाच्या आईने शहाजीराजेंनी पुन्हा निजामशाही चालवावी अस साकडे घातले. निजामशाहीच्या मिठाशी इमान जागवून शहाजीराजेंनी पुन्हा निजामशाहीत प्रवेश केला.[८]

अहमदशहा, बुऱ्हाणशहा, चांदबीबी यांची कारकिर्द असणारी निजामशाही १६३६ पर्यंतच टिकली. शहाजहान बादशहाने निजामशाहीचा समूळ खात्मा करून संपूर्ण अहमदनगरच मोगलांच्या वर्चस्वाखाली आणले. मुघल सम्राटांच्या दुबळेपणाचा फायदा उठवत दख्खनचा सुभेदार असलेल्या मिर कमरूदिद्न

निजाम उल् मुल्क फिरोजजंग खान याने त्यांची सत्ता झुगारून आपल्या सहा सुभ्यांचे मिळून स्वतंत्र अशा हैदराबाद राज्याची स्थापना केली आणि इ.स. ३१ जुलै १७२४ हैदराबादला राजधानी बनवून नगरवर हैदराबादच्या निजामाची सत्ता रूढ झाली. १७५९ च्या पेशवे–निजाम युध्द्ात पेशव्यांनी निजामांचा पराभव करून नगरवर कब्जा मिळवला. पेशव्यांनी नगरचा कारोभार सुरू केला व तो १७९७ पर्यंत चांगल्या पध्द्तीने सांभाळला. १७९७ ला पेशव्यांनी नगर शिंदे घराण्याच्या हवाली केले. इंग्रजांनी १२ ऑगष्ट १८०३ ला जनरल वेलस्लीच्या नेतृत्वाखाली अहमदनगरवर कब्जा मिळविला व त्यावर युनियन जॅक फडकविला. त्यांनी १८१८ पर्यंत अहमदनगर संपूर्णपणे आपल्या अंमलाखाली आणून १८२२ ला अहमदनगरला अधिकृतरित्या जिल्ह्याचा दर्जा दिला.[९] ब्रिटिशांचा अंमल सुरू झाल्यानंतर इंग्रज सैनिक व क्रांतिकारक यांच्यात सततचा संघर्ष सुरू होता. जिल्ह्याने मोठया प्रमाणावर ब्रिटिश राजवटीला विरोध केला. जिल्ह्यातील पारनेर, जामगाव व अकोला भागातील कोळी व भिल्ल जमातींनी ब्रिटिशांना सुखाने राज्यकारभार करून न देण्याचेच ठाणले. त्यांनी ब्रिटिशांची अवस्था सळो की पळो अशी करून ठेवली. स्वातंत्र्यासाठी ब्रिटीशांच्या विरोधात लढा देत असताना १८४७ साली रोघोजी भांगरिया या क्रांतिकारकाला बलिदान द्यावे लागले. याचा राग शमतो न शमतो तेच १८५७ चा राष्ट्रव्यापी उठावाने वर डोकं काढले. या उठावात नगर जिल्ह्यातील भागोजी नाईक यांच्या नेतृत्वाखाली सात हजार भिल्लांनी एकवटून संघर्ष केला.

इ.स. १९२० साली नगरमध्ये असहकाराची चळवळ सुरू झाली. यामुळे नगरची राजकीय व एकूणच सामाजिक परिस्थिती चांगलीच ढवळून निघाली. या काळातच ब्राम्हण–ब्राम्हणेतर चळवळीने जिल्ह्यात जोर धरला. यात ब्राम्हणेतर गट अधिक प्रभावी बनला. यात लगेचच तरवडीचे श्री. मुकुंदराव पाटील, सरदार थोरात आणि रावबहादूर नवले इत्यादींचा सहभाग प्रमुख ठराला. असहकाराच्या धोरणामुळे १९२० नंतर नगरला उतरती कळा लागली. इ.स. १९४२ च्या चलेजाव आंदोलनाच्या काळात सरदार वल्लभभाई पटेल, मौलाना आझाद, डॉ. पी.सी. घोष, पंडीत नेहरू इत्यादी राष्ट्रीय नेते नगर येथील भुईकोट किल्ल्यात

असलेल्या कारगृहात कैद होते. पंडीत नेहरूंनी 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया' हा ग्रंथ याच भुईकोट किल्ल्यात लिहीला आहे तसेच डॉ. पी. सी. घोष यांनी 'हिस्टरी ऑफ एन्शंट इंडियन सिव्हिलायजेशन' आणि मौलाना आझाद यांनी 'गुबार—ए—खातीर' हे ग्रंथ याच शहरात लिहीले आहे. यावरून असे स्पष्ट होते की अहमदनगर जिल्ह्यालाही स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास लाभलेला आहे. त्याचबरोबर जिल्ह्यात काही पुरातत्वीय अवशेषही सापडलेले आहे.[१०]

## ३.२. पुरातत्त्वीय आढावा :

आजवर अहमदनगर जिल्ह्यातील काही महत्वाच्या ठिकाणी पुरातत्व विभागाने, ऐतिहासिक संशोधन मंडळाने संशोधन करून व उत्खनन करून काही पुरातत्त्वीय/प्राचीन गोष्टींचा शोध लावला आहे. त्याचा थोडक्यात आढावा पुढील प्रमाणे :

**३.२.१. दायमाबाद :** हे ठिकाण नगर जिल्ह्यातील श्रीरामपूर तालुक्यातील एक खेडे आहे. कष्टाळू, भटक्या व शिकार करून आपला उदारनिर्वाह करून पोटाची भूक भागविणारी माणसं या खेडयात स्थिर झाली. ही लोक समूहाने व एकाच घरात दाटीवाटीने राहत असायचे. याठीकाणी प्राचीन काळया मातीच्या थरावर वसलेली आद्य शेतकरी वसाहत प्रसिध्द् आहे. जीवन जगण्यासाठी आवश्यक गरजांची पूर्तता होईल असे स्वयंपूर्ण खेडे अशीही दायमापूरची ओळख आहे. १९५८—५९ साली भारतीय पुरातत्व विभागचे त्या वेळचे सरसंघचालक एम.एन. देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली दायमाबाद येथे पहिल्यांदा उत्खनन झाले. यानंतर १९७४—७९ पर्यंत डॉ. शंकरराव साळी यांनी केलेले उत्खनन सर्वांत यशस्वी म्हणावे लागेल. दायमाबाद येथे खापरावरील रंगीत संस्कृती आढळते. येथे तांब्याचा गेंडा, रथ, हत्ती यांच्या जवळजवळ ६५ किलो वजनाच्या मूर्ती आढळल्या. डॉ. साळी यांनी केलेल्या उत्खननातून मिळालेल्या ७५ सांगाडयांची शास्त्रीय केली गेली. एका माणसाचा उत्तर

हडप्पाकालीन थरात मिळालेला येथील सांगाडा दायमाबादला थेट सिंधू संस्कृतीपर्यंत घेऊन जातो. यामुळे जिल्ह्यात सिंधू संस्कृती असल्याचे असल्याचे सिध्द् झाले.

**३.२.२ जोर्वे :** संगमनेर तालुका अहमदनगर जिल्ह्यातील एक महत्वपूर्ण व वैशिष्ट्यपूर्ण तालुका आहे. पद्मश्री विखे पाटीलांसारखे नेतृत्व या तालुक्यात वाढलं व फलास आलं. जोर्वे हे याच तालुक्यातील एक खेडेगाव असून येथे प्राचीन वसाहतींचे अस्तित्व असल्याचे निष्पण्ण झाले आहे. या वसाहतीचे उत्खनन डॉ. एच. डी. सांकलिया व डॉ. एस. बी. देव यांनी १९५०—५१ साली केले यामध्ये इ.स.पू. १५०० च्या काळातील पुरातन संसकृतीचे अवशेष प्रथम सापडले. उत्खननामुळे जिल्ह्यात नवीन जोर्वे संस्कृती प्रकाशात आली. उत्खननात येथे प्रामुख्याने रंगवलेली भांडी, तांब्यापासून बनविलेली भांडी आणि शस्त्रे सापडली. शेती आणि शिकार त्याचबरोबर पशुपालन हा या भागाचा महत्वाचा व्यवसाय. कोकणचा अपवाद सोडता या भागातील लोक संपूर्ण महाराष्ट्रात स्थायिक झाले आहेत. तत्कालीन लोकांचा पुनर्जन्मावर विश्वास असायचा त्यामुळे ते मृतांना घरातच पुरायचे तर मृत लहान मुलांना भांड्यात टाकूण दोन भांडी एकमेकांना जाडून गाडले जायचे. वृध्द् मृतांना पालथे व उत्तरेकडे डोके करून पुरले जायचे. भूत होवू नये म्हणून त्यांचे पाय तोडले जात असत. याशिवाय इथे झालेल्या उत्खननात रंगीत खापरे, कुंभ, वाडगे, थाळ्याही मिळाल्या. यामध्ये सापडलेली राखाडी रंगाची खापरे ही भाजलेल्या तांबट मातीपासून बनलेली आहेत. काही प्रमाणात पाणांची व झाडांची चित्रेही आढळलेली आहे. त्याचबरोबर ब्रांझ या धातूपासून बनवलेली एकूण कुऱ्हाडी व एक तांब्याची बांगडी मिळाली. ही बांगडी ३२.२ मि.मी. लांबीची असून तिचा व्यास १२ मि.मी आहे.

**३.२.३ पेमगिरी :** हे अहमदनगर जिल्ह्यातील एक खेडेगाव असून ते प्रामुख्याने संगमनेर तालुक्यात येते. या ठिकाणी चुन्याचे प्रमाण अधिक असल्याने येथील चुन्याच्या खाणी प्रसिध्द् होत्या. प्रामुख्याने बांधकामासाठी या

चुन्याचा वापर होत असे. इ.स.पू. २०० मध्ये यादव राजांनी बांधलेला शाहगड हा आज पेमगिरीचा किल्हा म्हणून ओळखला जातो. या किल्यावर पेमादेवीचे मंदिर असून पाण्याचे टाके आहेत. दिल्लीचा मुघल सम्राट शाहजहान आणि विजापुराची आदिलशाही या दोन सत्तांनी मिळून निजामशाही संपवली, त्यावेळी मूर्तझा या लहानग्याला निजामशाहीच्या गादीवर बसवून व स्वतः सुभेदार राहून शहाजीराजे भोसले यांनी शाहगडावरून तीन वर्ष राज्यकारभार हाकला.[११]

**३.२.४ नेवासे :** नेवासा हा अहमदनगर जिल्ह्यातील एक महत्वाचा तालुका असून महाराष्ट्रातील पहिल्या मानवाच्या अस्तित्वाचे पुरावे डेक्कन कॉलेजच्या पुरातत्व सर्व्हेक्षणात आढळून आले. प्रवरा व गोदावरी नद्यांच्या खोऱ्यातील घनदाट अरण्यात मानवी संस्कृतीचे पुरावे व संस्कृतीशी निगडीत पुरावे सापडले आहेत.

## ३.३. भौगोलिक :

अहमदनगरवर अनुक्रमे निजामशाही, मराठा साम्राज्य तसेच ब्रिटीशांचा अंमल राहीलेला आहे. यामुळे या वेगवेगळ्या सत्ता व त्यांची धोरणे यामध्ये १९४७ पर्यंत हा जिल्हा चांगलाच भरडून निघालेला आहे.

**३.३.१. स्थान व चतु:सीमा :** नागपूर जिल्हा जसा भारताचा केंद्रबिंदू तसा अहमदनगर महाराष्ट्राचा केंद्रबिंदू समजला जातो. इ.स. १८६९ मध्ये अहमदनगर, नाशिक व सोलापूर हे तिनही जिल्हे एकत्रच होते. चांदवड – कोरेगाव (भीमा) व प्रवरासंगम – करमाळा अशा नगर जिल्ह्याच्या सिमा होत्या. कालांतराने त्यांचे विभाजन होवून आजचा अहमदनगर जिल्हा अस्तित्वात आला आहे. आता नवीन जिल्हा रचनेनुसार चांदवड हे नाशिक जिल्ह्यात, करमाळा सोलापूर जिल्ह्यात तर कोरेगाव भीमा पुणे जिल्ह्यात आहे. आज अहमदनगर जिल्ह्याचे क्षेत्रफळ १७४१३ चौ.किमी असून क्षेत्रफळाने हा महाराष्ट्रातील सर्वात मोठा जिल्हा आहे.[१२] राज्याच्या एकूण भौगालिक क्षेत्राच्या

५.५४ टक्के इतका भाग नगर जिल्ह्याने व्यापला आहे. या जिल्ह्याचा अक्षवृत्तीय विस्तार — १८.२ ते १९.९° उत्तर व रेखावृत्तीय विस्तार — ७३.९ ते ७५.५° पूर्व असा आहे. तसेच जिल्ह्याच्या उत्तरेस नाशिक व औरंगाबाद जिल्हे, पूर्वेस बीड व उस्मानाबाद, दक्षिणेस सोलापूर जिल्हा व पश्चिमेस ठाणे व पुणे जिल्हे अशा जिल्ह्याच्या चतु:सीमा आहेत.

**३.३.२ भूरूपे :** महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतर जी जिल्हे या राज्यात अंतर्भूत करण्यात आली यांपैकीच अहमदनगर हा एक महत्वाचा व वैशिष्टयपूर्ण जिल्हा आहे. या जिल्ह्यात विविध भूरूपे आढळून येतात ती पुढील प्रमाणे —

**३.३.३. डोंगराळ भाग :** महाराष्ट्राच्या संरक्षणासाठी ताठ उभा असलेल्या सह्याद्री पर्वताच्या रांगा व उपरांगा अहमदनगर जिल्ह्याच्या पश्चिम भागातील अकोले व संगमनेर तालुक्यांत पसरलेल्या असून अकोले तालुक्यातील पर्वतरांगाची उंची जास्त आहे. सह्याद्री पर्वताच्या काही रांगा जिल्ह्यात दक्षिणोत्तर गेल्या असून त्यांचे काही फाटे पश्चिमेकडून पूर्वेकडे गेलेले दिसून येतात. अतिउत्तरेकडे पसरलेल्या सह्याद्री पर्वताच्या रांगेत नगर — नाशिक जिल्ह्याच्या सीमेवर व नगरमधील अकोले तालुक्यात १६४६ मी. उंचीचे व महाराष्ट्रातील सर्वांत उंच कळसूबाई शिखर आहे. त्याचबरोबर अदुला, हरिश्चंद्र व बाळेश्वर नावाच्या डोंगररांगाही याच जिल्ह्यात आढळतात. त्याचबरोबर शेवगाव व पाथर्डीहून नगरला जाताना लागणारा करंजी घाट, संगमनेरवरून रंधा धबधब्यकडे जाताना लागणारा विटा घाट, औरंगाबाद—पुणे हायवेवर असणारा पांढरीपूल घाट व संगमनेरहून पुण्याकडे जाताना लागणारा चंदनापुरी घाट. हे घाट नगरजिल्ह्यातील प्रसिध्द् घाट आहेत. याशिवाय पाथर्डी तालुक्यातील गर्भगिरीची डोंगररांग पर्यटकांचे मन मोहून घेते. मोहटा गडावरील मोहटादेवी, मढी येथील कानिफनाथ गडावरील कानिफनाथांचे हेमडपंथी मंदीर, नेवासे येथील ज्ञानदेवांचे मंदीर, देवगड येथील दत्त मंदीर व सदगुरू किसनगिरी बांबांचे समाधी मंदीर, शिर्डी येथील साईबाबा मंदीर, शनिशिंगनापूर येथील शनिदेवाचा

चौथरा तसेच नगर शहरातील उजव्या सोंडीचा व नगरचे ग्रामदैवत विशाल गणपती लाखो भाविकांचे श्रध्द्स्थान आहे.

**३.३.४. नद्यांचे खोरे :** जिल्ह्यातील सीना नदी ही प्रसिध्द् नदी असून अहमदनगर शहर या नदीच्या काठी वसलेले आहे. या जिल्ह्याचा दक्षिण भाग घोड, भीमा व सीना नद्यांचे खोरे म्हणूनच ओळखला जातो. पारनेर तालुक्याचा दक्षिण भाग व श्रीगोंदा, कर्जत व जामखेड तालुक्यांचा बहुतांश भाग या विभागात मोडतो. दख्खन—पठाराचा हा जिल्हा ज्वालामुखीच्या लाव्हा रसापासून बनलेला आहे. जिल्ह्यातील डोंगर उतारावर काही लाल दगड—गोटे मिश्रीत मृदा आढळते. प्रवरेच्या खोऱ्यातील व प्रामुख्याने संगमनेर तालुक्यातील मृदा खोल गाळाची व अतिशय सुपीक असल्याचे आढळून येते. ओलावा टिकवून ठेवण्याची या मृदेची क्षमता अधिक आहे. महाराष्ट्राची भूमी बेसाल्ट या अग्निजन्य खडकापासून बनलेली आहे त्याचप्रमाणे या जिल्ह्यातील गोदावरी खोऱ्यातील मृदाही याच अग्निजन्य खडकापासून बनलेली आहे. ही मृदा विशेषत: कापूस या पिकासाठी उपयुक्त मानली जाते. याशिवाय या जिल्ह्याला कुठलाच समुद्रकिनारा नसल्याने हा भाग समुद्रसपाटीपासून दूर आहे. यामुळे या भागाचे हवामान प्रामुख्याने उष्ण व कोरडे आहे. हा जिल्हा सतत अवर्षण छायेखाली राहीलेला असल्याने जिल्ह्यातील काही भागातच हिरवळ दिसून येते. ज्वारी व ऊस हे जिल्ह्यातील प्रमुख पिके असून बाजरी, भूईमूग, तूर, हरभरा यांसारखी पिकेही काही प्रमाणात घेतली जातात. येथील पावसाचे प्रमाण सरासरी ५८३.५० मि.मि. इतके आहे. जिल्ह्यात एकूण १४ तालुके असून पैकी अहमदनगर, अकोले, जामखेड, पारनेर, पाथर्डी, संगमनेर, शेवगाव, श्रीगोंदे, नेवासे व कर्जत हे दहा तालुके सुखटणकर समितीचया अहवालानुसार अवर्षणग्रस्त म्हणून घोषित करण्यात आलेले आहे. यावरून असे लक्षात येते की अहमदनगर जिल्हा मोठ्या प्रमाणात दुष्काळग्रस्त आहे. असे असले तरी आधुनिक शेती तंत्रज्ञान व आधुनिक पाणीसाठ्याचे तंत्र वापरून जिल्ह्यात मोठया प्रमाणावर शेती केली जाते.

## ३.४. उद्योगधंदे :

जिल्ह्याच्या विकासात समतोल साधायचा असेल तर कृषी घटकाइतकेच उद्योगधंद्यानांही समप्रमाणात महत्व द्यावे लागेल. राजकीय व भांडवलदारांच्या नकारात्मक मानसिकतेमुळे जिल्ह्यात उद्योगधंद्ये अधिक नाहीत यामुळे जिल्ह्यातील लोक मोठ्या प्रमाणावर पुणे, मुंबई, औरंगाबाद अशा विविध ठिकाणी नोकरी करतात. असे असले तरी साखर कारखानदारीत जिल्ह्याने सर्वोच्च स्थान व लौकीक मिळविला आहे. जिल्ह्यात जवळपास २२ साखर कारखाने असून यांपैकी १५ साखर कारखाने हे सहकारी तत्वावर चालणारे आहेत. ३१ डिसेंबर १९५० साली पद्मश्री विठठ्लराव विखे यांनी आशिया खंडातील पहिला सहकारी सााखर कारखाना याच जिल्ह्यातील प्रवरानगर येथे उभारून देशात सहकारी साखर कारखानदारीचा एक नवा अध्याय सुरू केला. जिल्ह्यात फारसे औद्यागिकीकरण नसले तरी काही छोट—मोठे उद्योग आपणास बघण्यास मिळतात.[१३]

**३.४.१. लहान उद्योग :** याप्रकारच्या उद्योगाची दिशा गतिमान नसली तरी स्थानिक भागात या प्रकारच्या उद्योगांना चांगलेच महत्व असते. हे उद्योग जिल्ह्यातील काही भागातच चालतात मात्र राष्ट्रीय बाजारपेठेत देखील येथील उत्पादनाची मागणी होत असते. हातसळी तांदूळ तयार करणे व औषधी वनस्पती तयार करणे असे उद्योग अकोले तालुक्यात चालतात. हातमागावर व यंत्रमागावर कापड विणण्याचा उद्योग अहमदनगर, भिंगार, पाथर्डी, संगमनेर व खर्डा येथे चालतो. याशिवाय मेंढयांच्या लोकरीपासून घोंगडया विणणे, घायपात व अंबाडीपासून दोर तयार करणे, विडया तयार करणे यांसारखे उद्योगही जिल्ह्यात चालतात. कोपरगाव व राहते येथील गुळाला बाजारपेठांत चांगलीच मागणी आहे. श्रीरामपूर, संगमनेर व वांभोरी येथे खाद्यतेलाच्या गिरण्या आहेत. अशा प्रकारची लहान गटात मोडणारी उद्योग जिल्ह्यात आढळून येतात.

**३.४.२. मोठे उद्योग :** दूध शितकरण केंद्र, आयुर्वेदिक देशी औषधी निर्मिती कारखाना, दूरदर्शन संच व मोपेड वाहने तयार करण्याचा कारखाना, कापूस मिल, साखर कारखाने, ऊसाच्या चिपाटापासून कागद निर्माण करणारा कारखाना यांसारखे मोठ्या दर्जात मोडणारे उद्योग जिल्ह्यात चालतात.

## ३.५. सांसद आदर्श ग्राम योजना :

२०१४ साली सत्तेत आलेल्या भाजप केंद्रसरकारने ही योजना आमलात आणली. या योजनेअंतर्गत प्रत्येक जिल्ह्याच्या खासदाराने आपल्या मतदारसंघातील एक गाव दत्तक घेऊन त्या गावाचा सर्वांगिण विकास साधायचा. मात्र हे गाव स्वत: खासदाराचे गाव नसावे अशी ही योजना आहे. सांसद आदर्श ग्रामयोजनेअंतर्गत नगर जिल्ह्यातील निवडलेली गावे पुढीलप्रमाणे –

**तक्ता क्रं. १.३ : सांसद आदर्श ग्राम योजनेतील गावे.**

| **सांसद आदर्श ग्राम योजना** | | ०२ |
|---|---|---|
| १ | खा. दिलीपकुमार गांधी | कांबी, ता. शेवगाव |
| २ | खा. सदाशिव लोखंडे | मलून्जा बु!, ता. श्रीरामपूर |

अहमदनगर जिल्ह्यात दोन लोकसभा मतदारसंघ असल्याने या जिल्ह्याला दोन खासदार लाभलेले आहे. या खासदारांनी दत्तक घेतलेली गावे वर तक्ता क्रं. १.३ मध्ये दाखविली आहेत.

## तक्ता क्रं. १.४ — अहमदनगर जिल्हा विशेष :

| अ.क्र | जिल्हा विशेष | | एकूण | |
|---|---|---|---|---|
| १. | क्षेत्रफळ | | १७४१३ चौ.किमी | |
| २. | महसूल विभाग नाशिक | | नाशिक | |
| ३. | उपविभाग | | एकूण ०४ — अहमदनगर, श्रीरामपूर, संगमनेर व कर्जत. | |
| **४.** | **लोकसंख्या** | | **२०११** | **२००१** |
| | | पुरूष | ४५,४३,१५९ | ४०,४०,६४२ |
| | | स्त्री | २३,४२,८२५ | २०,८३,०५३ |
| | | **एकूण** | **२२,००,३३४** | **१९,५७,५८९** |
| | | | | |
| ५. | **साक्षरतेचे प्रमाण** | | **२०११ (टक्केवारी)** | **२००१ (टक्केवारी)** |
| | | पुरूष | ८६.५० | ८५.७० |
| | | स्त्री | ७०.८९ | ६४.३५ |
| | | **सरासरी** | **७९.०५** | **७५.३०** |
| ६. | सिंचनाखालील क्षेत्र | | ३,६१,००० हे. | |
| ७. | लेककला | | तमाशा, लावणी, गोंधळ, वासुदेव. | |
| ८. | तापमान | | कमाल ३३.००°से. किमान १८०५°से. | |
| ९. | कृषी विद्यापीठ | | १—महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहूरी | |
| १० | महानगर पालिका | | १— अ.नगर महानगरपालिका | |
| ११. | तालुके | | १४ | |
| १२ | पंचायत समित्या | | १४ | |
| १३ | जन्मदर | | २२.०८ | |
| १४ | मृत्यूदर | | ०६.०६ | |
| १५. | कटक मंडळ | | ०१ | |
| १६ | एकूण जि.प. शाळा | | २४३७ | |
| १७ | ग्रामपंचायती | | १३११ (पैकी १९४ ग्रुप ग्रामपंचायती) | |

( सदर माहिती आपला अहमदनगर जिल्हा, कल्पना प्रकाशन व विद्याभारती प्रकाशन वरून )

वरील तक्त्यावरून अहमदनगर जिल्ह्याची सर्वसाधारण माहिती लक्षात येते. क्षेत्रफळाच्या दृष्टीने विचार करता हा जिल्हा महाराष्ट्रातील सर्वात मोठा जिल्हा आहे. या जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येचा विचार करता लिंगगुणोत्तर प्रमाण ९३९ आहे. तर महाराष्ट्राच्या एकूण लोकसंख्येशी या जिल्ह्याच्या लोकसंख्येचे सरासरी प्रमाण बघता ते ४.०४ टक्के असल्याचे दिसून येते. तसेच शहरी व ग्रामीण लोकसंख्या यांच्यात तुलना करता ती अशी दिसून येते की, शहरी लोकसंख्या ३,६३०,५४२ (७९.९१टक्के) तर ग्रामीण लोकसंख्या ९१२,६१७ (२०.०९टक्के) एवढी आहे.

२०१५ मध्ये सत्तेत आलेल्या भाजप सरकारने अहमदनगर जिल्ह्याचे नामांतर अहिल्यादेवीनगर असे करण्याचे सुतोवाच केले आहे. असे असले तरी यासाठी अजून कुठलेच पाऊल उचलले गेलेले नाही. अहमदनगर जिल्हा हा विस्ताराने मोठा असल्याने या जिल्ह्याचे विभाजन करून आणखी एक स्वतंत्र श्रीरामपूर जिल्हा करण्याचे अनेक वर्षापासून बोलेले जाते. सद्या अहमदनगर जिल्ह्यात दोन लोकसभा मतदार संघ आहेत. अहमदनगर लोकसभा मतदारसंघ व शिर्डी लोकसभा मतदार संघ. या दोन्ही मतदार संघांची सविस्तर माहिती पुढील प्रमाणे —

## ३.६. अहमदनगर जिल्हा मतदार संघ माहिती :

सुरूवातीला अहमदनगर जिल्ह्यात तेरा विधानसभा मतदारसंघ होते मात्र पुनर्रचनेनंतर ते बारा झाले. सद्या अहमदनगर जिल्ह्यात एकूण दोन लोकसभा व बारा विधानसभा मतदारसंघ असून यांची माहिती पुढील प्रमाणे —

### ३.६.१. अहमदनगर लोकसभा मतदार संघ (३७) :

या लोकसभा मतदार संघात एकूण सहा विधानसभा मतदार संघाचा समावेश होतो. सुरूवातीला अहमदनगर लोकसभा मतदार संघ अनुसूचित जातींसाठी राखीव होता. मात्र नंतरच्या काळात म्हणजेच चौथ्या परिसिमन आयोगाने या लोकसभा मतदार संघातील नेवासा विधानसभा मतदारसंघ वगळून

राहूरी विधानसभा मतदारसंघ अंतर्भूत करण्यात आला आणि हा लोकसभा मतदारसंघ सर्वसाधारण स्वरूपाचा करण्यात आला तर नेवासा विधानसभा मतदार संघ शिर्डी लोकसभा मतदार संघात विलीन करण्यात आला.[१४] सुरूवातीपासूनच या लोकसभा मतदार संघात कॉंग्रेसचे वर्चस्व होते मात्र १९९८ साली जिल्ह्याचे कॉंग्रेस नेते श्री. बाळासाहेब विखे पाटील यांनी शिवसेनेत प्रवेश करून १९९९ च्या लोकसभा निवडणूकीत निवडून येवून या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व केले. याचा फायदा भाजप सेना आघाडीला मोठ्या प्रमाणावर झाला. १९९९ ते आजतागयात भाजप सेना आघाडीने आपले वर्चस्व अबाधित ठेवलेले आहे.[१५] २०१४ च्या सार्वजनिक लोकसभा निवडणूकीत या लोकसभा मतदार संघातून दिलीपकुमार मनसुखलाल गांधी यांची भारतीय जनता पक्षातून निवड झाली. या लोकसभा मतदारसंघात समाविष्ट असणारे विधानसभा मतदारसंघाची यादी पुढील प्रमाणे —

**तक्ता क्रं. १.५. लोकसभा मतदारसंघ ३७ अंतर्गत विधानसभा मतदारसंघ :**

| अ.क्र | विधानसभा मतदारसंघाचे नाव | मतदारसंघ क्रमांक | राखीव/सर्वसाधारण |
|---|---|---|---|
| १ | शेवगाव | २२२ | सर्वसाधारण |
| २ | राहूरी | २२३ | सर्वसाधारण |
| ३ | पारनेर | २२४ | सर्वसाधारण |
| ४ | अहमदनगर शहर | २२५ | सर्वसाधारण |
| ५ | श्रीगोंदा | २२६ | सर्वसाधारण |
| ६ | कर्जत—जामखेड | २२७ | सर्वसाधारण |

(चंद्रकांत भूजबळ, 'लोकप्रतिनिधी निवडणूक मार्गदर्शिका—लोकसभा मतदारसंघ पुनर्रचना' यावरून)

तक्ता क्रं. १.२. वरून असे लक्षात येते की लोकसभा मतदार संघ ३७ मध्ये विधानसभा मतदार संघ २२२ ते २२७ यांचा समावेश करण्यात आलेला असून हे सर्व विधानसभा मतदारसंघ सर्वसाधारण आहेत. पैकी कर्जत व जामखेड तालुका मिळून एकच विधानसभा मतदार संघ २२७ आहे तर शेवगाव व पाथर्डी तालुका मिळून एकच विधानसभा मतदारसंघ २२२ आहे.

## ३.६.२. शिर्डी लोकसभा मतदार संघ (३८) :

या लोकसभा मतदार संघात एकूण सहा विधानसभा मतदारसंघाचा समावेश आहे. हा लोकसभा मतदारसंघ अनुसुचित जातींसाठी राखीव असून येथे शिवसेनेने आपले वर्चस्व अबाधित ठेवलेले आहे. या मतदार संघात राष्ट्रवादी—कॉंग्रेसचे वर्चस्व असूनही २००९ च्या सार्वजनिक लोकसभा निवडणूकीत हा मतदारसंघ रिपब्लिकन पक्षाला सोडल्यामुळे श्री. रामदास आठवले यांनी येथे निवडणूक लढवून मताधिक्य घण्याचा प्रयत्न केला मात्र स्थानिक विरूध्द् बाहेरचा हा संदेश मतदारसंघात पेरण्यास शिवसेना यशस्वी झाल्याने चर्मकार समाजाचे व शिवसेना पक्षाचे श्री. भाऊसाहेब वाकचौरे हे निवडून आले होते.[१६] २०१४ च्या सार्वत्रिक निवडणूकीत श्री. वाकचौरे यांनी कॉंग्रेसकडून ही निवडणूक लढविली आणि यामध्ये त्यांचा पराभव झाला आणि त्यांचे प्रतिस्पर्धी व शिवसेनेचे श्री. सदाशिव लोखंडे यांचा विजय झाला. या लोकसभा मतदार संघात समाविष्ट असणारे विधानसभा मतदारसंघांची यादी पुढील प्रमाणे —

**तक्ता कं. १.६. लोकसभा मतदारसंघ ३८ अंतर्गत विधानसभा मतदारसंघ :**

| अ.क्र | विधानसभा मतदारसंघाचे नाव | मतदारसंघ कमांक | राखीव/सर्वसाधारण |
|---|---|---|---|
| १ | अकोले | २१६ | अनुसुचित जमाती |
| २ | संगमनेर | २१७ | सर्वसाधारण |
| ३ | शिर्डी | २१८ | सर्वसाधारण |
| ४ | कोपरगाव | २१९ | सर्वसाधारण |
| ५ | श्रीरामपूर | २२० | अनुसुचित जाती |
| ६ | नेवासा | २२१ | सर्वसाधारण |

(चंद्रकांत भूजबळ, ‘लोकप्रतिनिधी निवडणूक मार्गदर्शिका—लोकसभा मतदारसंघ पुनर्रचना’ यावरून)

तक्ता कं. १.३. वरून असे स्पष्ट होते की, शिर्डी लोकसभा मतदार संघ हा अनुसुचित जातीसाठी राखीव असून यांतील दोन विधानसभा मतदारसंघही

राखीव आहेत. यामध्ये अनुसुचित जातीसाठी राखीव असणारा विधानसभा मतदारसंघ २२० व अनुसुचित जमातीसाठी राखीव असलेला विधानसभा मतदारसंघ २१६ या विधानसभा मतदारसंघांचा समावेश होतो. उर्वरित चार विधानसभा मतदारसंघ अनुक्रमे २१७,२१८, २१९, २२१ हे सर्वसाधारण आहेत या लोकसभा मतदारसंघात अकोले, संगमनेर, राहता, कोपरगाव, श्रीरामपूर, राहूरी, नेवासा या तालुक्यांचा समावेश होतो.

अहमदनगर जिल्हयाचे विभाजन झाल्यास श्रीरामपूर हा नवीन जिल्हा तयार होवून या जिल्हयात शिर्डी लोकसभा मतदारसंघात जे तालुके येतात त्या तालुक्यांचा समावेश नविन जिल्हयात होईल असे वर्तविले जाते.



## ४. शेवगाव व नेवासा तालुका — दृष्टीक्षेप :

प्रस्तुत संशोधन विषय ‘मारूतराव घुले पाटील यांचे अहमदनगर जिल्ह्यातील सहकार व राजकीय क्षेत्रातील योगदान’ हा असल्याने श्री. मारूतरावांचे प्रमुख कार्यक्षेत्र हे शेवगाव—नेवासा तालुका असल्याने या दोन्ही तालुक्यांची पार्श्वभूमी विचारात घेणे भाग आहे.


### ४.१. शेवगाव तालुका :

कापूस उत्पादनासाठी प्रसिध्द् असणारा हा तालुका प्रामुख्याने अहमदनगर लोकसभा मतदारसंघ ३७ मध्ये येतो. २०११ च्या जनगननेनुसार या तालुक्याची एकूण लोकसंख्या २,४५,७१४ असून यांपैकी अनुसुचित जातींची लोकसंख्या ३६,१६३ तर अनुसुचित जमातीची लोकसंख्या ४६८१ एवढी आहे. येथील साक्षरतेचा दर हो ६४.१३ टक्के एवढा असून स्त्री—पुरूष प्रमाण ९५३ आहे. तालुक्यात जिल्हा परिषद गटांची संख्या पाच असून पंचायत समिती गणसंख्या १० एवढी आहे. या तालुक्याचे क्षेत्रफळ १,०३१.८५ चौकिमी आहे तर या तालुक्यात एकूण ११२ गावं आहेत.

### ४.२. नेवासा तालुका :

नेवासा तालुक्याला मोठा धार्मिक वारसा लाभलेला आहे. संत ज्ञानेश्वरांनी याच तालुक्यात ज्ञानेश्वरी सांगितली व ती सच्चिदानंद बाबा यांनी पानावर उतरविली. तसेच लाखो भाविकांचे श्रध्द्सथान असलेले शनि शिंगणापूर याच तालुक्यात आहे. पूर्वी नेवासा—शेवगाव विधानसभा मतदारसंघ एकत्र होता मात्र २००९ पासून नेवासा स्वतंत्र विधानसभा मतदारसंघ निर्माण झाला. या तालुक्यातील मुळा शैक्षणिक एज्युकेशन सोसायटी प्रसिध्द् आहे. प्रवरा, गोदावरी व मुळा या नद्या या तालुक्यातून वाहतात. मुळत: नेवासा तालुकाच प्रवरा नदीकाठी वसलेले आहे. २०११ च्या जनगननेनुसार या तालुक्याची एकूण लोकसंख्या ३,५७,८२९ असून यांपैकी अनुसुचित जातींची लोकसंख्या ५२,६६१ तर अनुसुचित जमातीची लोकसंख्या १८८९४ एवढी आहे. येथील

साक्षरतेचा दर हो ६८.०२ टक्के एवढा असून स्त्री—पुरूष प्रमाण ९३४ आहे. तालुक्यात जिल्हा परिषद गटांची संख्या सात असून पंचायत समिती गणसंख्या १४ एवढी आहे. या तालुक्याचे क्षेत्रफळ १३४३.४६ चौकिमी आहे तर या तालुक्यात एकूण १२९ गावं आहेत.[१७]




कुठलाही संशोधन विषय निवडताना कुठलेही दोष राहू नये यासाठी संशोधन दिशा ठरवावी लागते. त्यासाठी विशिष्ट पध्द्ती उपयोगात आणल्या जातात :

## ५. संशोधन पध्द्ती :

कुठलेही संशोधन हे वैज्ञानिक पध्द्तीच्या आधाराशिवाय पूर्णच होऊ शकत नाही. वैज्ञानिक पध्द्तीविरहीत संशोधनास शास्त्रीय दर्जा मिळत नाही तसेच ते ग्राह्यही धरले जात नाही. वैज्ञानिक पध्दती म्हणजे संशोधनाचा प्राण असे म्हंटले तरी वावगे ठरणार नाही. नवीन ज्ञान शोधून काढणे, जुने ज्ञान प्रमाणित करणे व अद्ययावत ज्ञानाची सत्यता पडताळून पाहणे हा संशोधनाचा मुलभूत उददेश असतो. माणूस हा जिज्ञासू आणि बृध्द्रीजीवी असल्याने तो सतत नवनवीन गोष्टींचा शोध घेत असतो. शास्त्रीय संशोधनातून ज्ञानाचा शोध घेतल्यास, खऱ्या अर्थाने ते ज्ञान वस्तुनिष्ठ राहील. निरीक्षण व कार्यकारण भाव हे शास्त्रीय संशोधनाचे दोन आवश्यक तत्त्वे आहेत. ही दोन्ही तत्त्वे सामाजिक तथ्यांच्या संबंधित संशोधनात असतील आणि वैज्ञानिक पध्द्तीच्या आधारे हे संशोधन करण्यात आले असेल तर त्यास सामाजिक संशोधन म्हंटले जाते.[१७]

प्रत्येक राष्ट्राच्या राजकीय व्यवस्थेत कालानुरूप आवश्यक असे बदल होत घडत असतात. हे बदल लक्षात घेऊन राजकीय संशोधकाने वैज्ञानिक अभ्यास पध्द्तीवर भर दिला. राजकीय संशोधन करताना सामाजिक संशोधनाची उपेक्षा करून चालत नाही. कारण या दोन्ही प्रक्रीया एकमेकांच्या हातात हात घालून आलेल्या असून ते एकमेकांचे अभिन्न अंग आहे. संशोध नही प्रक्रीया अधिक सुस्पष्ट पध्द्तीने लक्षात यावी यासाठी अनेकांनी आपापल्या सदसदविवेक बृध्द्रिनुसार संशोधनाची व्याख्या केली आहे.

## ५.१. संशोधनाची व्याख्या[१८] :

संशोधनाच्या व्याख्येचा विचार करता सर्वच विचारवंतांच्या व्याख्या या एकसारख्या नाहीत. प्रत्येकानेच वेगवेगळा दृष्टिकोन मांडलेला आहे.

**वेबस्टर** यांच्या शब्दकोशानुसार, ‘कोणत्याही विषयातील नविन तत्त्वे व तथ्ये शोधून काढण्यासांठी व जुनी तत्त्वे यांचे परिक्षण करण्यासाठी केलेला चिकित्सक व पध्द्तशीर अभ्यास म्हणजे संशोधन होय.’

**जे. डब्ल्यू. बेस्ट** यांनी आपल्या 'Research and in Education' या ग्रंथात असे म्हंटले आहे की, वैज्ञानिक पध्द्त कार्यान्वित करण्याची सुव्यवस्थित व नियमबध्द् अध्ययनाची प्रक्रिया म्हणजे संशोधन होय.

**टकमन** यांच्या मते, ' मानवी मनाला अस्वस्थ करणाऱ्या बहुविध समस्यांच्या सप्रमाण व विश्वसनीय समाधानासाठी आवश्यक असलेल्या तथ्यांचे संकलन व विश्लेषण करून त्यांचा अन्वयार्थ लावण्याची व्यवस्थाबध्द् प्रक्रिया म्हणजे संशोधन होय.'

**स्लेसिंजर आणि स्टिफेन्सन** यांनी सामाजिक शास्त्राच्या विश्वकोषात संशोधनाची व्याख्या करताना असे नमूद केले की, 'संशोधन म्हणजे सामान्यीकरणाच्या हेतूने वस्तू, संकल्पना व प्रतीकांची हाताळणी होय. संशोधनाने प्रस्थापित ज्ञानाच्या कक्षा वाढतात, वर्तमान ज्ञानात सुधारणा होते किंवा ज्ञान प्रमाणित होते. प्रमाणित ज्ञानाचा सिध्दांत निर्मितीसाठी व व्यवहारात उपयोग केला जातो.'

**मौले** यांच्या मते, "Research is the systematic, ojective and accurate search for the solution to a well defined problem"

**स्टेनहाऊस लॉरेन्स** यांच्या मते, 'संशोधन हे व्यवस्थित, नियोजित, स्व—आलोचनात्मक व अविरत असे अन्वेषण असून ते यथासम्मभ्व सार्वजनिक समालोचनाच्य व प्रायोगिक परीक्षणाच्या अधीन असते.

वरील व्यांख्यांचा मतितार्थ विचारार्थ घेता असे लक्षात येते की, सामाजिक संशोधन ही सामाजिक जिवनाच्या विभिन्न पैलूंच्या संदर्भात अध्ययन करण्यासाठी एक वैज्ञानिक योजना आहे. त्याचबरोबर सदर व्याख्यांचा सूक्ष्मदर्शी अर्थ लक्षात घेतल्यास संशोधनाची काही स्थूल स्वरूपाची वैशिष्टये आपणास विशद करता येतील.

वास्तविक पाहता राजकीय व सामाजिक संशोधनाची वैशिष्टये स्थूलमानाने सारखीच असतात. कारण सामाजिक वास्तवता हा शास्त्रीय

मूल्यांच्या आधारवर शोधून काढण्याची ती एक प्रक्रिया असते. राजकीय वास्तवतेचा संबंध सामाजिक वास्तवता, समाजव्यवस्था व सामाजिक घडामोडी यांच्याशी निगडीत असल्यामुळे संशोधनातील प्रक्रियेचे स्वरूप जाणून घऊन आत्मसात करणे याची राज्यशास्त्राच्या अभ्यासकांना आवश्यकता असते.

## ५.२. राज्यशास्त्रीय संशोधनाची वैशिष्टये [१९]:

राजकीय संशोधनाची वैशिष्टये पुढील प्रमाणे विशद केली आहे.

१. संकल्पनाची हाताळणी करणे.

२. सामाजिक व राजकीय घटनाचा अभ्यास.

३. नवीन तथ्यांचा शोध आणि जुन्या तथ्यांचे परीक्षण.

४. सिंध्दांत निर्माण करणे.

५. उपयोजितेवर भर देणे.

६. राजकीय जीवन व घडामोडींचा अभ्यास करणे.

७. ज्ञानाची कक्षा वाढविणे व ज्ञान प्रमाणित करणे.

राजकीय संशोधनाची वैशिष्टये वरीलप्रमाणे असून राजकीय संशोधनाचे प्रकार पुढील प्रमाणे दिसून येतात —

## ५.३. राजकीय/सामाजिक संशोधनाचे प्रकार [२०]:

राजकीय संशोधनाचे प्रामुख्याने दोन प्रकार पडतात.

### १) मौलिक किंवा सैध्दांतिक संशोधन (Fundamental or Pure Researech) :

अशा प्रकारच्या संशोधनात नवीन तथ्ये आणि घटनांचे अध्ययन केले जाते. नवीन ज्ञान शोधून काढून विशिष्ट पध्द्तीने त्या ज्ञानाची मांडणी करून एखादा प्रमेय किंवा सिध्दांत मांडणे हे शुध्द् संशोधनाचे ध्येय मानले जाते. जेव्हा संशोधनकर्ता नवीन घटनांच्या संदर्भात संशोधन करतो, तेव्हा विद्यमान ज्ञानाची वृध्द्ी होते. आणि जेव्हा तो परिवर्तीत परिस्थितीच्या संबंधात जुने नियम आणि सिध्द्ांताची पुन्हा चिकित्सा करतो तेव्हा त्या संबंधातील ज्ञानामध्ये

आवश्यक त्या सुधारणा वि फेरबदल केले जातात. थोडक्यात सामाजिक ज्ञानाची प्राप्ती, परिमार्जन आणि ज्ञानवृध्दीस ज्ञानाची प्राप्ती, परिमार्जन आणि ज्ञानवृध्दीस आपले ध्येय मानले जाते. अशा संशोधनास मौलिक, शुध्द किंवा सैध्दांतिक संशोधन म्हणतात. **टी.एच.हक्सले** हे मौलिक संशोधनाच कट्ट्र समर्थक होते. त्यांच्या मते, शास्त्र आणि व्यवहार यांना एकत्रित आणणे चुकीचे आहे. शास्त्रास व्यावहारिक बनविण्यास अनेक धोके आहे.

### २) व्यावहारिक संशोधन (Applied Research) :

व्यावहारिक संशोधन म्हणजे व्यावहारिक उपयोगासाठी ज्ञान हा संशोधनाचा उद्देश असणे. या प्रकारच्या संशोधनाचा पुरस्कर्ता म्हणून रॉबर्ट एस्. लिंड यांचे नाव घेता येईल. समस्याची कारण मीमांसा शोधून काढणे व त्या समस्यावर उपाययोजना सुचविणे हा या संशोधनाचा प्रमुख उद्देश मानला जातो. जीवन हे शास्त्रासाठी नसून शास्त्र हे जीवनासाठी आहे यावर हे संशोधन भर देते.

वरिल दोन्ही प्रकार जरीही वेगवगळे वाटत असले तरी ते परस्परपुरकच आहेत. कारण शुध्द् संशोधन जसे नवीन ज्ञान अवगत करून जुन्या ज्ञानाचा पडताळा करण्यावर भर देते तसे व्यावहारिक संशोधन ज्ञानाच्या व्यावहारिक पातळीवर वापर करण्यावर भर देतो.

## ६. संशोधन अभ्यास विषय :

प्रस्तुत प्रबंधाचा विषय ‘‘मारूतराव घुले पाटील यांचे अहमदनगर जिल्ह्यातील सहकार व राजकीय क्षेत्रातील योगदान’’ हा आहे.

## ७. संशोधन विषयाचे महत्व :

१. प्रस्तुत संशोधनामुळे मारूतरावांच्या राजकीय, सामाजिक व आर्थिक कार्याचे महत्व लक्षात येईल.

२. प्रस्तुत संशोधनातून मारूतरावांचे कार्य आजच्या पिढीपर्यंत पोहचविण्यास मदत होईल.

३. मारूतरावांनी उभारलेले प्रकल्प व संस्था यांची योग्य माहीती समजेल.

४. प्रस्तुत संशोधनातून मारूतरावांच्या कार्याबदद्लचे समज—गैरसमज स्पष्ट होईल.

वरील मुद्यान्वये प्रस्तुत संशोधनातून अशा सर्व बाजू समोर आणल्या जातील. मारूतरावांचे अहमदनगर जिल्ह्यातील राजकीय, शैक्षणिक तसेच सहकार क्षेत्रातील कार्य उच्चकोटीचे आहे. त्यामुळे हे संशोधन संशोधकास अधिक महत्वाचे वाटत

## ८. संशोधन विषयाची निवड :

संशोधन विषयाची निवड करणे ही सामाजिक संशोधनाची अतिशय कठीण पायरी असल्याने संशोधनाचा विषय काळजीपूर्वक निवडण्यावर संशोधक अधिक भर देत असतो. संशोधकाने संशोधन विषय निवडताना कशी सावधानता बाळगावी यावर भाष्य करताना **ऑनबर्ग** असे सांगतात की, ‘‘संशोधकाने संशोधन कार्यासाठी अशा विषयाची निवड कधीही करू नये की ज्या संदर्भात प्रमाणसिध्द् तथ्ये उपलब्ध नाहीत आणि जे विषय पध्द्तीशास्त्राच्या दृष्टीने अतिशय कठीण आहे’’. म्हणजेच यातून असे स्पष्ट होते की, संशोधकांचे क्षेत्र मर्यादीत असले पाहीजे व विषय निवड काळजीपूर्वक केली पाहीजे.

मारूतरावांनी अहमदनगर जिल्ह्यातील सहकार चळवळीत दिलेले योगदान, धरणग्रस्तांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी घेतलेले परिश्रम तसेच राजकीय क्षेत्र यांसर्व अंगांनी मारूतरावांनी सामाजिक विकास घडवून आनला. मात्र त्यांच्या कार्याची आजच्या पिढीला परिपूर्ण माहीती नसल्याने त्यांचे

मारूतरावांच्या कार्याबद्दलचे समज—गैरसमज हे निष्फळ चर्चेतून झालेले असल्याने त्यांच्या कार्याबाबत संशोधन करून ते या पिढीपर्यंत पोहचविणे महत्वाचे वाटले. तसेच मारूतरावांच्या कार्याबद्दल अनेकांकडून ऐकण्यास मिळाले, विविध लेख, पुस्तके वाचण्यात आले. त्यांच्या कार्याची ख्याती ऐकूण मी भारावून गेलो आणि मारूतरावांवरती संशोधन करावे अशी माझी इच्छा झाली. त्यांच्या कार्याचा आढावा घेण्यासाठी आजवर कोणत्याही संशोधकाने वा संस्थेने संशोधन केलेले नसल्याचे आढळून आले म्हणून संशोधकाने प्रस्तुत संशोधन विषयाची निवड केलेली आहे.

## ९. अध्ययन भूक्षेत्र : अहमदनगर जिल्हा (प्रामुख्याने शेवगाव व नेवास तालुका) —

संशोधनाचा विषय निश्चित केल्यानंतर अभ्यासाचे क्षेत्र निश्चित करावे लागते. कारण संशोधनासाठीचे जेवढे कार्यक्षेत्र मोठे तेवढा वेळ, श्रम व पैसा अधिक खर्च होतो. अनेक संशोधक हे सामान्य परिस्थितीतील असल्याने इच्छा असूनही ते या गोष्टींचा अधिक उपयोग करू शकत नाहीत. त्यामुळे संशोधन करण्यासाठी विषय व कार्यक्षेत्र निश्चित करून त्यावर वेळ, श्रम व पैसा किती प्रमाणात खर्च होईल, माहिती संकलनात येणाऱ्या अडचणी या सर्व गोष्टींचा विचार संशोधकाला करावा लागतो. मी स्वत: शेवगाव व नेवासा तालुका परिसरातील असल्याने या भागाशी माझे जन्मापासूनचे नाते आहे. त्यामुळे या भागातील राजकीय, सामाजिक तसेच शैक्षणिक परिस्थितीची मला माहिती आहे. त्याचबरोबर या भागाचे नंदनवन करणारे लोकनेते स्व. मारूतराव घुले पाटील यांच्याबद्दल पेपरमधून, विविध पुस्तकांतून, मासिकांतून वाचनास मिळाले तसेच शाळेत व समाजातूनही ऐकण्यास मिळाले होते. त्यामुळे त्यांच्या कार्याचा हेवा वाटू लागला व त्यांच्या कार्यकतृत्वाची लिखीत नोंद व्हावी म्हणून प्रस्तुत संशोधन विषयाची निवड करून संशोधनासाठी स्व. मारूतरावांची कर्मभूमी शेवगाव — नेवासे तालुक्याची निवड केली.

## १०. संशोधनाची उदिद्ष्टये :

कुठलेही संशोधन हे उदिद्ष्टांशिवाय पूर्णत्वास जात नाही. उदिद्ष्टांमुळे संशोधनाची रूपरेषा अर्थात दिशा आणि मार्ग निश्चित होत असतात. 'मारूतराव घुले पाटील यांचे अहमदनगर जिल्ह्यातील सहकार व राजकीय क्षेत्रातील योगदान' या संशोधन विषयाच्या अनुषंगाने सर्वंकष शास्त्रशुध्द् अभ्यास करण्यासाठी पुढील उदिद्ष्टये निश्चित केली आहेत.

१. मारूतरावांच्या समर्ग कार्याचा आढावा घेणे.
२. मारूतरावांच्या लोकप्रियतेमागची कारणे शोधणे, त्यातील सत्यता शोधून ती नमूद करणे.
३. मारूतरावांच्या कार्यातील तथ्य पडताळणे.

प्रस्तुत संशोधन विषयाची निवड करताना वरिल उदिद्ष्टये समोर ठेवली असून मारूतरावांच्या कार्याचा आढावा घेत असताना काही गृहीतके निर्माण झाली ती पुढील प्रमाणे :

## ११. गृहितके :

सामाजिक संशोधन हे शास्त्रीय पध्द्तीवर अवलंबून असते. म्हणून कोणतेही सामाजिक संशोधन करताना शास्त्रीय पध्द्तीचा अवलंब करणे अनिवार्य ठरते अन्यथा केलेले अध्ययन हे शास्त्रीय असू शकणार नाही. गृहितक या शब्दासाठी मराठीत कामचलावू, पूर्वअनुमान, गृहितकृत्य, उपकल्पना असे वेगवगळे शब्द आहेत. गृहितक हि संकल्पना/पध्द्त अधिक स्पष्टपणे कळावी यासाठी काही विचारवंतांनी गृहितकाची व्याख्या सांगितली आहे. ती पुढीलप्रमाणे —

**कोहेन व नॅगेल** यांनी गृहितकृत्याचा अर्थ अतिशय स्पष्टपणे सांगितला आहे. त्यांच्या मते, 'चौकशी वा संशोधनास चालना देणाऱ्या प्रारंभिक अडचणीचे वा समस्येचे संभाव्य निराकरण वा उत्तर सूचविल्याशिवाय आपण संशोधनकार्यात पहिले पाऊल सुध्द्ा पुढे उचलू शकत नाही. समस्येची अशी संभाव्य उत्तरे आपणास अध्ययन विषयाच्या कोणत्या तरी पैलूमुळे किंवा अध्ययन विषयाबाबतच्या पूर्वज्ञानामुळे सूचतात. अशा उत्तराचे जेव्हा विधानामध्ये रूपांतर केले जाते. तेव्हा ती उत्तरे गृहितकृत्ये बनतात.[२१]

**पॉलिन व्ही. यंग :** 'तथ्यांच्या विषयाबाबत सामान्य ज्ञानाच्या आधारावर एक शास्त्रज्ञ प्रयत्न व चूकभलाची किंवा परीक्षणाव्द्ारा चूक सुधारण्याच्या पध्द्तीव्द्ारा त्या विशिष्ट घटकांना निवडले जाते की, जे अध्ययन समस्येवर प्रकाश टाकू शकतील. काल्पनिक विचार किंवा धूर्ल कल्पनाव्द्ारे तो तथ्यांच्या विभिन्न वर्गामध्ये कारणात्मक संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करतो. ही सूक्ष्म कल्पना, तात्पुरता मध्यवर्ती महत्वपूर्ण विचार जो फलयुक्त संशोधनाचा एक आधार बनतो, त्या कार्य्रवाहक विचाराला गृहितकृत्य म्हणतात.'

**लुंडबर्ग** : 'गृहितकृत्य हे एक सामायिक आणि कामचलाऊ सामान्यीकरण किंवा निष्कर्ष आहे की, ज्याच्या सत्यतेची परीक्षा घेणे अजून बाकी आहे. संशोधनाच्या प्रारंभिक अवस्थेत गृहितकृत्ये एक अनुमान, मनोकल्पित, कल्पनापूर्ण विचार, सहजज्ञान किंवा आणखी काही असू शकते. जो क्रिया किंवा संशोधनाचा आधार बनतो.'

**गुड आणि हॅट :** कामचलावू, 'गृहितकृत्य म्हणजे असे विधान आहे की, ज्याची सप्रमाणता ठरविण्यासाठी परीक्षण केले जाते आणि ते पुढील संशोधनासाठ उपयुक्त असते.'

**इ.एस. बोगार्डस :** 'परीक्षण केल्या जाणाऱ्या विधानास गृहितकृत्य असे म्हणतात.

वरिल व्याख्यांवरून गृहितकाचे महत्व लक्षात येइल. गृहितकृत्याशिवाय संशोधकाचे संशोधन पुर्णत्वास जाऊ शकत नाही. प्रस्तुत शोध प्रबंधात 'मारूतराव घुले पाटील यांचे अहमदनगर जिल्ह्यातील सहकार व राजकीय क्षेत्रातील योगदान' हा अभ्यास करताना खालील गृहितकृत्य निश्चित केलेली आहे.

१. मा. यशवंतराव चव्हाण हे लोकनेते मारूतराव घुले पाटील यांचे प्रेरणास्थान आहेत.
२. मारूतरावांनी अहमदनगर जिल्ह्यात अनेक लोकाभिमुख प्रकल्प उभारले आहेत.
३. मारूतरावांना राजकारणापेक्षा सहकार क्षेत्रात अधिक रस होता.
४. दुष्काळग्रस्त भागातही साखर कारखाना व्यवस्थितरित्या चालविला.
५. मारूतराव घुले पाटील यांना राजकीय व सहकार क्षेत्रात कार्य करताना पद्मभूषण भारदे, आबासाहेब निंबाळकर, पद्मश्री विखे पाटील यांसारख्या व्यक्तिंचे महत्वाचे सहकार्य लाभले आहे.

## १२. अभ्यास पध्द्ती :

प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक पध्द्तीचा अवलंब केला असून प्रश्नावलीच्या साहयाने माहिती मिळविण्यात आली आहे.

**वर्णनात्मक पध्द्त :** या संशोधन प्रकारातील विविध संशोधन पध्द्तीपैकी व्यक्ति—अभ्यास पध्द्ती किंवा विकासात्मक पध्द्ती यांचा जसा वर्तमान काळाशी संबंध आहे तसा भूतकाळाशी म्हणजेच ऐतिहासिक पध्द्तीशीही आहे. या पध्द्तीत १)मुलभूत स्वरूपाची माहिती जमा केली जाते. २) ती प्रश्नावली किंवा कसोटयांसारख्या साधनाने केली जाते. ३) त्या माहितीचे योग्य पध्द्तीने सारणीकरण करून त्यातून सखोल संशोधनासाठी अर्थनिर्वचन केले जाते. ४) यामध्ये व्यक्तिअभ्यास व विकासात्मक यांसारख्या पध्द्ती येतात.[२२]

## १३. तथ्य संकलनाची साधने :

प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक स्त्रोत व दुय्यम स्त्रोत या साधनांचा वापर करण्यात आला आहे.

### अ) प्राथमिक स्त्रोत :

१. **निरिक्षण** : संशोधकास प्रस्तुत संशोधन विषयाशी निगडीत काही बाबी परिचीत असल्याने यावर निरिक्षण करून अभ्यास करण्यात आला आहे.

२. **मुलाखत** : संशोधन विषयाशी संबंधित माहिती मिळविण्याच्या अनुशंगाने मुलाखतीचया सहाय्याने माहिती संकलीत करण्यात आली आहे. निवडलेल्या ग्रामस्थ, अधिकाऱ्यांकडून मुलाखतीच्या सहाय्याने माहीती मिळविण्यात आली.

३. **प्रश्नावली** : सदर अध्ययनासाठी निवडलेल्या ''मारूतराव घुले पाटील यांचे अहमदनगर जिल्ह्यातील सहकार व राजकीय क्षेत्रातील योगदान'' या विषयावर अभ्यास करण्यासाठी प्रश्नावलीच्या माध्यमातून शेवगाव व नेवासा तालुक्यातील ग्रामस्थांकडून माहीती संकलित करण्यात आलेली आहे.

### ब) दुय्यम स्त्रोत :

प्रस्तुत संशोधनासाठी उपयुक्त अशा सर्व प्रकारची लिखित स्वरूपाची माहीती व आकडेवारी व्दितीय स्त्रोताच्या सहाय्याने संकलीत करण्यात आली आहे. यामध्ये विविध शासकीय अहवाल, संशोधन विषयाला उपयुक्त ठरणारी पुस्तके, दैनिक वृत्तपत्रात छापून आलेले लेख, इ. माहीती संकलित केली आहे.

## १४. नमुना निवड :

नमुना निवड ही पध्द्त संशोधकास स्पष्ट स्वरूपात कळावी यासाठी नमुना निवड पध्द्तीबाबत मत मांडताना **बोगार्डस** म्हणतात की, ''एका पूर्व निर्धारित योजनेनुसार एककांच्या एका समुहातून एक निश्चित प्रतिशत निवडणे म्हणजे **नमुना निवड** होय.'' त्याचबरोबर नमुना निवडीसंबंधी **जॉर्ज ॲण्ड हॅट** म्हणतात की, "A Sample, as the name implies, is smaller representative of a larger whole"[२३]

प्रस्तुत अभ्यासाच्या अर्थपूर्ण मांडणीसाठी जी माहीती जमा करण्यात आली आहे ती संभाव्यता नमुना निवड पध्द्तीने **साधा यादृच्छिक** नमुना निवड पध्द्तीत प्रस्तुत संशोधनासाठी लागू होत असलेली **'कोटा'** पध्द्तीनुसार शेवगाव व नेवासा तालुक्यातील एकूण गावे २३९ असून यांपैकी ५ टक्के गावांची निवड केली. निवडलेल्या गावांची संख्या १२ याप्रमाणे प्रत्येकी गावात सात मुलाखतदारांची निवड केली. आणि औपचारिक, अनौपचारिक चर्चेतून व प्रत्यक्ष मुलाखतीतून प्रश्नावली भरून घेण्यात आली.

**कोटा नमुना** या पध्द्तीत सर्व प्रथम समग्राला वेगवेगळ्या वर्गात विभाजित केले जाते. प्रत्येक वर्गामधून किती एकक निवडायचे आहे हे निश्चित करून नंतर प्रत्येक वर्गामधून संशोधनकर्ता तितकेच एकक आपल्या इच्छेनुसार निवडतो. अशा प्रकारे निवडल्या गेलेल्या एककांना नमुना मानला जातो.

| अ.क्र | शेवगावता लुक्यातील निवडलेली गावे | मुलाखत दात्यांची संख्या | नेवासा तालुक्यातील निवडलेली गावे | मुलाखत दात्यांची संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | शेवगाव | ७ | पिंपरी शहाली | ७ |
| २ | दहिगाव—ने | ७ | सुकळी | ७ |
| ३ | रांजणी | ७ | कुकाणा | ७ |
| ४ | भायगाव | ७ | नांदूर शिकारी | ७ |
| ५ | मठाचीवाडी | ७ | सौंदाळा | ७ |
| ६ | बोधेगाव | ७ | ज्ञानेश्वरनगर, भेंडा | ७ |
| एकूण | ६ | ४२ | ६ | ४२ |

## १५. संशोधनाच्या मर्यादा :

१. प्रस्तुत संशोधन विषयाचा संबध हा अहमदनगर जिल्ह्यातील शेवगाव व नेवासा या दोन तालुक्यांपुरता मर्यादित आहे. इतर तालुक्यांचा केवळ ढोबळ मानाने विचार करण्यात आलेला आहे.

२. तालुक्यांतील लोकांकडून कार्यासंबंधी अचूक माहीती मिळणे कठीण आहे.

३. संशोधकाने गोळा केलेली माहीती प्राथमिक आणि दुय्यम स्त्रोतानुसार केलेली असल्याने ती १०० टक्के खरी असेलच याची शाश्वती देता येणार नाही.

तरी देखील संशोधकाने माहिती मिळविताना शासकीय कार्यालय, शैक्षणिक संस्था तसेच संबंधित व्यक्तिंना विश्वासात घेऊन येणाऱ्या अडचणींवर मात करून अधिकाधिक अचुक माहिती मिळविण्याचा प्रयत्न केलेला आहे.

## १६. प्रबंध प्रकरण रचना :

प्रस्तुत प्रबंधासाठी एकूण सहा प्रकरणांची रचना केलेली आहे. त्यासंबधी अधिक माहिती पुढील प्रमाणे दिलेली आहे.

### प्रकरण १ : प्रास्ताविक व संशोधन पध्द्ती :

प्रस्तुत प्रकरणात अहमदनगर जिल्ह्याची ओळख, मारूतरावांची थोडक्यात ओळख त्याचबरोबर संशोधनाची उद्दिष्टये, संशोधनाची गृहीतके व संशोधन पध्द्ती या घटकांचा अभ्यास केलेला आहे.

**प्रकरण २ : मारूतराव घुले पाटील : जीवनचरित्र**

प्रस्तुत प्रकरणामध्ये मारूतराव घुले पाटील यांचा परिचय, जन्म आणि बालपण, शालेय जीवन, घुले घराण्यात प्रवेश, निष्ठावंत समाजसेवक, विकासपुरूष या घटकांचा समावेश केलेला आहे तसेच मारूतराव घुले पाटील यांच्या मृत्युचे विश्लेषण केलेले आहे.

**प्रकरण ३ : राजकीय व सामाजिक कार्य :**

प्रस्तुत प्रकरणात मारूतराव घुले पाटील यांची राजकीय व सामाजिक विचारसरणी, पाटीलकीचे वतन, राजकारणाचे बाळकडू, यशवंतराव चव्हाण आणि मारूतराव घुले पाटील, कॉंग्रेस पक्षात प्रवेश व वाटचाल यांसारख्या घटकांचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

**प्रकरण ४ : सहकारातून कृषी व सामाजिक विकास :**

प्रस्तुत प्रकरणात सहकार चळवळीचा इतिहास, भारत आणि सहकार चळवळ, ब्रिटिश शासन आणि भारतीय शेती, अहमदनगर जिल्ह्यातील सहकारी चळवळ, सहकाराचे रोप — दहिगाव—ने विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी, अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंक, ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना पायाभरणी आणि वाटचाल, शेवगाव विभाग सहकारी कापूस जिनिंग व प्रेसिंग सोसायटी मर्यादित शेवगाव, जायकवाडी धरण — सहकारी जलसिंचन योजना, इत्यादींचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

**प्रकरण ५ : शैक्षणिक क्षेत्रातील योगदान :**

प्रस्तुत प्रकरणात मारूतरावांची शैक्षणिक पार्श्वभूमी, जनता शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना व वाटचाल, मारूतराव घुले पाटील शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना व वाटचाल, इत्यांदींचा अभ्यास कलेला आहे.

**प्रकरण ६ : निष्कर्ष व मुल्यमापन :**

प्रस्तुत प्रकरणामध्ये संकलित माहितीच्या आधारे निष्कर्ष काढले आहेत. तसेच मारूतरावांच्या कार्याचे मुल्यमापन करून फलनिष्पती दर्शवली आहे.

**१७. समारोप :**

अशा प्रकारे प्रस्तुत प्रकरणात अहमदनगर जिल्ह्याची ओळख, त्याचप्रमाणे शेवगाव व नेवासा तालुक्याची सर्वसाधारण माहिती नमुद केली असून विषय अध्ययनासाठी वापरण्यात येणारी संशोधन पध्द्ती व तिच्या पायऱ्यांची सविस्तर नोंद केलेली आहे. त्याचबरोबर प्रबंध बांधणीचा अंदाज यावा यासाठी प्रबंध प्रकरण रचनाही देण्यात आली आहे. मारूतराव घुले पाटील यांचे जीवनचरित्र आपण पुढील प्रकरणात अभ्यासणार आहोत.

# संदर्भसूची


१. दास्ताने संतोष, महाराष्ट्र २०१२, नितीन प्रकाशन, पुणे, पान क्रं. १८५.

२. व. मं. सिरसीकर, आधुनिक महाराष्ट्राचे राजकारण, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, पान क्रं. ४३.

३. व. मं. सिरसीकर, आधुनिक महाराष्ट्राचे राजकारण, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, पान क्रं. ४५.

४. संयुक्त महाराष्ट्र लढ्याचा देदीप्यमान इतिहास, मार्मिक व्यंगचित्र साप्ताहीक, कार्यकारी संपादक – पंढरीनाथ सावंत, दि. १३ मार्च २०१६, पान. क्रं. १६.

५. राजेश्वरी देशपांडे, कॉंग्रेस, महाराष्ट्रातील सत्तासंघर्ष–राजकीय पक्षांची वाटचाल, संपादक – सुहास पळशीकर, सुहास कुलकर्णी, समकालीन प्रकाशन, पान.क्रं. २५.

६. व. मं. सिरसीकर, आधुनिक महाराष्ट्राचे राजकारण, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, पान क्रं. ४९.

७. रमेश बालवड, अहमदनगर जिल्हा विशेषांक, विद्याभारती प्रकाशन, पान क्रं. ५.

८. रा. नी देशमुख, आपला अहमदनगर जिल्हा, कल्पना प्रकाशन, नांदेड, पान क्रं. ३४.

९. रा. नी देशमुख, आपला अहमदनगर जिल्हा, कल्पना प्रकाशन, नांदेड, पान क्रं. ३६.

१०. रा. नी देशमुख, आपला अहमदनगर जिल्हा, कल्पना प्रकाशन, नांदेड, पान क्रं. ३८.

११. रा. नी देशमुख, आपला अहमदनगर जिल्हा, कल्पना प्रकाशन, नांदेड, पान क्रं. ३५.

१२. डॉ. संतोष दास्ताने, महाराष्ट्र २०१२, नितीन प्रकाशन, पुणे, पान क्रं. २४३.

१३.डॉ. प्रकाश पवार, महाराष्ट्राच्या नव्या राजकारणची पुनर्रचना, प्रतिमा प्रकाशन, पान. क्र. २३५.

१४.चंद्रकांत भुजबळ, लोकप्रतिनिधी निवडणूक मार्गदर्शक (लोकसभा मतदारसंघ पुनर्रचना) पॉलिटिकल रिसर्च ॲण्ड ॲनालिसेस ब्युरो, लोकमित्र प्रकाशन, पुणे, पान कं. १३१.

१५.चंद्रकांत भुजबळ, लोकप्रतिनिधी निवडणूक मार्गदर्शक (लोकसभा मतदारसंघ पुनर्रचना) पॉलिटिकल रिसर्च ॲण्ड ॲनालिसेस ब्युरो, लोकमित्र प्रकाशन, पुणे, पान कं. १३५.

१६. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, अहमदनगर जिल्हा २००३—०४, पान कं. ०१.

१७. बन्सी बिहारी पंडीत, शिक्षणातील संशोधन, नित्यनूतन प्रकाशन, पान कं. १२.

१८.डॉ. प्रदीप आगलावे, संशोधन पध्द्तीशास्त्र व तंत्रे, विद्या प्रकाशन नागपुर, प्रथमावृत्ती जाने. २०००, पान कं. १८

१९.डॉ. प्रदीप आगलावे, संशोधन पध्द्तीशास्त्र व तंत्रे, विद्या प्रकाशन नागपुर, प्रथमावृत्ती जाने. २०००, पान कं. २५

२०.डॉ. प्रदीप आगलावे, संशोधन पध्द्तीशास्त्र व तंत्रे, विद्या प्रकाशन नागपुर, प्रथमावृत्ती जाने. २०००, पान कं. १२०

२१.डॉ. वि. रा. भितांडे, शैक्षणिक संशोधन पध्द्ती, नित्यनूतन प्रकाशन, पान कं. ८२.

२२.डॉ. वि. रा. भितांडे, शैक्षणिक संशोधन पध्द्ती, नित्यनूतन प्रकाशन, पान कं. ६८

## प्रकरण २ रे :

## मारूतराव घुले पाटील : जीवनचरित्र.

### २.१. परिचय :

महाराष्ट्र राज्य म्हणजे सहकाराचा महापूर. या महापूरात वाहणाऱ्या काही महत्वाच्या जिल्ह्यांपैकी अहमदनगर हा एक महत्वाचा जिल्हा होय. या जिल्ह्यात एकूण १४ तालुके असून प्रत्येक तालुक्याला वेगळी वैशिष्टये व ऐतिहासिक वारसा लाभला आहे. उदा. शिवकालीन प्रसिध्द् मुंगी तह शेवगाव तालुक्यात झालेला आहे. तर श्री. संत ज्ञानेश्वर महाराजांनी नेवासे तालुक्याच्या पावन भूमीत ज्ञानेश्वरी सांगितली आणि श्री. सदगुरू सचिदानंद बाबांनी ती लिखित केले हा अध्यात्मिक इतिहास आहे. तसेच हिंदू—मुस्लिम ऐक्याचे प्रतिक असणारे बन्नोमॉची दर्गा शेवगाव तालुक्यातील बोधेगाव याठिकाणी अशा प्रकारे प्रत्येक तालुक्याला आपापल्यापरीने वेगवगळी ओळख, महत्व आहे. याप्रमाणेच चिक्कूसाठी प्रसिध्द् असणारा श्रीरामपूर तालुका अहमदनगर जिल्हयातील एक महत्वाचा व वैशिष्टयपूर्ण जिल्हा आहे. या तालुक्यातून दक्षिण अमृतवाहीनी ( प्रवरा नदी ) वाहते. याच अमृतवाहीनीच्या तिरावर पढेगाव नावाचे एक मध्यम स्वरूपाचे गाव वसलेले आहे. पूर्वी पढेगाव हे राहूरी तालुक्यात मोडायचे मात्र भूखंड रचनेनुसार ते कालांतराने श्रीरामपूर तालुक्यात विलीन झाले. आकाराने हे गाव तसे लहानच मात्र माणूसकीने पुढारलेले आहे. विविध जाती—धर्माचे लोक या गावात वास्तव्य करतात मात्र कधीही त्यांच्यात वादविवाद आढळले नाहीत. गावात कुठल्याही धर्माचा सण, उस्तव असला तरी सर्व जातीधर्मांचे लोक एकत्र येवून तो आनंदाने पार पाडत असत आणि आजही तीच परंपरा तेथील समाज जपत आहे. गाव एकत्रीत व आनंदीत रहावे यासाठी गावातील बनकर कुटुंबाने विशेष परिश्रम घेतलेले आहे त्यामुळे या कुटुंबाचे योगदान विसरूण चालणार नाही.[१]

हनुमंतराव बनकर हे गावातील एक प्रतिष्ठीत व्यक्ती, गावावर अतुट प्रेम करणारे व्यक्तिमत्व. त्यांच्यानंतर त्यांचे चिरंजीव दादा पाटील बनकर यांनी त्यांचा वारसा चालविला. अगदी वडील हनुमंतरावांप्रमाणेच दादा पाटीलांनीही गावातील लोकांच्या अडया–अडचणींमध्ये सहभाग घेत सामाजिक बांधिलकी जपण्याचा प्रयत्न केला. दादा पाटील पेशाने शेतकरी असल्याने शेती आणि गाव हा त्यांचा नित्यक्रम असायचा. वारकरी सांप्रदायात असल्याने मुखामध्ये कायम श्रीहरी विठठ्लाचे नामस्मरण, तुकोबा–ज्ञानोबांचे अभंग असायचे. स्वभावही अतिशय मयाळू कधी कुणास फटकारून बोलणे नाही की कोणाबदद्ल मनात कटुता बाळगली नाही. दादापाटील म्हणजे अतिशय नम्र असणारं व्यक्तिम होय. दादा पाटीलांची परिस्थिती तशी साधारणच पणं गावात कुणास काही गरज पडली तर मागचा–पुढचा विचार न करता दादा पाटील पिडीत कुटुंबांसाठी धावत. यासाठी त्यांना त्यांच्या सौभाग्यवती विठाबाईचा मोठा आधार रहायचा. दु:खातही खंबीरपणे दादा पाटीलांच्या सोबत असणाऱ्या विठाबाई देखिल तितक्याच प्रेमळ व सेवाधारी जितके दादा पाटील. म्हणून तर गावातील लहाना थोरांसकट त्यांना ‘विठाआई’ म्हणून प्रेमाणे हाक मारत. लेकराच्या हाकेला मायेनं धावून जावं तसं विठाआई गावच्या हाकेला धावून जात. गावातील बायांना मन मोकळे करण्याचे ठिकाण म्हणजे विठाआईचे घर कारण विठाआई कधी कोणावर राग धरत नसत आणि कुणाला फटकारूनही बोलत नसत. समोरच्याच बोलणं शांतपणे ऐकूण घेत व अडचण दूर करण्यासाठी मदत करत, सल्ला देत. गावाला एकत्रीत ठेवण्याचा जणू बनकर कुटुंबाने विडाच घेतला की काय असे वाटायचे. कारण कुणाचे काही अडले की लगेच दादा–विठाबाई बनकर या दांपत्याकडे लोक निवाडा करण्यासाठी येत. हे दादा पाटीलांना गावाने दिलेलं मोठेपणं होतं. मात्र या मोठयापणाचा दादा पाटीलांनी कधी डंका वाजविला नाही की कधी स्वत:च्या टिऱ्या बडवून घेण्यात धन्यता मानली नाही. विठाआई आणि दादा पाटीलांचा अश्या पध्द्तीने गावगाडा चालू असताना त्यांना एक मूल झाले. बनकर कुटुंबासोबत गावानेही आनंद व्यक्त केला. आणि या आंनदीमय वातावरणात मुलाचे नाव आनंद ठेवण्यात

आले. विठाआई मागील कामाचा व्याप आता आणखी वाढला होता. कारण आधी शेतीतील कामे बघून गावगाड्यात लक्ष पूरविता येत होते. मात्र आता आनंदरावांचेही संगोपन करायला पुष्कळ वेळ जात होता. असे असले तरी आनंदाचे लाड पूरवित असताना विठाआई आणि दादापाटीलांनी कधीच गावाकडे दुर्लक्ष केले नाही, त्यांनी आपली निस्वार्थी व नितांत भक्ती आणि सेवा कधीच सोडली नाही. दिवसा मागून दिवस सरत होते. अशात विठाआईनाही पुन्हा दिवस गेले होते. आनंदराव दिड—दोन वर्षाचे असताना विठाआईंना दुसरे आपत्य झाले. त्याचे नाव रावसाहेब ठेवण्यात आले. विठाआई — दादापाटील आपल्या मुलांवर चांगले संस्कार व्हावेत म्हणून अगदी मुलांच्या बालवयापासूनच सामाजिक क्षेत्राशी निगडीत गोष्टी सांगत, त्यांना देशभक्तीचे शिक्षण देत. त्यावेळी देशभक्तिचे शिक्षणही छुप्या पध्दतीनेच द्यावे लागत. कारण त्या काळात भारतावर ब्रिटिशशाहीचा पगडा होता. देशभक्तीचे नारे देणाऱ्याला फासावर लटकविले जात होते. दिवसभर रानात काबाड कष्ट करून सायंकळी भजन, किर्तन असा नित्यक्रम बनकर घराण्याचा असायचा. हे सर्व चालू असताना आनंदराव आणि रावसाहेब यांच्या भेटीला आणखी एक भाऊ येणार होता. ही बातमी गावात वाऱ्यासारखी पसरली आणि गावातील लोक पुन्हा सुभेच्छा, आशिर्वाद घेऊन विठाआईंच्या भेटीला आले. शेवटी आनंदराव आणि रावसाहेबांच्या भेटीला त्यांचे भाऊ आले, यावेळी आनंदरावांना थोडेफार कळत होते. त्यामुळे बाळाचे संगोपनात त्यांची खुप मदत झाली. आपल्या लहानग्या भावासोबत आनंदराव आणि रावसाहेब कायम सावलीसारखे उभाच असायचे. बाळाचे नाव ठेवण्याचा कार्यक्रम आखण्यात आला. त्यासाठी गावतील लोकांना आमंत्रित करण्यात आले. सर्वांच्या साक्षीने बाळाचे नाव विश्वनाथ ठेवण्यात आले. हेच विश्वनाथ बनकर पुढे घुले घराण्यात दत्तक जाऊन मारूतराव घुले होतात आणि जनसामान्यांचे नेते होतात.[२]

## २.२. जन्म आणि बालपण :

१४ सप्टें. १९३० ची रात्र सरली आणि १५ सप्टेंबरची पहाट उजाडली. पक्ष्यांची किलबिलाट सुरू झाली, गावातील माता—भगिनी सडा रांगोळी घालण्यात दंग होत्या तर कुणी काकडा आरतीमध्ये तल्लीन होते. अशातच सुर्यनारायनाने हळूच वर डोके काढले आणि दर्शन दिले, वातावरण अगदी प्रसन्न, आनंदीमय होते अशा या मंगलमय वातावरणात विठाआईंनी आपल्या तृतीय रत्नास जन्म दिला. भाऊ आनंदराव आणि रावसाहेब यांचा आनंद गगणात मावेनासा झाला कारण घरात लहान बाळ आल्याने त्यांना खेळण्यासाठी एक चांगला मित्र आला होता. विठाआई—दादापाटीलांप्रमाणेच भावंडांनी तसेच गावकऱ्यांनी बाळास मायेची सावली दिली. बाळाचे नाव विश्वनाथ ठेवण्यात आले. लहानपणी विश्वनाथराव आई—वडिलांपेक्षा भावंडाच्या मांडीवर जास्त खेळले. कारण विठाआई—दादा पाटील दिवसभर शेतात काम करत असताना विश्वनाथरावांना सांभाळण्याचे काम आनंदराव व रावसाहेबांवर होते. हळू हळू दिवस सरत होते, सरत्या दिवसाबरोबर मारूतरावांची दिव्यताही फळास येत होती. विश्वनाथराव अत्ताच कुठेतरी बोलू लागले होते, त्यांच्या ओघवत्या बोबड्या शैलिमुळे त्यांना अनेकजण उचलून घेत व मुद्दामहून नाव विचारत त्यावेळी विश्वनाथराव आपल्या बोबड्या शैलित नाव सांगत 'विश्वनात दादा बनकल', असे ऐकताच गावकऱ्यांत हस्या पिकत असे. विश्वनाथराव बालपणापासूनच एक संशोधक होते असे म्हंटले तरी हरकत नाही. कारण आपण जेंव्हा एखादी नवीन गोष्ट पाहतो तेंव्हा आपण त्या गोष्टीबद्दल फक्त कुतुहल बाळगतो. मात्र विश्वनाथरावांचं जरा वेगळं होतं. एखादी गोष्ट बघून केवळ तिचे कुतुहल करणे एवढयावरच न थांबता ही गोष्ट काय आहे? ती कशी निर्माण होते? ती कशासाठी निर्माण झाली आहे? असे ऐक—ना—अनेक प्रश्नांची उत्तरे जाणून घेण्याचा विश्वनाथरावांचा प्रयत्न असायचा. अगदी घरातही एखादी नवीन वस्तू दिसली की ते आपल्या आईवडीलांना व भावंडाना मोठ्या उत्सुकतेने त्या वस्तूबदद्ल विचारत. जोपर्यंत समाधानकारक उत्तर मिळत नाही तोपर्यंत ते घरच्यांचा पिछाच सोडत नसे. कधी—कधी आनंदराव व

रावसाहेबांना इतके प्रश्न विचारत की दोघेही उत्तर देताना कंटाळून जात. अनेकदा दोन्ही भावांकडे उत्तरे नसायची अशावेळी विश्वनाथराव कोणकडूनही त्या प्रश्नांची उत्तरे मिळवित. हा त्यांचा स्वभाव त्यांच्यातील बाल संशोधक जागृत ठेवतो.[३]

विश्वनाथरावांचे कुटुंब साधे, सरळ व सेवाभावी होते. घरची शेती होती त्यामुळे जे काही थोडफार पिकत त्यावर त्यांच्या कुटुंबाचा उदारनिर्वाह चालत असे. गावात कधी कुणाशी भांडण — तटा नाही की कोणाला खोचक बोलणे नाही यामुळे गावातील मंडळी बनकर घराण्याशी एकनिष्ठ राहत तर बनकर कुटुंबही इतर कुटुंबांशी जुळवून घेत असे. घरची परिस्थिती साधारण असल्याची विश्वनाथराव व त्यांच्या घरच्यांना कधीच वाईट वाटले नाही. कारण रक्तातच सामाजिक बांधिलकी असल्याने त्यांनी प्रतिष्ठेपेक्षा सेवेला जास्त महत्व दिले. कायम निस्वार्थ भावनेतून सेवा देत राहीले आणि एक—एक पाऊल पुढे टाकत राहीले. विश्वनाथराव आता शाळेत जाण्याइतके मोठे झाले होते त्यामुळे त्यांनी गावातील शाळेत प्रवेश घेतला आणि शाळेत जाऊ लागले. इकडे आनंदराव व रावसाहेब आपल्या आईवडीलांना कामात हातभार लावत होते. विश्वनाथरावांचे आता शाळेत चांगलेच मन रमायला सुरूवात झाली होती.

## २.३. शालेय जीवन :

विश्वनाथराव थोडेफार कळते झाल्यावर त्यांना शालेय शिक्षण घेता यावे आणि पुढे चालून एखादी पोटापुरती नोकरी करता यावी या हेतूने दादा पाटीलांनी विश्वनाथरावांना गावच्या शाळेचे मुख्याध्यापक श्री. ढुमणे गुरूजींकडे सोपविले. विशेष म्हणजे शिक्षणाची आवड स्वत:हून जोपासल्याने इतरांसारखे त्यांना बळजबरीने शाळेत पाठवावे लागत नसे. ते स्वत:हून शाळेत जात. शाळेत मुख्याध्यापक ढुमणे गुरूजींच्या मार्गदर्शनाने योग्य दिशा मिळत. ढुमणे गुरूजींनी विश्वनाथरावांना एक चांगली व अतूट सवय लावली ती म्हणजे वाचणाची. विश्वनाथरावांना त्या काळात समाजाला देशभक्तीचे शिक्षण देणारे पूजनीय साने गुरूजींचे साहीत्य वाचण्याचा छंदच जडला होता. साने गुरूजींचे

साहीत्य वाचून त्यांचे विचार प्रत्यक्ष जीवनात आणण्याचा प्रयत्न विश्वनाथराव करत, म्हणूनच तर त्यांच्यात शिस्त, सहनशिलता, संयम, वकृत्व, नेतृत्व, इत्यादी यांसारखे गुण लहानपणीच अंगीभूत झाले यामुळे लहानपनीच त्यांच्यातील देशभक्ति उफळया मारू लागली. एकीकडे पूज्य साने गुरूजींच्या साहीत्याचा प्रभाव तर दुसरीकडे त्यावेळी समस्त भारतात एकच वारं वाहत होतं ते म्हणजे देशभक्तिचं. स्वातंत्र्याची मागणी करत संपूर्ण भारतीयांनी ब्रिटिशांविरूध्द् लढा उभारला होता. या लढयात विश्वनाथरावांचे मोठे बंधूही सहभागी असत. त्यामुळे या सर्व वातावरणाचा प्रभाव विश्वनाथरावांवर होणे साहजिकच होते. एखाद्या दिवशी काही अन्याय अत्याचाराची घटना विश्वनाथरावांच्या कानावर आली की ते आपल्या भावंडांपाशी येवून बसत आणि म्हणत की, 'चला आपण जाऊन या गोऱ्यांना मारून टाकू'. दुसऱ्या दिवशी आनंदराव ही हकीकत मुख्याध्यापक ढुमणे गुरूजी व आपल्या मित्रांना सांगायचे आणि एकदमच हस्या पिकायचा.[४]

ढुमणे गुरूजी पेशाने गुरूजी होते मात्र महात्मा गांधीजी आणि त्यांच्या कार्यावर त्यांची नितांत भक्ति होती. समाजाला देशभक्तिचे महत्व कळावे म्हणून ढुमणे गुरूजी गांधीजींचे विचार खेडोपाडी सांगत, यासाठी त्यांना सायकलवर कितीतरी दूर प्रवास करावा लागत असे. विद्यार्थ्यांना देशभक्ति कळावी तसेच त्यांच्यामध्ये देशाविषयी आपुलकी निर्माण व्हावी म्हणून ढुमणे गुरूजींनी शाळेत स्काऊट पथक उभारले होते. या स्काऊट पथकातून मुलांना सत्य, निष्ठा, एकता, राष्ट्रप्रेम, स्वातंत्र्य तसेच बंधूता यांसारख्या गोष्टी शिकविल्या जात. ढुमणे गुरूजींनी विश्वनाथरावांनाही या पथकात समाविष्ट करून घेतले. विश्वनाथरावांच्या अंगी मुळतःच असेलेली शिस्त, संयमता तसेच समजूतदारपणा पाहून ढुमणे गुरूजींनी त्यांना पथनायक केले. गुरूजींनी तयार केलेली बौध्दिके विश्वनाथराव पूर्वतयारीने पथकासमोर मांडत असे. काही अपवाद वगळता उत्तर हे विश्वनाथरावांनाच सोडवावे लागत. जसजसे विश्वनाथरावांचे वय वाढत होते तसतसे त्यांच्यातील सुप्त गुण फळास येत होते आणि त्यांच्यावरील जबाबदाऱ्याही वाढतच होत्या. विश्वनाथराव कधीच एकटे

नसायचे कायम सात—आठ मित्र सोबतीला असायचे. पुढे चालून हा एक चांगला मोठा नेता होणार असे शाळेतील मास्तर म्हणत असत. खेळातही विश्वनाथराव मागे नव्हते. कबड्डी आणि खो खो हे त्यांचे आवडते खेळ प्रकार. या दोन्हीही खेळांमध्ये विश्वनाथराव एकदम तरबेज होते. त्यामुळे ते घरच्यांप्रमाणे शाळेतही सर्वांचेच लाडके राहीले.

गावातील प्राथमिक शिक्षण पूर्ण करून विश्वनाथराव पुढील शिक्षणासाठी श्रीरामपूर येथे आले. श्रीरामपूर हा अहमदनगर जिल्ह्यातील एक महत्वाचा तालुका आहे. येथील मॉडर्न हायस्कूलमध्ये प्रवेश घेवून पुढील शिक्षण सुरू केले. येथे आल्यानंतरही विश्वनाथरावांनी आपल्या व्यक्तिमत्वावर भर दिला व अल्पावधीतच प्रसिध्द्रीस आले. मॉडर्न हायस्कूलचे प्राचार्य व शिक्षक ढुमणे गुरूजींना पत्राव्द्रारे तसेच कधी भेटल्यावर विश्वनाथरावांचा विषय काढत असे आणि आपल्या लाडक्या शिष्याचे गुणगाण ऐकताना ढुमणे गुरूजी स्वत:त हरवून जायचे. विश्वनाथरावांचा शाळेत कायमच जयजयकार असायचा. कारण शाळेत एखादा कार्यक्रम असेल आणि व्यासपीठावर विद्यार्थ्यांना मनोगत व्यक्त करायचे सांगितले तर अनेकजण नकार द्यायचे. विश्वनाथराव मात्र सगळयात पुढे असायचे. अशा पध्द्तीने विश्वनाथराव वकृत्व, नेतृत्व, कला—क्रिडा तसेच अभ्यासू अशा सगळयाच क्षेत्रात पारंगत होते.[५]

१९४२ साली गांधीजींचा संपूर्ण भारतभर स्वातंत्र्यासाठीचा समर्पक लढा सुरू होता. या लढयाची ठिणगी पढेगावातही पडली. पढेगावातील काही तरूण एकत्र येवून हा लढा बळकट बनविण्यात सहकार्य करत होते. मात्र पढेगावातील युवकांना नेतृत्वाची गरज होती. कोणास नेतृत्व द्यावे? कोण प्रभावीपणे आपले विचार मांडू शकेल, याचा विचार पढेगावकर करत होते. अशातच विश्वनाथरावांचे नाव पुढे आले. वयाच्या अवघ्या १२ व्या वर्षी विश्वनाथरावांनी गांधीजींच्या समर्पक लढयाचे पढेगावातून प्रभावीपणे नेतृत्व केले. पुढे मात्र १९४४ च्या सालामध्ये मारूतरावांच्या आयुष्यात एक दूर्देवी घटना घडली. ती म्हणजे विश्वनाथरावांचे वडील दादा पाटील बनकर यांचे वृध्दापकाळाने निधन

झाले. डोकयावरील वडीलांचे छत हरपल्याने विश्वनाथराव व त्यांची भावंडे अतिशय दु:खी झाली. हळूहळू स्वत:ला सावरत घरच्यांनी विश्वनाथरावांना पुन्हा श्रीरामपूर येथे शिक्षणासाठी पाठविले. श्रीरामपूरला आल्यानंतर राष्ट्रभक्त अच्युतराव पटवर्धन, एस.एम.जोशी यांची भाषणे ऐकण्याचा योग विश्वनाथरावांना आला. या भाषणांनी प्रभावीत होवून त्यांनी राष्ट्र सेवा दलात सहभाग घेतला आणि वारंवार दलाच्या शिबीरातही सहभाग घेण्यास सुरूवात केली. स्वातंत्र्यानंतर या दलाची स्वतंत्र संस्थेत रूपांतर झाले, आणि कला, नेतृत्व, वकृत्व तसेच शिस्त यांसारख्या गुणांमुळे विश्वनाथराव श्रीरामपूर तालुक्यासाठी राष्ट्र सेवा दलाचे प्रमुख झाले. तालुक्यात या संस्थेला भरभराटीला आणण्यात विश्वनाथरावांचे मोठे योगदान राहीले आहे. ढुमणे गुरूजींनी विश्वनाथरावांना शिक्षणाचे बाळकडू दिले आणि योग्य व न्यायाचा मार्ग दाखवून दिला. आपल्या गुरूंनी दाखवून दिलेल्या मार्गानेच विश्वनाथरावांनी प्रवास केला आणि यशाची एकेक पायरी पार करत राहीले. आपल्या प्रामाणिक व निस्वार्थी वृत्तीमुळे विश्वनाथराव जनसामान्यांत प्रिय ठरू लागले.

## २.४. घुले घराण्यात प्रवेश :

दादा पाटीलांच्या मृत्युनंतर गावकऱ्यांनी विश्वनाथराव व त्यांच्या कुटंबाला मोठा मायेचा आधार दिला. वडीलांचे छत्र हरपल्यानंतर विश्वनाथरावांच्या शिक्षणावर याचा परिणाम होवू नये यासाठी आनंदरावांनी त्यांची उणीव भरूण काढली व मोठा भाऊ म्हणून त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहीले. यामुळे विश्वनाथरावांना धीर मिळत असे. आई—वडीलांनी व गुरूजन वर्गांनी केलेल्या संस्काराची जाणीव ठेवत विश्वनाथरावांनी आपले सामाजिक कार्य सुरूच ठेवले. या काळातच बडोद्याचे श्री. जगधने पाटील हे बनकर कुटुंबियांच्या भेटीला आले. पढेगावला येण्याआधी श्री. जगधने दहिगाव—नेच्या ग.भा.लक्ष्मीबाई घुले यांना भेटून आले होते. दहिगाव—ने हे शेवगाव तालुक्यातील एक गजबजलेलं गाव. दहिगाव म्हणजे दरोडेखोरांचा अड्डा, कायम या गावात लुटारूंचा थैमान असायचा. दिवसादेखील स्त्रीयांना बाहेर येण्याची व मुक्तपणे संचार करण्याची

भिती असायची, लुटारूंनी अनेकदा विहीरीवर पाणी आणण्यासाठी गेलेल्या बायकांचे दागीने तर ओरबाडलेच पण त्यांच्या अब्रुची लफ्तरेही तोडली, यामुळे ज्या स्त्रीयां आपल्या पतीला परमेश्वर तसेच आपलं सर्वस्व मानत होत्या तेच पतीपरमेश्वर त्यांच्यावर चारित्र्यहीनासारखा धब्बा लावत त्यांना घराबाहेर काढत. या स्त्रीयांची काहीही चुक नसताना त्यांना बेघर व्हावे लागत होते. तेव्हा तर बऱ्यापैकी पुरूषप्रधान संस्कृतीचा पायंडा भारतीय लोकांच्या मानसिकतेत होता. दरोडेखोरांच्या भितीने रात्री सुखाची झोपही नसायची, कारण झोपी गेले की घरातील वस्तू दरोडेखोर लुटून नेतील याची लोकांना भिती असायची. असे सर्व वातावरण चालू असताना गावचे वतनदार श्री. शंकरराव घुले पाटील यांनी दरोडेखोरांचा बंदोबस्त व्हावा, आया—बहीणींना सुखाने संसार करता यावा तसेच लोकांच्या मनातील भिती दूर व्हावी यासाठी शंकरराव पाटीलांनी प्रयत्न सुरू केले. शंकरराव घुले पाटील हे दहिगाव—ने चे पोलिस पाटील होते, तर लक्ष्मीबाई घुले व रूख्मिणीबाई घुले या त्यांच्या सहचरिणी होय. शंकरराव घुले पाटीलांनी गावातील लोकांना एकत्र करून दरोडेखोरांविरूध्द् मोहीम आखली. यात त्यांना बऱ्यापैकी यश मिळाले. गावातील आया—बहिणींचे आशिर्वाद मिळू लागले. दरोडेखोरांनी शंकरराव पाटीलांचा चांगलाच धास्ता घेतला होता. शंकरराव पाटीलांनी गावात सामाजिक कार्यक्रम आयोजित करून जनजागृती सुरू केली. अशा पध्द्तीने त्यांचे सामाजिक कार्य सुरू असतानाच काळाने त्यांच्यावर झडप घेतली आणि १९४४ साली शंकरराव पाटील अनंतवासात विलीन झाले. त्यांचे असे अचानक जाणे गावाला परवडणारे नव्हते. कारण गावातील लुटामारींचा खेळ पुन्हा सुरू होतो की काय याची सर्वांना भिती वाटत होती. वंशाला दिवा नसल्याने लक्ष्मीबाई आता एकाकी पडल्या होत्या. मोठा वाडा, घरची संपत्तीही धनदांडगी मात्र एकटेच जीवन या सर्वांत लक्ष्मीबाईंचे मन रमत नव्हते. अशातच त्यांच्या भेटीला बडोद्याचे श्री. जगधने आले आणि त्यांनी एखादा मुलगा दत्तक घ्यावा यासाठी लक्ष्मीबाईंची मनधरणी केली. लक्ष्मीबाईंनीही दत्तक पुत्र घेण्यासाठी सहमती दर्शवली आणि श्री. जगधने यांच्यापुढील मार्ग सुकर झाला. त्यांनी लगेच पढेगावचे आनंदराव बनकर व

त्यांच्या मातोश्री विठाबाई बनकर यांना भेटून विश्वनाथरावांना घुल्यांकडे दत्तक म्हणून राहू द्या अशी विचारणा केली. शेवटी कुठल्या आईला आपल्या मुलाशी ताटातूट आवडेल. मात्र बऱ्याच विचार केल्यानंतर विठाबाईंनी मन घट्ट् करून होकार दिला. आणि १९४९ साली वयाच्या १९ व्या वर्षी विश्वनाथरावांचा दत्तकविधान होवून ते घुले पाटील झाले. त्यांची ओळख आता विश्वनाथ बनकर नसून मारूतराव घुले अशी झाली होती. दहिगावातही ही बातमी सगळयांना कळाली होती. सुरूवातीला कोणाला याबदद्ल विशेष वाटत नव्हते. ‘पाटलीन बाईंनी मुलगा दत्तक घेतला’ यापलिकडे साधी चर्चाही होत नसे. शंकररावांचा मृत्यूनंतर गावातील एकता विस्कटीत झाली होती. गावची सत्ता म्हणजे बलाढय व श्रीमंतांची मक्तेदारी बनली होती. गरिबांची तसेच शेतकऱ्यांची पिळवणूक होण्यास प्रारंभ झाला होता, सावकरशाहीनेही वर डोके काढले होते, सामान्य माणूस पूर्णपणे भरडला जात होता, लुटमार पुन्हा सुरू झाली होती अशा या चक्रव्यूहात गावकरी फसत चालले होते. हे थांबलं पाहीजे असं सर्वांनाच वाटत होते मात्र ते फक्त मनोमणीच. कारण कुणीही पुढाकार घेण्यास तयार नव्हते. सुदैवाने मारूतरावांच्या रूपात दहिगावला एक लढाऊ आणि प्रयत्नशील नेता मिळाला. आणि गावाची पिळवणूक थांबली.[६]

## २.५. खरा समाजसेवक :

शालेय जिवनातच खऱ्या अर्थाने मारूतरावांना सामाजिक कार्याचा ध्यास जडलेला होता. गावातील रस्ते साफ करणे, वकृत्वातून भरकटलेल्या समाजाला वळणावर आणणे, लोकांना अडयाअडचणीत सहकार्य करणे तसेच गांधीजींचे विचार लोकांना पटवून देत लोकांना अहिंसेकडे वळविणे अशा नाना प्रकारांतून मारूतराव आपले सामाजिक कार्य पार पाडत असे. ढुमणे गुरूजींनी दिलेल्या ज्ञानाची शिदोरी आयुष्यभर पुरेल एवढी होती. म्हणून तर मारूतरावांना घडविणाऱ्या शिक्षणामध्ये त्यांचे नाव प्रथम स्थानावर असते. मारूतरावांना शिक्षणाचे बाळकडूच मुख्याध्यापक ढुमणे गुरूजींनी दिले असे म्हंटले तरी वावगे ठरणार नाही.

शिक्षणाच्या निमित्ताने मारूतराव श्रीरामपूर येथे असताना, तालुक्यातील प्रवरा नदीला पूर आला. या पूराने तालुक्यातील काही गावे वेढली गेली तर काही गावे उध्वस्त झाली. पूराची बातमी तालुक्यात वाऱ्यासारखी एवढी पसरली की ती थेट मारूतरावांपर्यंत पोहचली. बातमी कळताच मारूतराव आपल्या काही मिंत्रासोबत पढेगावला आले. आल्याआल्या गावची परिस्थिती पाहीली आणि उर भरून आले. कारण पाण्याने गावाला चहुबाजूने वेढा दिला होता. प्रत्येकास मदतीची गरज होती हे मारूतरावांना जाणवू लागले. कारण याक्षणी आपण गावकऱ्यांची मदत केली नाही तर त्यांच्याकडे कपाळाला हात लावून नशिबाला दोष देत बसण्यापलिकडे काहीच उरणार नाही. आपल्यासोबत आलेल्या मित्रांना घेवून मारूतराव गावच्या मदतीला लागले. कुणचे धान्य, कुणाची जनावरे, कुणाची कपडे, इत्यादी शेवटपर्यंत जेवढे शक्य तेवढे वाचविण्याचा प्रयत्न केला. यात काहीजणांच्या अतिमहत्वाच्या वस्तूही वाचविण्यात मारूतराव व त्यांच्या मित्रमंडळींना यश मिळाले. लोकांनी मारूतरावांचा जयजयकार केला, 'आज तुझ्यात बापाची छाया बघायला भेटले बघ, दादा पाटीलांची उणीव भरूण काढलीस पोरा'. असं म्हणत काहीजणांनी आशिर्वाद देवू केले. दादापाटील म्हणजे सामाजिक सेवेचा महावृक्ष मग या महावृक्षाच्या फांद्या कश्याकाय बरं साधारण असणारं. मारूतरावच नाही तर आनंदराव व रावसाहेब पाटील बनकर यांनीही सामाजिक सेवेत योगदान दिलेले आहे. आई—वडील यांनी केलेले संस्कार आणि ढुमणे गुरूजींनी दिलेला मार्ग तसेच स्काऊट पथक आणि राष्ट्रसेवा दलाने दिलल्या प्रेरणेने मारूतराव आपले कार्य पार पाडत होते.[७]

## २.६. विकासपुरूष :

१९४९ मध्ये दत्तकविधान होवून मारूतराव दहिगाव—ने येथे स्थायिक झाले. काही काळातच मारूतरावांना गावच्या पोलीस पाटीलकीचे वतन मिळाले. पदभार स्विकारून मारूतरावांनी प्रत्यक्षपणे कामाला सुरूवात केली. गांधीजींचे ग्रामस्वच्छतेचे प्रयोग गावात सुरू केले. दर शुक्रवारी गावकऱ्यांच्या सहकार्याने

गावात श्रमदान सुरू केल, गावास एका चौकटीत आणण्यासाठी मारूतरावांनी विशेष प्रयत्न केले. दहिगाव—ने ची ख्याती बाहेर गावांपर्यत पोहचली. श्री. संत गाडगेबाबा स्वत: गावातील कामे बघायला आले होते तेव्हा त्यांनी मारूतरावांची भेट घेवून त्यांना भावी कार्यासाठी सुभेच्छा दिल्या. सावकारशाहीचा बिमोड करून १९५४ साली श्शेतकऱ्यांच्या हितासाठी दहिगाव—ने येथे ‘दहिगाव—ने विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी’ स्थापन केली. या सोसायटीमार्फत शेतकऱ्यांना अल्पव्याजात कर्ज उपलब्ध

करून दिले. विद्यार्थ्यांना जवळच शिक्षण घेता यावे म्हणून त्यांनी आपल्या काही सहकाऱ्यांना सोबत घेवून १९५९ साली ‘जनता शिक्षण प्रसारक मंडळा’ची स्थापना केली. आणि नवजीवन विद्यालयाची पायाभरणी केली. इच्छा नसतानेही त्यांना राजकारणात ओढवले गेले. १९६२ ची विधानसभा निवडणूक कॉंग्रेस पक्षाकडून लढवून विजयी झाले. त्याचबरोबर अहमदनगर जिल्हा सहकारी बॅकेत स्थापनेपासून तर शेवटपर्यंत संचालक होते तर अनेकदा चेअरमन. जिल्हा सहकारी बॅकेअंतर्गत शेतकरी, कामगार तसेच गोरगरिबांसाठी विशिष्ट प्रकारचे पॅकेज, अनुदान घोषीत केले. यानंतरही १९६७ ची महाराष्ट्र विधानसभा आणि १९७२ च्या विधानपरिषदेच्या निवडणूकीतही मारूतराव विजयी म्हणून निवडून आले. आमदार असताना मारूतरावांनी १९६५ साली जायकवाडी धरणग्रस्तांचा प्रश्न यशस्वीपणे मार्गी लावला आणि त्यांच्या मुलांसाठी शेवगाव येथे तंत्रशिक्षण विद्यालयाची स्थापना केली. १९६९ साली भेंडा बु! येथे ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याची स्थापना करून अनेकांना रोजगार मिळवून दिला. १९७६ नंतर मारूतरावांनी राजकारणापासून अलिप्त राहण्याचे ठरविले. आमदार नसतानाही तालुक्यातील कामांकडे मारूतरावांनी लक्ष पुरविले. गावगाड्यात आयुष्य गुंतवून घेतले. त्याच बरोबर १९७६ नंतर बरेच वर्षे मारूतराव शारिरिक आजाराने त्रस्त असायचे. गावातील महिलांना राजकारणात प्रवेश मिळावा, त्यांना समाजासमोर ताठ मानेनं उभा राहता यावं म्हणून सर्वांनुमते गावातील सरपंचपद स्त्रीयांसाठी राखीव ठेवण्यात आले व गावाचे एक मार्गदर्शक म्हणून मारूतराव काम बघू लागले. पुढे १९९० साली

महाराष्ट्रात विधानसभा निवडणूक होणार होती. शेवगावमधील कॉंग्रेस पक्षाकडून ही निवडणूक मारूतरावांनी लढवावी म्हणून त्यांच्या कार्यकर्त्यांनी आग्रह धरला. मात्र बराच काळ राजकारणापासून दूर असल्याने आणि प्रचाराला अधिक महत्व न दिल्याने त्याचबरोबर विरोधकांसारखा बळाचा व संपत्तीचा अमाप वापर न करता केवळ इतरांच्या इच्छाखातर निवडणूक लढविली पण यश मिळाले नाही. या अपयशाने मारूतराव तुटले नाही. त्यांनी आपली सेवा सूरूच ठेवली. सत्ता असो अगर नसो पण सामान्य माणूस आपले प्रश्न मारूतरावांकडेच मांडत असे आणि मारूतराव त्यांचे प्रश्न मायेने हाताळत. त्यामुळे त्यांच्या चाहत्यांइतकेच त्यांचे विरोधकही त्यांना खुपच मानतात. राजकारणात त्यांनी कधीच अतातटीची नाती ठेवली नाही अगदी राजकीय विरोधाला फक्त वैचारिक स्थान दिले त्यामुळे कोणाशी कायमस्वरूपी शत्रूत्व नाही, ते अजातशत्रू होते असे म्हंटले तरी चालेल. आपल्या कार्यातून मारूतरावांनी जिल्हयातसमोर एक नवा आदर्श ठेवला आहे.[८]

## २.७. मृत्यू :

शेवगाव आणि नेवासा तालुक्याचे भाग्यविधाते लोकनेते मारूतराव घुले पाटील यांनी इतरांसारखे फक्त बोलून दाखविले नाही तर कृतीतून करून दाखविले. कुठलेही पद असो अगर नसो मात्र सेवा ही निरंतर चालू ठेवली. ८ जूलै २००२ रोजी शेवगाव तालुक्यातील पिंगेवाडी येथे कार्यकर्त्यांचा मेळावा आयोजित करण्यात आला. या मेळाव्याला मारूतरावांची उपस्थिती प्राथनिय होती. या कार्यक्रमाला गेले असता अचानक त्यांना हृदयविकाराचा झटका आला. आणि मारूतरावांवर काळाने झडप घातली. आणि अशा या महान लोकसेवकाचा अंत झाला. त्यांच्या अंतविधिसाठी महाराष्ट्राचे लाडके नेते व माजी केंद्रीय कृषी मंत्री आदरनीय शरदचंद्रजी पवार साहेब आले असता त्यांनी अहमदनगर जिल्हयातील व महाराष्ट्रील कार्यकर्त्यांना मारूतरावांचा आदर्श डोळयासमोर ठेवण्यास सांगितले.[९]

## २.८. समारोप :

अशा प्रकारे मारूतराव घुले पाटील यांचे जीवन चरित्र स्पष्ट होत असून त्यांनी सामाजिक, आर्थिक, राजकीय तसेच सहकार क्षेत्रात दिलेल्या योगदानाचा अंदाज बांधता येतो. मारूतरावांनी केलेले कार्य आणि त्यांचे विचार अजूनही लोकांच्या मनामनात ठासलेले आहे. त्यांच्याच कार्याचा आदर्श समोर ठेवून त्यांचे मुलं आदरनीय नेरेंद्र घुले पाटील व चंद्रशेखर घुले पाटील तसेच नातू क्षितीज घुले पाटील हे तालुक्यात व जिल्ह्यात लोकसेवा करत आहेत.

## संदर्भसूची


०१.भीमराव पाटील, ''भूपुत्राची जीवनगाथा'', श्री. मारूतराव घुले पाटील ५१ सुवर्ण गुणमहोस्तव, संपादक– गडाख यशवंतराव, महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे ४, पान क्रं. ३४

०२. देसाई भाऊसाहेब देशमुख, मुलाखत दि. २४/१०/२०१५.

०३.नरूभाऊ लिमये, ''एक लोभस व्यक्तिमत्व'', श्री. मारूतराव घुले ५१ पाटील सुवर्ण गुणमहोस्तव, संपादक– गडाख यशवंतराव, महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे ४, पान क्रं. १

०४.रा. गो. ढुमणे, ''आवडता विद्यार्थी'', श्री. मारूतराव घुले पाटील ५१ सुवर्ण गुणमहोस्तव, संपादक– गडाख यशवंतराव, महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे ४, पान क्रं. ५४

०५.रा. गो. ढुमणे, ''आवडता विद्यार्थी'', श्री. मारूतराव घुले पाटील ५१ सुवर्ण गुणमहोस्तव, संपादक– गडाख यशवंतराव, महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे ४, पान क्रं. ५५

०६.श्री गुलाबराव घुले, मुलाखत दि. २५/०६/२०१५

०७.भीमराव पाटील, ''भूपुत्राची जीवनगाथा'', श्री. मारूतराव घुले पाटील ५१ सुवर्ण गुणमहोस्तव, संपादक– गडाख यशवंतराव, महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे ४, पान क्रं. ३७.

०८.श्री. रामभाऊ शिदोरे, मुलाखत दि. २१/०९/१५

०९.डॉ. अरूण पवार, मुलाखत दि. २०/११/२०१५

१०.श्री. सकाहरी घुले, मुलाखत दि. १९/०९/२०१५

११.श्री. कारभारी गायके, २५/९/२०१५

## प्रकरण ३ रे

# राजकीय व सामाजिक कार्य

## ३.१. प्रस्तावना :

अनेकदा जिथे राजकीय हा शब्द प्रयोग येतो तेव्हां त्याला जोडूनच सामाजिक असाही एक शब्द आलेला असतो. यावरून असे स्पष्ट होते की, राजकीय व सामाजिक हे दोन शब्द जरीही वेगवेगळे वाटत असले तरी ते एकमेकांवर अवलंबून आहेत हेही तितकेच निर्विवाद. समाजातील राजकीय संस्थांचा, व्यक्तिंचा, त्यांच्या हक्कांचा, न्यायाचा, इत्यादी कला गुणांचा राजकीय अंगाने केला जाणारा अभ्यास म्हणजे 'राजकीय अभ्यास' असा ढोबळ मानाने अर्थ घेता येईल. राजकीय म्हणजे काय हे पुढील मुद्याच्या आधारे अधिक स्पष्ट करता येईल.

### राजकीय म्हणजे काय?

राजकीय ही एक संकल्पना असून तिला विविध अर्थ प्राप्त झालेले आहेत. प्राचीन ग्रीसमध्ये रूढ झालेल्या 'पोलिस' (Polis) या शब्दांतून राजकीय या संज्ञेची उत्पत्ती झाली. पोलिस म्हणजे नगर. राजकीय ही संकल्पना स्पष्ट करताना **हॅना आँरेंट** असे मत मांडतात की, 'राजकीय' असणे म्हणजे समाजात सर्व निर्णय हे चर्चा आणि मतपरिवर्तनाने होतील. तेथे शक्ति किंवा हिंसेला स्थान राहणार नाही. म्हणजे राजकीय ही संज्ञा अशा निर्णय प्रक्रियेकडे निर्देश करते की जेथे शक्ति नसून संवाद अर्थात चर्चा हे माध्यम आहे.[१] राजकीय घडामोडींचा अभ्यास हा राजकीय सिध्दान्ताच्या चौकटीत राहून केला तर तो अधिक शास्त्रशुध्द् व प्रभावी ठरतो. राजकीय सिध्दान्त ही राज्यशास्त्राचीच एक उपशाखा असून वैज्ञानिक ज्ञानशाखा आहे.[२] राजकीय सिध्दान्त ही संकल्पना अधिक स्पष्टपणे लक्षात यावी यासाठी पुढील काही राजकीय विचारवंतांच्या व्याख्या विचारात घ्याव्या लागतील : —

**सेबाइनच्या** मते, राजकीय प्रश्नांचा शिस्तबध्द् शोध म्हणजे राजकीय सिध्द्रान्त होय.'

**अॅड्रयू हॅकर** यांच्या मते, 'ज्या तत्वज्ञानात्मक व शास्त्रीय ज्ञानाच्या संकलनामुळे मग ते केव्हांही व कुठेही केलेले असो आम्ही आज राहत असलेल्या व उद्याही राहणार असलेल्या जगाविषयी आपली समजूत वाढते त्यास राजकीय सिध्दान्त असे म्हणतात.'

**कोकर** यांच्या मते, जनतेच्या गरजा, इच्छा व मते विचारात घेऊन शासनसंस्थांचा अभ्यास जेथे केला जातो त्यास राजकीय सिध्दान्त असे म्हणतात.

राजकीय सिध्दान्त म्हणजे राजकीय घटनांविषयीचे पध्द्तशीरपणे ज्ञान होय.[३]

वरिल व्याख्यांचा विचार करता असे लक्षात येते की राजकीय सिध्दान्त ही समाजातील एकूणच राजकीय घटकांचा शास्त्रशुध्द् पध्दतीने अभ्यास करण्यासाठी विकसित झालेली अभ्यासप्रणाली आहे. राजकीय प्रश्नांची गुंतागुंत सोडविण्यासाठी राजकीय सिध्दान्त अत्यंत उपयुक्त ठरतो. राजकीय घटकाबरोबर सामाजिक घटकांचाही राजकीय सिध्दांतात अभ्यास केला जातो.

समाजसेवा या शब्दामागे कळत—नकळत एक आत्मियता, भावना दडलेली असते. ती माणूसकीची, सेवेची भाषा असते म्हणून ती अबोल असते. मात्र भाषिक मुल्यामुळे समाजसेवा ह्या शब्दाची किंमत कल्पनेपेक्षा जास्त वाढली गेली आणि प्रत्येकास आपण समाजसेवक आहोत असे भासवून स्वत:च्या टिऱ्या बडवून घेण्यात धन्यता वाटू लागली. यामूळे समाजसेवेचा मूळ उदद्ेशच लोप पावत चालला आहे असे म्हंटले तर चुकीचे ठरणार नाही. दया, क्षमा, सेवा, करूणा किंवा सहानुभूती यांसारख्या कितीतरी गोष्टींच्या मागे धावणारे तत्वज्ञान म्हणजे समाजसेवा अशी एक सरळ, साधी आणि सोपी व्याख्या समाजसेवेची केली जात असायची. मात्र जसजसा काळ बदलत आला

तसतसे समाजसेवेचे स्वरूपही बदलत आले. आता तर सामाजिक कार्याला एका प्रकारचा व्यावसायिक फुगवटाच आलेला आहे. मग यात कसली आली करूणा, दया किंवा सेवा. कारण सेवा म्हंटले की मोबदल्याचा प्रश्नच उरत नाही. मात्र आत्ताची सेवा ही मोबदल्याशिवाय देणे कठीण होवून बसले आहे. कारण प्रत्येकजण पैसा, संपत्ती, ऐश्वर्य यांसारख्या गोष्टींच्या मागे धावून आपल्या मूळ कर्तव्याचा घोट घेत आहे. अनेकदा असे दिसून येते की पूर्वी आपण ज्या गोष्टींना सामाजिक सेवा म्हणत असायचो त्या आता आपल्या नैतिक जबाबदाऱ्या होवून बसल्या आहेत त्यामुळे कालानुरूप समाजसेवेचे स्वरूपही बदलले आहे. आजच्या धकाधकीच्या जिवनात माणूस माणसापासून दुरापास्त होत चालला आहे. या दुराव्याबरोबर तो भावनाहीनही बनत चालला आहे. आपण ज्या समाजात राहतो, लहानाचे मोठे होतो तेथील बांधीलकीचाही त्याला विसर पडत चालला आहे.

आजही अनेकजण सामाजिक कार्यात आवर्जून सहभाग दर्शवितात मात्र केवळ स्टंटबाजी करून प्रसिध्दी मिळविण्यासाठीच ही धडपड चाललेली असते. एखाद्या व्यक्तिने काही कार्य केले तर त्याला त्याच्या कार्यापेक्षा दुसऱ्या दिवशीच्या पेपर मध्ये येणाऱ्या छायाचित्राबदद्ल जास्त उत्सुकता असते, ही आजची वस्तुस्थिती आहे. काही अपवाद ओघळता अनेकजण समाजसेवा फक्त प्रसिध्दीस येण्यासाठीच करतात. एकदा प्रसिध्दी मिळाली की मग समाजसेवा आणि त्यांचा काहीही एक संबंध उरत नाही ही सत्यता आहे. आज प्रत्येकास प्रसिध्दीमागे धावण्याचे वेड लागले आहे. मात्र या सर्व गोष्टींना मारूतराव घुले पाटील यांचा सरळपणे विरोधच होता, कारण त्यांना प्रसिध्दी मागे धावलेले आवडायचे नाही. तर प्रसिध्दीने त्यांच्या मागे धावे असे कार्य करावे अशी त्यांची विचारसरणी आणि कृतीही होती. आपण स्वत:ला सिध्द करण्यासाठी किती वेळ खर्च करतो, हाच वेळ आपण जर समाजासाठी खर्च केला तर आपल्याला स्वत:हून सिध्द् करण्याची गरजच पडत नाही. त्याठीकाणी आपल्या कामाची प्रशंसा, कामातील सत्यता आणि यश हेच आपल्या कामाची पावती देत असते. आपण फक्त आपल्या कामाशी एकनिष्ठ आणि प्रामाणिक असलं

पाहीजे असे त्यांना वाटत असावे म्हणूनच मारूतराव प्रसिध्दीसाठी कधी कोणाच्या मागे धावले नाही. महाराष्ट्राचे राजकारण, अर्थकारण तसेच समाजकारण यांना एकाच चौकटीतून चांगले हाताळता येवू शकते अशी वस्तूस्थिती मा. यशवंतरावजी चव्हाण यांनी महाराष्ट्रात दाखवून दिली. याच आदर्शाचे धडे गिरवत मारूतरावांनी राजकारणातून अर्थकारण आणि समाजकारण साधण्याचा एक प्रामाणिक प्रयत्न केला आहे. त्यांचा राजकीय प्रवास हा अतिशय संवेदनशिल आणि रचनात्मक गोष्टींनी भरलेला आहे.

## ३.२. अहमदनगर जिल्ह्याचे राजकारण :

अहमदनगर जिल्ह्यातील राजकारण हा सततचा चर्चेचा विषय राहीलेला आहे. कारण या जिल्ह्याचे राजकारण सुरूवातीपासूनच गटातटात राहीलेले आहे. विशेष म्हणजे सुरूवातीला हा जिल्हा कम्युनिष्ठ पक्षाचा बालेकिल्ला होता. मात्र आबासाहेब निंबाळकर, पद्मभूषण बाळासाहेब भारदे तसेच मारूतराव घुले पाटील यांसारख्या नेत्यांनी कॉग्रेस पक्षाचे वर्चस्व वाढविण्यासाठी कायमच प्रयत्न केले आणि अहमदनगर जिल्ह्यात कॉग्रेस पक्ष वाढविला हे निर्विवाद सत्य आहे. अण्णासाहेब शिंदे, आबासाहेब निंबाळकर यांनी यशवंतराव चव्हाणांच्या पाठिब्यांने भाऊसाहेब थोरात यांसारखे कम्युनिष्ट नेते कॉग्रेस मध्ये आणले.[४] १९६२ ला थोरातांनी कॉग्रेस पक्षाच्या तिकीटावर निवडणूक लढविली आणि निवडूणही आले. विशेष म्हणजे दत्ता देशमुखांसारख्या अनुभवी राजकारण्यालाही या निवडणूकीत घरी बसावे लागले. नगर जिल्हा ही कार्यकर्त्यांची खाण आहे असे यशवंतराव चव्हाण कायमच उच्चारत.[५] अहमदनगर जिल्ह्यात शंकरराव चव्हाण यांना मानणारा एक गट व यशवंतराव चव्हाण आणि त्यांनंतर वसंतदादा पाटील यांना माननारा दुसरा गट. असे गटांचे वर्गीकरण केले जाते. यामध्ये बाळासाहेब विखे व त्यांचे मावसभाऊ अण्णासाहेब म्हस्के, बी. जे. खताळ यांसारखी राजकीय मंडळी शंकरराव चव्हाण यांना माननारी होती. मुख्यत: शंकराव चव्हाण यांना माननारा गट हा विखे गट म्हणून ओळखला जात. आणि भाऊसाहेब थोरात, शंकरराव काळे,

बाळासाहेब थोरात, यशवंतराव गडाख, आबासाहेब निंबाळकर, बाळासाहेब भारदे, मारूतराव घुले पाटील, भानुदास मुरकुटे, मधुकर पिचड हा राजकीय वर्ग यशवंतराव गडाख यांना माणनारा वर्ग होता. हाच वर्ग वसंतदादा पाटील यांना माणनारा वर्ग म्हणूनही ओळखला जातो. अशा पध्द्तीने राजकीय पटलावर दोन्ही चव्हाणांना माणनाऱ्या वर्गांमध्ये दोन गट दिसून येतात.[६]

गणेश सहकारी साखर कारखान्याचे वर्चस्व आपल्याकडे रहावे यासाठी शंकरराव कोल्हे आणि बाळासाहेब विखे यांच्यात कायमच स्पर्धा चालत. अण्णासाहेब म्हस्के हे विखे यांचे मावसभाऊ असल्याने तेही कोल्हें विरोधात लढत करायचे. जिल्ह्यात कॉंग्रेस जरिही प्रबळ बनली होती तरी पक्षांतरर्गत गटांना मात्र खीळ बसत नव्हती. आणि आजही जिल्ह्यात गटाच्या राजकारणाला महत्व आहे. जिल्ह्यातील कॉंग्रेस अंतर्गत गटांचे वर्गीकरण करायचे म्हटले तर पुढील गट दिसून येतात. भारदे विरूध्द् स्वामी सहजानंद भारती, मोतीलाल फिरोदीया विरूध्द् आबासाहेब निंबाळकर, बि. जे. खताळ विरूध्द् अण्णासाहेब शिंदे, के. बी. रोहमारे विरूध्द् काळे—कोल्हे आणि विखे विरूध्द् गडाख अशी एक गटबाजीची परंपराच जिल्ह्यात रूजली होती. मोतीलाल फिरोदिया हे भारदेंचे समर्थक होते तर निंबाळकरांच्या विरोधी गटातील. त्यामुळे जिल्ह्यातील राजकारण हे अतिशय गुंतागुंतीच व गटातटाचं असल्याचं स्पष्ट होतं. मारूतरावांचा विचार करता ते आबासाहेब निंबळकरांचे समर्थक होते. म्हणजेच ते यशवंतराव चव्हाण यांना माणनाऱ्या गटातील होते असे म्हणता येईल.[७]

## ३.३. मारूतरावांची राजकीय व सामाजिक विचारसरणी :

राजकारण आणि समाजकारण यांना वेगवगळे करणे म्हणजे सख्या मित्रांची एकमेकांपासून ताटातूट करण्यासारखेच आहे. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेपासूनच राजकारण आणि समाजकारण या दोन प्रक्रिया एकमेकांच्या हातात हात घालून आलेल्या आहेत. या दोन्हीही प्रक्रिया निरंतर चालणाऱ्या आहेत, असे असले तरी अनेकदा त्यांच्यात चढउतार येत राहतात. जेव्हा एखादा राजकीय नेता आपल्या कार्यापासून भरकटतो आणि त्याला आपल्या

कर्तव्याची गदापदा राहत नाही अशावेळी तो सामाजिक कार्यावर आणि सामाजिक विचारसरणीवर घाला घालत असतो. कारण सामाजिक क्षेत्रात प्रगती तसेच आधुनिकता घडवून आणण्यासाठी राजकारण हे सर्वांत प्रभावी हत्यार आहे. याच हत्याराचा प्रभावीपणे व प्रत्यक्षपणे वापर करत मा. यशवंतरावजी चव्हाण साहेबांसारख्या कृतीशिल नेत्यांनी महाराष्ट्राला एका प्रगतीच्या वळणावर आणून ठेवले आणि याचेच फलित म्हणजे महाराष्ट्र हे भारतातील प्रगतशील राज्यात गणले जाते. हे राजकारण आणि समाजकारण यांची सुव्यवस्थितरित्या बैठक घालता आली म्हणून शक्य झाले. महाराष्ट्राचे भाग्यविधाते मा. यशवंतराव चव्हाण साहेबांसारख्या नेत्यांनी महाराष्ट्रातील नेत्यांना दिशा देण्याचे काम केले, राजकारण आणि समाजकारण यांची एकत्रीत जुळणी करूण दिली आणि याच विचारांची शिदोरी घेवून महाराष्ट्रात अनेक वजनदार नेते तयार झाले. यामध्ये प्रामुख्याने शंकरराव चव्हाण, वसंतराव नाईक यांसारखे अनेक उम्मेदी नेते तसेच मा. शरदचंद्रजी पवार साहेब यांचाही उल्लेख प्रामुख्याने करावा लागेल तसेच अहमदनगर जिल्ह्याचा विचार करता पद्मश्री विठठ्लराव विखे पाटील, भाऊसाहेब थोरात, पद्मभूषण बाळासाहेब भारदे, आबासाहेब निंबाळकर आणि मारूतराव घुले पाटील यांच्यासारखे महत्वाचे नेते घडले. खऱ्या अर्थाने या नेत्यांनी अहमदनगर जिल्ह्यात यशवंतराव चव्हाण साहेबांच्या कार्याचा आणि विचारसरणीचा वारसा जपला आणि वाढविला.[८]

आज एकूणच राजकीय पध्द्तीचा विचार करता असे दिसून येते की, आजचे राजकारण एका विशिष्ठ जाती–धर्माच्या भोवती फिरत आहे. कुठलातरी एखादा गट जातीय भूमीका घेवून जन्माला येतो तर दुसरा गट जातीय प्रभावावर मते मिळविण्याचा प्रयत्न करतो. यामुळे खरे राजकारण बाजूला सारून जातीय राजकारणाला महत्व मिळत आहे. मात्र मारूतरावांनी कधीच एका विशिष्ट जाती–धर्मासाठी राजकारण केले नाही की एखाद्या मर्यादीत जातीय गटाला थारा दिला नाही. समाजवादी भूमिका टिकवायची असेल तर जातीय राजकारणाला मूठमाती दिली पाहीजे की ज्यामुळे अशा जातीय राजकारणाला मूळीच थारा दिला नाही पाहीजे. ज्यामुळे सामाजिक तत्त्व आणि लोकशाहीला तडा जाईल.

मारूतरावांच्या अशा स्वभावामुळे सर्व जाती—धर्माचे लोक मारूतरावांच्या पाठीशी उभे राहीले आणि त्यांना मालकाची उपमा दिली. जनसामान्याचे प्रश्न सोडविण्यासाठी जो आपले कष्ट, वेळ, प्रतिष्ठा खर्च करू शकतो तो कोणी सर्वसामान्य व्यक्ति नसून समाजासाठी मिळालेले एक वरदानच असते असे म्हणत लोकांनी मारूतरावांना नेते बनविले. लोकांनी आपल्याला दिलेली साथ आणि आवाज हा त्यांच्याच प्रश्नासाठी खर्च केला पाहीजे ही मारूतरावांची जनसामान्यांबदद्लची धारणा होती.[९] एखाद्या मुद्यावर कमी बोलणे पण कृती मात्र अधिक करणे हा मारूतरावांचा स्वभाव होता. एकदा हाती घेतलेली गोष्ट जोपर्यंत पूर्ण होत नाही तोपर्यंत त्यांना शांत बसवत नसे. सरकारचा निधी हा सरकारी कामांसाठीच खर्च झाला पाहीजे ही त्यांची आग्रही भूमिका होती. यावरून त्यांच्या कामातील प्रामाणिकपणा दिसून येतो.[१०] आपण ज्या भागाचे प्रतिनिधित्व करत आहोत त्या भागातील सर्वसामान्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी मारूतरावांची सारखी तगमग असायची. एखाद्याने त्यांच्याकडे काही काम घेवून यावे आणि मारूतरांवांनी त्यांना मोकळया हाताने मागे पाठविले असे क्वचितच घडले असेल. जे काम न्यायाने आणि ज्यात सत्यता असेल तर ते काम होइलच, ते होण्यासाठी स्वत: मारूतराव जातीने लक्ष घालत. आमदार असताना सभागृहात अतिशय कमी बोलणे पण जे बोलायचे ते मुदद्सुद आणि तथ्य असेल असेच बोलणारे मारूतराव त्यांच्या या कलेमुळे ते सर्वांचे लक्ष वेधून घेत. स्वत: शेतकरी असल्यामुळे शेतकऱ्यांचे प्रश्न ते अतिशय साध्या व सरळ भाषेत मांडत.[११] राजकारण करताना कोणाचे मन दुखावणार नाही याची प्रत्येक राजकारण्याने खबरदारी घेतली पाहीजे. माणसाने पद मिळाले म्हणून कोणावर अन्याय करू नये, एक गोष्ट आपण कायम लक्षात ठेवली पाहीजे की आपण ज्यांच्यावर अन्याय करण्याचा प्रयत्न करतो, त्यांच्यामूळेच आपणास ही सत्ता मिळालेली असते. त्यामुळे कधीही कोणत्या व्यक्तिला त्रास होईल असे वागू नका, असे मारूतराव कायमच आपल्या पक्षातील कार्यकर्त्यांना आणि सहकाऱ्यांना ठणकावून सांगत. एखाद्या मुद्यावर बोलण्यापेक्षा तो मुद्या पूर्णत्वास नेण्यासाठी करावे लागणारे प्रयत्न आधी केले पाहीजे ही मारूतरावांची

विचारसरणी होती. मारूतरावांनी अनेक खडतर प्रसंगााला तोंड देत आपला राजकीय प्रवास पुर्णत्वास नेला आहे.[१२]

## ३.४. पाटीलकीचे वतन :

१९४९ मध्ये मारूतरावांच्या दत्तकविधानानंतर अवघ्या एक—दिड वर्षातच मारूतरावांना गावाच्या पोलीस पाटीलकीचे वतन मिळाले. त्यावेळी गावाची परिस्थिती अतिशय बिकट होती. गावात अस्वच्छता, रोगराई, अशांतता तसेच सावकारांची व बलाढयांची मक्तेदारी. अशातच दरोडेखोरांनी गावाच्या आणि परिसराच्या नाकात दम करून सोडला होता. सगळीकडे अंधारच अंधार होता. गावात अज्ञानांची संख्या जास्त होती. अशा परिस्थितीत गावाला यातून वर काढले पाहीजे हा विचार मारूतरावांच्या मणी आला आणि त्यांनी तो प्रत्यक्षात आणण्यासाठी प्रयत्न सुरू केले. गावातील तरूणांना शरीराचे महत्व पटवून देवून व्यायामासाठी प्रोस्ताहीत केले. व्यायामाचे निमित्त साधून व्यायामासाठी येणाऱ्या तरूणांना श्रमदान, समाजसेवा, एकता यांसारख्या गोष्टी शिकतिल्या जावू लागल्या. व्यायामाने पिळदार शरीर आणि ताकद मिळाल्याने तरूणांत उत्साह आणि जोश आला, मारूतरावांकडून प्रेरणा घेवून अनेकजण गावाच्या रक्षणासाठी कार्य करू लागले.[१३] दहिगाव—ने हा तर एक प्रकारे दरोडेखोरांचा अडड्याच बनला होता. त्यांच्या विरोधात मारूतरावांनी गावातील काही ठराविक युवकांच्या मदतीने मोहीम उभारली. अनेकदा स्वत: मारूतरावांनी घोडयावरून सवारी करत दरोडेखोरांना पकडून आणून त्यांना शिक्षाही केलेली आहे. यामुळे गावातील ठगांनी माघार घेवून गावातून काढता पाय घेतला. अस्वच्छतेमुळे गावात रोगराईने थैमान घातले होते. गावात आरोग्य सौख्यभरून नांदावे म्हणून त्यांनी गावात 'महात्मा गांधीजींचे ग्रामस्वच्छते'चे प्रयोग सुरू केले.[१४] गावात गटारे तुंबलेली असायची या गटारांचे शोषखडड्े केले. त्यांच्या या कल्पनेला गावातील लहान—थोरांनी चांगला प्रतिसाद दिला. गावात स्वच्छतेचे प्रयोग झाल्याने गावातील रोगराईवर बऱ्यापैकी आळा बसला. या उपक्रमात खंड पडू नये म्हणून दर शुक्रवारी भरपहाटे ४:३० वा. श्रमदान कार्यक्रम सुरू केला. या

श्रमदानात प्रामुख्याने गावातील काटेरी झुडुपे आणि चिमूक काटे काढण्यावर भर असायचा. विशेष म्हणजे या पहाटेच्या श्रमदानास गावातील जवळपास ६० टक्याहून जास्त लोक असायचे. यामुळे गाव कायम स्वच्छ व समृध्द् राहीले. तरूण वर्ग व्यसनाच्या आहारी जाऊ नये म्हणून गावातील व्यसनी व आम्ली पदार्थ हदद्पार करण्यासाठी मारूतरावांनी विशेष पुढाकार घेतला. यामुळे गावातील अनेक कुटुंबे व्यसनापासून दूर राहीली व आपल्या आयुष्याची आणखी काही चांगली वर्षे ती पाहू शकली. अशा पध्द्तीने गावातील कार्य सुरू असताना त्यांच्या कामाची दखल म्हणून स्वत: श्री. संत गाडगेबाबा यांनी गावाला भेट दिली आणि मारूतरावांचे तोंड भरून कौतूक केले आणि पुढील कार्यास सुभेच्छा दिल्या. शेतकरी राजा सावकाराच्या तावडीत पूर्णपणे सापडलेला होता. लोकशाही राज्यात त्याला सावकाराची जुलुमशाही सोसावी लागत होती. कर्ज फेडता आले नाही म्हणून कधी आया—बहिणींची अब्रु उघडयावर सोडावी लागली तर कधी जमीनी सावकार गडप करत. अशा सर्वच गोष्टींनी तो हवालदिल झालेला होता. त्याला या चक्रव्यूहातून बाहेर काढण्यासाठी मारूतरावांनी काही सहकार्यांना सोबत घेवून १९५४ मध्ये शेतकऱ्यांच्या हितासाठी दहिगाव—ने येथे ‘दहिगाव—ने विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी’ची स्थापना केली. यामुळे शेतकरी सावकाराच्या जुलूमशाहीतून मुक्त होवून आनंदाने नांदू लागला.[१५]

गावात अनेकदा विविध कारणांवरून वाद निर्माण होत असत. मात्र हे वाद कोर्टात जावू नये, गावातील वाद सामंजस्याने गावातच सोडविले जावेत यासाठी मारूतरावांनी प्रयत्न सुरू केले. गावातील वाद कोर्टात जाणे म्हणजे गावाची अब्रू वेशीवर टांगल्यागत आहे. त्यामुळे गावातील लोकांच्या मध्यस्तीने दरबार भरवून न्याय—निवाडा केला जावू लागला. अगदी गावातील एखाद्या कुटंबात भांडणे झाली तरी ती भांडणेही मारूतरावांच्या मध्यस्तीने मिटविली जावू लागली. कुटंबातील भांडणे असेल तर त्यांनी विभक्त होवू नये यासाठी मारूतरावांचा आग्रह असायचा कित्येक कुटंब त्यांच्यामुळे एकत्रीत गुण्यागोविंदाने नांदू लागली. त्यांच्या कार्याची आणि सेवेची कदर करून गावातील व

परिसरातील लोक त्यांच्या शब्दाला किंमत आणि हाकेला साद देत असे. लोकांचे प्रेम आणि मारूतरावांची निस्वार्थी सेवा यामुळे मारूतराव आणि जनता हे एका प्रकारचे घटट् समिकरण होवून गेलं. गावातील निस्वार्थ सेवा चालूच होती. लोकंही मालकाच्या हाकेला धावून जात असत.[१६]

मारूतरावांना व्यायामाचा आणि कुस्तीचा नाद असल्याने १९६० साली दहिगाव—ने येथे तालीम उभारली आणि तरूणांना व्यसनाकडे न वळवू देता त्यांना पहिलवान बनण्यासाठी मार्गदर्शन केले. व्यसनाने माणसाचे शरीर खराब होते तर व्यायामाने शरीर तंदूरूस्त बनते, त्यामुळे व्यसन करू नका व्यायाम करा, तब्येत बनवा आणि पहिलवान म्हणून अभिमानाने वावरा. असा मोलाचा सल्ला मारूतराव गावातील आणि परिसरातील तरूणांना देऊ लागले. तरूणांनीही त्यांच्या हाकेला साद देत व्यसनाकडे दुर्लक्ष केले. गावात अनेकजण दारू विकणारे येत असत. त्यांचा बंदोबस्त करण्यासाठी मारूतराव आपल्या नोकराला फेरफटका मारायला सांगणार, मग तो नोकर गावात फेरफटका मारून व्यसनांची गावात काय मात आहे आणि कुठे तिला खतपाणी मिळतयं हे सर्वकाही मारूतरावांपर्यंत पोहचवित त्यांचा बंदोबस्त करण्यासाठी मग मारूतराव स्वत: जात. आधी सामंजस्याने समजावत जर नाहीच ऐकलं तर मग त्यांचे दारूचे ड्रमच पालथे करून देत. यामुळे व्यसनी व अंमली पदार्थ विकून अनेक कुटुंबाना व्यसनाकडे वळविणाऱ्यांचा बंदोबस्त केला. त्यावेळी जगन्नाथ चव्हाण हे अतिशय गरीब आणि पारधी समाजातील दारूविक्रीचा व्यवसाय करणारे गृहस्थ होते. आधी चोऱ्या करून, दरोडे टाकून आपला उदारनिर्वाह चालविणारे हे कुटुंब मुलांच्या शिक्षणासाठी चोरीचा धंदा सोडून दारूचा धंदा करू लागले. त्यांनी अथक प्रयत्न करून आणि गरीबीतही मुलांच्या पंखांना दिलेले बळ यामुळे त्यांची मुले सुशिक्षित झाली आणि आज चांगल्या सरकारी नोकरीत आहेत.[१७] यामध्ये मारूतरावांचे मोलाचे मार्गदर्शन राहीले आहे. त्यांनी कायमच जगन्नाथराव चव्हाण यांच्या परिवाराच्या पाठीशी उभे राहून त्यांच्यासारख्या कितीतरी कुटुंबांना आधार दिला आहे. त्यांच्यामुळे आज अभिमानाने कित्येक कुटुंबे समाजात उभी राहीली. शिक्षणाची आवड बालपणापासूनच असल्याने

अनेकांचे साहीत्य त्यांच्या वाचनात आले होते, त्याचबरोबर कुराण, बायबल, भगवतगिता असे सर्वच धर्मातील ग्रंथही वाचण्यात आलेले असल्याने अंधश्रध्देला त्यांच्याजवळ थारा नव्हता. मारूतरावांच्या कामाचे एक वेगळे वैशिष्टय म्हणजे ते लोकांत मिळून मिसळून काम करत. कोणावरही रागावत नसे, हळूवार आणि विचारपूर्वक बोलणे या त्यांच्या स्वभावामुळे मारूतराव कोणाच्याच टिकेचे धनी होत नव्हते. मारूतराव म्हणजे फक्त गावातील पाटील नसून ते विकासपुरूष आहेत याची जाणीव आता गावाला आणि परिसराला लागली होती. विकासाच्या कामात गावानेही मारूतरावांना खुप मदत केली. दहिगाव येथील सरकारी हॉस्पिटलच्या ईमारतीच्या उभारणीसाठी लागणारा दगड गावकऱ्यांनी गाडीबैलाने वाहीला. यात एक बैलगाडी जोडी होती ती मारूतरावांची. त्यांनी स्वतः ईमारतीचे दगड वाहण्यासाठी पुढाकार आणि परिश्रम घेतले. आज याच दवाखान्यात मोठमोठाल्या आजारावर मोफत निदान केले जोते ही गौरवाची बाब आहे. अशा पध्द्तीने गावातील कार्य सुरू असताना १९६२ च्या महाराष्ट्र विधानसभेसाठी शेवगावमधून मारूतरावांची उमेव्द्वारी जाहीर झाली. आणि मारूतराव तालुक्याचे नेते झाले.[१८]

## ३.५. पोलिस पाटील पदाचा राजीनामा :

सरकारी पदावर असणाऱ्या व्यक्तिंना निवडणूक लढविता येत नसल्याने १९६२ साली त्यांनी आपल्या पोलीस पाटील पदाचा राजीनामा दिला. मनात कुठल्याही जाती—धर्माचा व्देष नसल्याने ही पाटीलकीची वतन त्यांनी गावातील अतिशय गरीब आणि ठाकर या आदीवासी जमातीतील श्री. विठठ्ल विश्वनाथ पवार यांच्याकडे दिली.[१९] हवे तर त्यांनी आपले वतन एखाद्या स्वतःच्या जातीतील व्यक्तिला किंवा पैसे घेवून एखाद्या धनाढयाला दिले असते, मात्र त्यांनी तसे केले नाही. कारण रक्तातच भ्रष्टाचार, लाचारी तसेच जातीभेद यांसारख्या गोष्टींचा अंश नव्हता. पैशापेक्षा व्यक्ति व माणूसकी महत्वाची असते याची शिकवण मारूतरावांनी गावाला आणि परिसराला दिली.खऱ्या अर्थाने १९६० सालीच मारूतरावांनी स्वतःला कॉग्रेस पक्षात गुंतवून घेतले होते.

त्यांच्या निर्मळ आणि सरळ व्यक्तिमत्वामुळे ते अल्पावधीतच प्रसिध्दीस आले. पोलिस पाटील पदावर असताना मारूतरावांनी गावाला दिलेली सेवा ही निर्विवाद आहे.[२०]

## ३.६. राजकारणाचे बाळकडू :

प्रत्येक यशस्वी माणूस प्रयत्न, चिकाटी आणि जिदद् यांच्या जोरावर यश संपादन करत असतो. हे सत्य असले तरी त्याला मार्ग दाखविणाराही त्याच्या यशातील एक महत्वाचा भाग असतो. सदर उक्तीप्रमाणे मारूतरावजी घुले पाटील यांना राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील शिखरापर्यंत पोहचविण्यासाठी आबासाहेब निंबाळकर व पद्मभूषण बाळासाहेब भारदे यांचा सिंहाचा वाटा आहे. दहिगाव—ने या गावातील आणि परिसरातील एकूणच घडामोडींचा अभ्यास आणि त्यावर उपाययोजना असा मारूतरावांचा नित्यक्रम चालू असायचा. त्यांच्या अशा कर्तृत्वशिल व्यक्तिमत्वामुळे ते अल्पावधीतच प्रसिध्दि्स आले. त्यांच्या कार्याची दखल शेवगावचे गांधीवादी आणि कॉग्रेस पक्षाचे नेते पद्मभूषण बाळासाहेब भारदे व जिल्ह्याचे कॉग्रेसचे नेते आबासाहेब निंबाळकर यांनी घेतली. पद्मभूषण भारदे पाटील शेवगाव तालुक्यातील भाविनिमगाव येथील रहीवासी होते. हे गाव दहिगाव—ने या गावाच्या सीमेलगतच असल्यराने मारूतरावांच्या कार्याबाबत श्री. भारदे पाटीलांना ऐकण्यास मिळत. त्यांनी मारूतरावांना भेटून त्यांच्या कार्यासाठी सुभेच्छा दिल्या. आबासाहेबांनी मारूतरावांना राजकारण आणि समाजकारण यांची सांगड बांधून दिली आणि एका प्रकारे आपला राजकीय वसा त्यांना चालावयाला दिला. मारूतराव यांनी निंबाळकरांकडून राजकारणाचे धडे शिकूण घेतले व शेवगाव — नेवासा तालुक्यातील लोकांचे प्रश्न मार्गी लागावेत यासाठी अहोरात्र प्रयत्न केले. असं मानलं जातं की, मारूतरावांनी श्री. निंबाळकरांचा राजकीय विचारसरणी जोपासली आणि वाढविली आणि आज माजी आमदार मा. श्री. पांडूरंग अभंग हे मारूतरावांच्या विचारांचा वारसा चालवत आहेत.[२१]

मारूतराव हे शालेय जीवनापासूनच वकृत्व आणि नेतृत्वाने बऱ्यापैकी घडले होते. यामध्ये त्यांना पढेगावातील त्यांच्या शाळेचे मुख्याध्यापक श्री. ढुमणे गुरूजी यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. मात्र १९५० पासून मारूतराव दहिगाव—ने येथे कायमस्वरूपी स्थायिक झाले आणि याच गावात सामाजिक कार्यात झोकूण घेतले. गोरगरिबांच्या सेवेत खरा देव बघितला आणि अनुभूती घेण्यासही सुरूवात केली. गावातील काम एवढे सुरेख आणि विकासात्मक की जिल्हास्तरावर गावाची आणि मारूतरावांची ख्याती नावाजली जावू लागली. मारूतरावांचा स्वभावही अगदी सरळ आणि साधा. त्यामुळे ते प्रत्येकास हवेहवेसे वाटणारे झाले. लोकांत मिळून मिसळून काम करणे, गावाचे रक्षण करणे. असा त्यांचा कार्यक्रम चालूच होता. मारूतरावांचा राजकीय प्रवास बघता त्यांना राजकारणात काहीही रस नव्हता त्यांचा सर्वस्वी कल सहकारकडे झुकलेला होता. मात्र आबासाहेब निंबाळकर आणि बाळासाहेब भारदे यांनी त्यांना राजकीय पटलावर आणून नेतृत्वाची संधी दिली. मारूतरावांनी १९६० साली राजकारणात प्रवेश करून कॉंग्रेस पक्षाचे कार्य सुरू केले.[२२] राजकारण हे फक्त खुर्चीवरून करायचे नसते तर प्रत्यक्ष जनतेत जावून त्यांच्या हालअपेष्टा विचारून त्यांच्या अडचणी दूर करणे हे प्रत्येक राज्यकर्त्याचे आद्यकर्तव्य असते. सत्ता मिळवून कोणीही श्रेष्ठ होत नाही, तर सत्तेचा सदुपयोग करून लोकोपयोगी कामे करणे, त्यांच्या जीवनमानात बदल घडवून आणणे तसेच समाजाला प्रगतीच्या दिशेने घेऊन जाणे हे राजकीय पुढाऱ्याचे काम असते. ही मारूतरावांची राजकीय विचारसरणी होती. सत्य, करूणा, दया, सहनशिलता आणि आदर हा महत्वाचा मूलमंत्र आबासाहेब निंबाळकरांनी मारूतरावांना दिला. याच मंत्राचा जप करत मारूतराव आपले कार्य करत राहीले. आणि जीवनातील एकेक यशाची पायरी चढत राहीले.

मारूतरावांना राजकारणामध्ये आणण्यात आणि त्यांना योग्य दिशा आणि वाट दाखविणाऱ्यांमध्ये आदरनिय पद्मभूषण बाळासाहेब भारदे पाटील आणि जिल्हयातील कॉंग्रेस नेते आबासाहेब निंबाळकर यांचे महत्वाचे प्रयत्न आणि योगदान राहीलेले आहे. या महात्म्यांनी दिलेल्या शिकवणीची शिदोरी

मारूतरावांनी आयुष्यभर आपल्या विचारात, कार्यात आणि समाजात वावरताना जपली. त्यामुळे मारूतरावांवर प्रेम करणारा वर्ग अधिक होता. १९६१ मध्ये मारूतराव घुले पाटील यांची महाराष्ट्राचे भाग्यविधाते कै. यशवंतराव चव्हाण साहेब यांच्याशी भेट झाली.[२३]

## ३.७. यशवंतराव चव्हाण आणि मारूतराव घुले पाटील :

भारताला स्वातंत्र्य मिळाले आणि भारतात भाषावार प्रांतरचनेनुसार बहुभाषिक स्वतंत्र राज्य निर्मिले गेले. मात्र मराठी भाषिकांचे त्यावेळी स्वतंत्र राज्य निर्मिण्यावर केंद्रशासनाने उत्सुकता दाखविली नाही. आणि बहुसंख्य मराठी भाषिक समाज मुंबई या व्दैभाषिक राज्यात इच्छा नसूनही राहू लागला. कारण त्यांना स्वतंत्र मराठी भाषिकांचे राज्य हवे होते. त्यासाठी त्यांनी ‘संयुक्त महाराष्ट्र चळवळ’ उभारली. १९५६ साली या चळवळीने एवढी भरारी घेतली की केंद्रशासनाने या चळवळीची धास्ती घेतली. केंद्रशासनाची अनुकुलता नसतानाही यशवंतराव चव्हाणांनी मध्यस्ती करून आणि पं. नेहरू यांची दिल्ली दरबारी भेट घेवून चर्चा केली. या चर्चेत केंद्रशासनाने उजवा कौल दिला आणि यशस्वीपणे मराठी बहुभाषिकांचे स्वतंत्र महाराष्ट्र राज्यास परवानगी दिली.[२४] यशवंतराव चव्हाण यांच्या चर्चेला आलेले हे सर्वांत मोठे यश आहे असे म्हणता येईल. अशा अतातटीच्या खटाटोपीनंतर अखेर १ मे १९६० रोजी कामगार दिनाचे औचित्य साधून ‘महाराष्ट्र’ राज्याची स्थापना करण्यात आली. आणि महाराष्ट्राच्या राजकारणाला, समाजकारणाला तसेच अर्थकारणाला नव्याने सुरूवात झाली. स्वंतत्र महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री म्हणून ना. यशवंतराव चव्हाण साहेबांची नियुक्ती करण्यात आली. सरकारने संसदीय लोकशाहीचे संरक्षण केले पाहीजे म्हणून जर एखादे सरकार सत्तेचा दुरूपयोग करून लोकशाहीची मूल्ये नष्ट करू पाहील, तर त्या सरकारविरूध्द् प्रत्यक्ष आंदोलनाशिवाय अन्य मार्गच उरत नाही.[२५] ही शिकवण आपल्या कार्यकर्त्यास देणारे यशवंतराव चव्हाण साहेब यांचा स्वभाव अतिशय भावूक, नम्र आणि कर्तृत्वशिल. कुठलीही लढाई ही केवळ वादाने आणि युध्दानेच नाही तर ती

चर्चेने आणि विचारविणीमयानेही सुटू शकते अशी त्यांची धारणा होती. आणि हिच शिकवण त्यांनी जनसामान्यांना आणि आपल्या कार्यकर्त्यास दिली. राजकारण करायचे तर ते काही मूलभूत विचारसूत्रांच्या आधारेच केले पाहीजे, त्यामध्ये तथ्य असायला हवे. यासाठी त्यांनी समाजवादी समाजरचनेवर भर दिला. १९६२ साली चीनने भारतावर आक्रमण करून भारत—चीन मैत्री संबंधावर प्रश्नचिन्ह तर उभे केलेच पण त्याचबरोबर भारतीय राजकारण आणि संरक्षणावरही प्रश्नचिन्ह उभे राहीले. अशा परिस्थितीत महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीपद सोडून त्यांना केंद्रातील संरक्षण खाते स्विकारावे लागले. त्याठीकाणी दुसरा कोणी एखादा सत्तेचा लालची नेता असता तर कदाचित त्याने मुख्यमंत्रीपद कदापी नसते सोडले, पण ज्याच्या रक्तातच देशभक्ति आणि निस्वार्थ भिनलेला असतो त्याच्यापुढे आभाळही ठेंगणे असते हे यशवंतरावांच्या रूपाने सिध्द् होते. पुन्हा १९६५ मध्ये पाकिस्तान सारख्या लहान राष्ट्राकडून आक्रमणाचा अनुभव घ्यावा लागला. असे आक्रमण पुन्हा होण्याचीही भिती होती, मात्र भारत हा सुरूवातीपासूनच शांतताप्रिय देश होता आणि आहे त्यामुळे भारताने कधीही स्वत:हून युध्द् पुकारलेले नाही. आजपर्यंततरी भारताने जमेल तेवढया प्रमाणात चर्चा करून शांततेच्या मार्गानेच जागतिक आणि अंतर्गत प्रश्न सोडविलेले आहे आणि यापुढेही भारताची हीच भूमिका असेल हे भारताच्या आंतराष्ट्रीय धोरणावरून दिसून येते.

१ नोव्हेंबर १९६१ मध्ये शेवगाव येथे शेतकरी संघाच्या इमारतीच्या भूमीपूजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमासाठी महाराष्ट्राचे भाग्यविधाते मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण आले होते. मारूतरावांनी तर नेमकेच शेतकरी संघाचे अध्यक्ष म्हणून तालुका स्तरावर काम सुरू केलेले होते. त्यावेळी पद्मभूषण बाळासाहेब भारदे पाटील हे शेवगाव तालुक्याचे आणि श्री. आबासाहेब निंबाळकर हे जिल्ह्यातील कॉंग्रेसचे महत्वाचे नेते होते. भूमीपूजनाचा कार्यक्रम संपल्यानंतर आदरनीय चव्हाण साहेंबासमवेत महत्वाच्या कार्यकर्त्यांची बैठक बसली. या बैठकीत श्री. भारदे यांनी चव्हाण साहेबांना मारूतराव घुले पाटीलांची ओळख करून दिली. त्यांनी मारूतरावांच्या

कार्यकतृत्वाचा पूर्ण पाढाच चव्हाण साहेंबापुढे वाचला. मारूतरावांबदद्ल चव्हाण साहेबांना आपुलकी निर्माण झाली, ते मारूतरावांबदद्ल ऐकूण प्रचंड समाधानी झाले. त्यांनी त्याचवेळी स्पष्टपणे सांगितले की, 'मारूतराव तुम्ही आपल्या पक्षाचे कार्यकर्ते तर आहातच पण आम्हाला हवे असणारे आमचे एक चांगले सहकारीसुध्दा आहात.' असे सांगूण त्यांनी क्षणभरात मारूतरावांना आपलेसे करून घेतले. मारूतरावही क्षणभर स्तब्ध होवून स्वत:ला धन्यवाद देत होते. कारण आजपर्यंत फक्त बाहेरून कोणाकडून तरी त्यांनी चव्हाण साहेबांबदद्ल ऐकलेलं होतं, मात्र आता प्रत्यक्षात अनुभवत होते. कार्यक्रम संपवून चव्हाण साहेब हे श्री. आबासाहेब निंबाळकरांना घेवून परतीच्या मार्गी निघाले. शेवगाव—नगर मार्गावर करंजीचा घाट आहे. या घाटापर्यंत गाडी आल्यानंतर आबासाहेबांनी १९६२ च्या विधानसभेसाठी शेवगाव तालुक्यातून मारूतरावांच्या उमेव्दारीबदद्ल चव्हाण साहेबांकडे विचारणा केली असता, चव्हाण साहेबांनी सांगितले की, आबासाहेब मीही हेच तुम्हाला बोलणार होतो. तुम्ही अगदी हिरा पारखला आहे. मारूतरावांची उमेव्द्‌ारी नक्की समजा, तयारीला लागा. आबासाहेबांनी साहेबांची सूचना लगेचच श्री. भारदेंना कळविली. आबासाहेबांचा संदेश कळताच भारदे पाटील तयारीला लागले. मात्र अहमदनगर जिल्ह्यात सुरूवातीपासूनच गटाच्या राजकारणाला महत्व राहीलेले आहे. त्यामुळे गटातून मारूतरावांना विरोध होऊ शकतो हे भारदेंना माहिती असल्याने प्रथमदर्शी त्यांनी मारूतरावांना तिकीट देण्यासाठी टाळाटाळ केली. कारण यामध्येही गटाचेच राजकारण येत होते. मात्र तालुक्यात दुसरा कोणी त्यांच्याएवढा प्रभावी व कतृत्वशिल व्यक्ति नसल्याने मारूतरावांनाच उमेव्द्‌ारी दिली पाहीजे हे भारदे पाटीलांना पटले. आणि त्यांनी गटातटाचे राजकारण बाजूला ठेवत मारूतरावांना १९६२ च्या विधानसभेसाठी सज्ज केले.[२६] पुढे ३१ डिसेंबर १९७६ रोजी भेंडा येथील ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना साईटवर शेतकरी मेळावा भरविण्यात आला होता. या काळात आदरणीय यशवंतराव चव्हाण साहेब परराष्ट्र मंत्री होते. त्यांच्या हस्ते या मेळाव्याचे उद्‌घाटन झाले. या कार्यक्रमात त्यांनी मारूतरावांचे तोंडभरून कौतूक केले. मध्यतंरीच्या काळातही मारूतराव आणि

यशवंतराव चव्हाण साहेबांची अनेकदा भेटीगाठी झाल्या. त्यांनी आपली सुख—दु:ख एकमेकांशी वाटून घेतली. चव्हाण साहेबांनी दिलेले आदर्श राजकारणाचे धडे गिरवत मारूतरावही एक आदर्श राजकारणी झाले. १९८४ मध्ये मात्र मारूतरावांना आणि देशाला हादरा देणारी घटना घडली. देश अथांग दु:ख सागरात कोसाळला. कारण घटनाच अशी होती की, आदरनिय यशवंतराव चव्हाण साहेब सर्वांना सोडून अनंतवासात विलिन  झाले. त्यांचे जाणे देशाला परवडणारे नव्हते. मारूतराव त्यावेळी नेमकेच आजारातून सावरत होते तोच साहेबांच्या जाण्याची बातमी कळाली. आणि मारूतरावांची प्रकृती पुन्हा खालावली. त्यांचा एक मार्गदर्शकच हरवला होता. कायमच एकमेकांच्या सुख—दु:खाच्या गप्पा रंगविणारे एकमेकांपासून तुटले होते. साहेबांचे जाणे म्हणजे मारूतरावांच्या जीवनातील सर्वांत मोठा अपघात होता.[२७]

## ३.८. कॉंग्रेस पक्षात प्रवेश आणि राजकीय वाटचाल :

अनेक वर्ष गावगाडयात घातल्यानंतर १९६० साली मारूतराव प्रत्यक्षपणे तालुका स्तरावर काम करू लागले. याच साली त्यांनी अधिकृतरित्या कॉंग्रेस पक्षात प्रवेश केला आणि तालुक्यात पक्षासाठी काम सुरू झाले. मारूतराव वरिष्ठांच्या सल्ल्याने आणि पक्षातील कार्यकर्त्यांच्या सहकार्याने तालुक्यात पक्षाची ताकद वाढविण्यावर भर देत होते. त्यांच्या कार्याची महानता म्हणून १९६२ च्या विधानसभेचे शेवगाव विधानसभा मतदार संघ ११८ चे (मतदारसंघ पुनर्रचनेनुसार सद्या हा विधानसभ मतदारसंघ २२२ असा आहे)[२८] तिकीट मारूतरावांना मिळाले. ही निवडणूक मोठया थाटात पार पडली.

### ३.८.१. महाराष्ट्र विधानसभा निवडणूक १९६२ : शेवगाव.

**तक्ता क्रं. ३.१, (विधानसभा निवडणूक १९६२)**

| अ. क्र | उमेद्‌वाराचे नाव | पक्ष | मिळालेली मते (१९६२, विधानसभा) | विजय/पराजय |
|---|---|---|---|---|
| १. | मारूतराव घुले | कॉंग्रेस | २४८५१ | विजयी |
| २. | एकनाथराव भागवत | इन्डिपेंडन्स पार्टी | १४०२७ | पराभूत |

शेवगाव हा पुर्वीपासूनच कम्युनिष्ठांचा बालेकिल्ला. मात्र १९५८ च्या विधिमंडळाच्या निवडणूकीत बाळासाहेब भारदे यांनी या भागात कॉंग्रेस पक्षाच्या विजयाची मुहुर्तमेढ रोवली.[२९] आणि कॉंग्रेसला महत्व प्राप्त करून दिले. १९६२ च्या विधानसभा निवडणूकीत मारूतराव नव्यानेच अवतरले होते. त्यांच्या विरोधात एन. आय. डी. चे उमेव्दार एकनाथराव भागवत उभे होते. जिल्ह्यात कम्युनिष्ठांना अधिक महत्त्व असल्याने मारूतरावांचा निभाव लागणे अवघड होते. मात्र नेतृत्व आणि वकृत्व यांच्या जोरावर मारूतरावांनी ही विधानसभा तब्बल १०८२४ मतांनी जिंकली आणि भारदेंनी कॉंग्रेस पक्षाला घालून दिलेली विजयाची परंपरा कायम राखली. आता जनतेने आपल्यावर विश्वास दाखविला आहे म्हणून आपणही त्यांच्या विश्वासास पात्र ठरेल असेच काम करायचे. अशी मनाशी खुणगाठ बांधून मारूतराव तालुक्यातील कामाला लागले. निवडणूकीतील यशानंतर मारूतरावांचे पक्षातील महत्त्व वाढले. आणि पक्षश्रेष्ठींनी त्यांच्याकडे जिल्हा पक्षाध्यक्षांची धुरा सोपविली.[३]

## ३.८.२. अहमदनगर जिल्हा कॉंग्रेस अध्यक्ष : १९६२ — ७२. :

१९६२ साली विधानसभेवर निवडून आले असता कॉंग्रेस पक्षाने मारूतरावांना जिल्हा कॉंग्रेस अध्यक्ष पदी बसविले. त्यावेळी अहमदनगर जिल्हा हा कम्युनिष्टांचा बालेकिल्ला होता. आदरनिय यशवंतराव चव्हाण साहेब, आबासाहेब निंबाळकर यांसारख्या अनुभवी आणि कर्तृत्ववान नेत्यांचे मार्गदर्शन घेत मारूतरावांनी काही काळातच अहमदनगर जिल्हा कॉंग्रेसमय केला. त्यासाठी त्यांना दिवस—रात्र कष्ट करावे लागले. १९६४ साली महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेसचे कार्यकर्ता शिबीर भरविण्यात आले. या कार्यक्रमाची धुरा मारूतराव घुले पाटीलांवर सोपविलेली होती. मारूतरावांनी अतिशय सुंदर पध्दतीने शिबीराचे आयोजन केले. कुठलेही गालबोट न लागता हे शिबीर पार पडले. या शिबीरासाठी महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री ना. वसंतराव नाईक सुध्दा उपस्थित होते. अहमदनगर जिल्ह्यात कृषी विद्यापीठ असावे यासाठी मारूतरावांनी आणि जिल्ह्यातील कार्यकर्त्यांनी मुख्यमंत्री महोदयांकडे यासाठी पाठपुरवठा केला. हे कृषी विद्यापीठ राहूरी येथेच उभारावे यासाठी बापुराव तनपुरे, मारूतराव व जिल्ह्यातील कॉंग्रेस पक्षाचे नेते यांनी भक्कम प्रयत्न केले. आणि शेवटी सर्वांच्या प्रयत्नाने हे ‘महात्मा फुले कृषी विद्यापीठ’ राहूरी येथे स्थापन झाले. मारूतरावांचे सामाजिक आणि राजकीय कार्य चालूच होते. मात्र १९६५ च्या जायकवाडी धरण बांधणीच्या प्रश्नाने मारूतरावांपुढे मोठे संकट उभे राहीले.[३१]

## ३.८.३. जायकवाडी धरण बांधणी आणि धरणग्रस्तांचे प्रश्न :

१९६५ साली जायकवाडी धरणाची निर्मिती ही महत्वाची घटना घडली. हे धरण बांधले तर पैठण, शेवगाव, गंगापूर, नेवासे या तालुक्यातील बागायती जमीनी पाण्याखाली जाणार होत्या. यासाठी चळवळच उभी राहीली होती. दत्ता देशमुख, एकनाथराव भागवत आणि फलके गुरूजी हे या धरणग्रस्त चळवळीचे नेतृत्व करत होते. या चळवळीने धरणाच्या जागेबाबत संशय व्यक्त केला. धरणाची पाहणी करण्यासाठी मारूतराव घुले पाटील, वकीलराव लंघे पाटील, श्रीराम पाटील थोरात, दत्ता देशमुख आणि आणखी काही कार्यकर्ते

धरणासाठीच्या जागेची पाहणी करण्यासाठी निघाले. यासाठी मारूतरावांनी श्री. चाफेकर आणि दुधाणे या दोन तज्ञ अभियंतांना आमंत्रीत केले होते. यांना सोबत घेवून मारूतरावांनी आणि कार्यकर्ते मंडळींनी बीड जिल्ह्यातील रामपुरी ते वैजापूर अशा संपूर्ण गांवांची पहाणी केली. सदर पाहणीला त्यांना तब्बल बारा तास उलटले. शेवटी जी जागा शासनाने धरणासाठी सुचविली होती ती योग्यच होती, हा निष्कर्ष निघाला आणि विरोधकही थंडावले.[३२]

## ३.८.४. धरणग्रस्तांचे प्रश्न आणि मारूतराव :

बीड जिल्ह्यात होणारे जायकवाडी धरण शंकरराव चव्हाण यांच्या सुचनेनुसार नगर व औरंगाबाद जिल्ह्याच्या पथ्यावर पडले. या धरणात नगर जिल्ह्यातील शेवगाव तालुक्यातील २९ व नेवासा तालुक्यातील ९ असे एकूण ३८ गावे आणि औरंगाबाद जिल्ह्यातील गंगापूर व पैठण तालुक्याची मिळून एकूण २२ गावे अशा एकूण ६० गावांची ९३ हजार एकर जमीन पाण्याखाली बुडणार होती.[३३] यामुळे अनेकजण बेघर होणार होती. त्यांचे प्रश्न मार्गी लागावेत यासाठी एकनाथ भागवत, दत्ता देशमुख यांसारख्या नेत्यांनी जरिही प्रयत्न केले असले तरी मारूतरावांचे धरणग्रस्तांसाठीचे प्रयत्न विसरून चालणार नाही किंवा त्यांच्या या कार्याकडे कानाडोळा करून चालणार नाही. धरण बांधणीसाठीची अंतिम जागा निश्चित झाली तेंव्हा मारूतराव विधानसभा सदस्य होते. त्यांनी धरणग्रस्तांची भेट घेतली आणि त्यांचे प्रश्न जाणून घेतले. त्यांचे हे प्रश्न मारूतरावांनी विधानसभेत मांडले आणि आपले पक्षातील वजन वापरून हे प्रश्न मार्गी लावण्याचा एक प्रामाणिक प्रयत्न केला. धरणग्रस्तांच्या एकूणच अडचणी सोडविताना मारूतराव घुले पाटील धरणग्रस्तांचे नेते म्हणून ओळखले जाऊ लागले. विधानसभेतही त्यांची प्रतिमा धरणग्रस्तांचे नेते अशीच झाली होती.[३४] धरणग्रस्तांना रोजगार उपलब्ध व्हावा यासाठी नेवासे तालुक्यातील भेंडा (ज्ञानेश्वरनगर) येथे साखर कारखाना उभारण्याचे ठरविले. यासाठी १९६७ साली पद्मश्री विखे पाटीलांच्या अध्यक्षतेखाली बैठक सुध्दा बोलावली. याच वर्षी विधानसभा निवडणूका जाहिर झाल्या. या निवडणूकीत विरोधकांनी जायकवाडी

धरण प्रचाराचा प्रमुख मुदद्ा बनवला. धरण बांधणीसाठी आग्रही असणारे तत्कालीन जलमंत्री श्री. शंकरराव हे कॉग्रेसचे असल्याने आणि मारूतरावही याच पक्षाचे असल्याने विरोधकांनी शेवगाव तालुक्यात सरळ सरळ मारूतरावांवर टिकेची तोफ डागली. प्रचार व चर्चांना उत आलेला बघता या निवडणूकीचे चित्र मारूतराव विरूध्द् धरणग्रस्त अशी असेल ही अपेक्षा सर्वांना वाटत होती. मात्र धरण ग्रस्तांचे प्रश्न जिवाच्या अकांताने विधानसभेत मांडणारे मारूतराव कसे काय धरणग्रस्तांना वाऱ्यावर सोडतिल. त्यांनी स्वत: धरणग्रस्तांची भेट घेऊन त्यांना खोट्या प्रचाराला बळी पडू नका असा सल्ला दिला. त्यांच्या बोलण्यातील सत्यता, व्यक्तिप्रभाव हा लोकांना भाळला. आणि धरणग्रस्त वर्ग मारूतरावांच्या मागे उभा राहीला.

## ३.८.५. महाराष्ट्र विधानसभा निवडणूक १९६७ : शेवगाव तालुका :

**तक्ता क्रं. ३.२, (विधानसभा निवडणूक १९६७)**

| अ. क्र | उमेद्वाराचे नाव | पक्ष | मिळालेली मते | विजय/पराजय |
|---|---|---|---|---|
| १. | मारूतराव घुले | कॉग्रेस | २६६१० | विजयी |
| २. | वकीलराव लंघे | कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया | २१२२३ | पराभूत |

महाराष्ट्र विधानसभेचे निकाल लागले. या निवडणूकीत मारूतरावांना २६६१० तर वकीलरावांना २१२२३ मते मिळाली. मारूतरावांवर लोकांनी पुन्हा विश्वास दाखविला, आणि तब्बल ५३८७ मतांनी मारूतराव विजयी झाले. विशेष म्हणजे मारूतरावांना मिळालेल्या मतांपैकी सर्वाधिक मते ही धरणग्रस्त भागातील लोकांची होती. मारूतरावांनी आपला लढा सुरूच ठेवलेला होता.

१९६९ साली त्यांनी काही कार्यकर्त्यांना घेवून थेट विधानसभा गाठले आणि तत्कालीन जलमंत्री शंकरराव चव्हाण यांच्यापुढे धरणग्रस्तांचे प्रश्न आणि परिस्थिती मांडली. शेवटी सरकारने ज्यांच्या जमीनी धरणाखाली जाणार होत्या त्यांना एकरी ८००—१२०० रू. मोबदला देण्याचे मान्य केले. तसेच परिसरातील शेतकऱ्यांसाठी तीन टक्के पाणी उपसा सिंचनासाठी राखीव ठेवले. सरकारला धरणग्रस्तांसाठी स्वतंत्र कायदा करण्यास भाग पाडले. धरणग्रस्तांसाठी पुनर्वसन कायदा करण्यास भाग पाडणारे मारूतराव हे राज्यातील प्रमुख आमदार आहेत. धरणग्रस्तांनाही काही प्रमाणात योग्य न्याय मिळाला आणि १९७० साली गोदावरी नदीवर जायकवाडी धरण बांधणीस प्रत्यक्षपणे सुरूवात झाली. आणि मारूतरावांची अतातटीची परिक्षा संपली. परिसरात पाण्याची अधिक टंचाई नव्हती. शेतीपुरते पाणी उपलब्ध होत होते. त्यामुळे या भागातील लोक ऊसाचे पीक घेवू लागले. परिणामी परिस्थिती अशी झाली की जवळपास कुठला साखर कारखानाही नव्हता. मग थेट गंगापूर कारखाण्यावर ऊस पाठवावा लागत असे. उत्पादनाचे प्रमाण वाढल्याने कारखानाही माल नेण्यास तयार होईना.[३६] विशेष प्रयत्नाने शेवटी गंगापूर कारखाना आणि आणखी काही कारखान्यांनी थोडा थोडा माल नेण्याचे मान्य केले. ही परिस्थिती कायमची होवू नये म्हणून मारूतरावांनी भेंडा येथे सहकारी साखर कारखाना काढण्याचे ठरविले. १९६९ साली त्यासाठी परवानाही मिळविला. अशा पध्दतीने मारूतरावांचे कार्य चालू असताना १९७२ ची विधानसभा निवडणूक लागली. मात्र यावेळी मला तिकीट नको ते दुसऱ्याला द्यावे असे मारूतरावांनी पक्षाला विनंती केली. सोनई येथील यशवंतराव गडाख हे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या राजकारणात चांगलेच चमकलेले होते. या तरूणाला माझ्याऐवजी तिकीट द्या अशी शिफारस मारूतरावांनी पक्षाकडे केली. आणि यशवंतराव गडाख यांना १९७२ च्या विधानसभेचे तिकीट मिळवून दिले

### ३.८.६. महाराष्ट्र विधानसभा निवडणूक १९७२ : शेवगाव तालुका :

**तक्ता क्रं. ३.३, (विधानसभा निवडणूक १९७२)**

| अ. क्र | उमेद्वाराचे नाव | पक्ष | मिळालेली मते | विजय/पराजय |
|---|---|---|---|---|
| १. | वकीलराव लंघे | कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया | ३१३२९ | विजयी |
| २. | यशवंतराव गडाख | कॉग्रेस | २८०९७ | पराभूत |

मागील विधानसभेत जनतेने जो विश्वास मारूतरावांवर दाखविला १९७२ च्या विधानसभेत तो विश्वास यशवंतराव गडाख यांना मिळविण्यात पुरते अपयश आले. या विधानसभेत वकीलराव लंघे यांना ३१३२९ आणि गडाख यांना २८०९७ मते मिळाली. म्हणजेच तब्बल ३२३२ मतांनी कॉग्रेसला पराभव पत्कारावा लागला. अपयशाने खचून जावू नये म्हणून मारूतरावांनी यशवंतरावांना जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष पद देण्यासाठी सरकारकडे मागणी केली, आणि त्यांनी यशवंतराव गडाख यांना पद मिळवून दिले. यावरून मारूतरावांच्या बाबतीत एक गोष्ट आवर्जून नमूद करावी वाटते म्हणजे प्रत्येक पक्षामध्ये कार्यकर्ता तिकीट मिळावे यासाठी किती कष्ट घेत असतो. मात्र मारूतरावांनी स्वत:ला मिळत असलेले तिकीट गडाखांना देऊन त्यांचे नेतृत्व पारखले. त्यांच्यासारखा राजकीय उदारत्व आज शोधून मिळणे शक्य नाही हे वास्तव आहे.

### ३.८.७. महाराष्ट्र विधानपरिषद १९७२ :

१९७२ च्या विधानसभेचे तिकीट नाकारून मारूतरावांनी कॉंग्रेस जिल्हा प्रमुख पदही दुसऱ्याकडे सोपवले. यावर्षी ते नगर जिल्ह्यातून विधानपरिषदेवर निवडूण गेले. विधानपरिषदेतील पदाचा कार्यकाळ उपभोगत असताना राज्यापुढे मोठे संकट उभे राहीले. १९७२ साली सबंध महाराष्ट्रात दुष्काळाचे सावट पसरले होते. लोकांच्या रोजगाराचा व एकूणच विचार करता त्यांच्या जीवनमानाचा प्रश्न अवघड होऊन बसला होता. या काळात मारूतरावांनी खडी केंद्रे, रस्ते बांधणी, पाझर तलाव यांसारख्या योजना राबवून शेवगाव नेवासा तालुक्यातील लोकांना रोजगार उपलब्ध करून दिला. १९७२ च्या दुष्काळाच्या काळात संपूर्ण जिल्ह्यात पाझर तलावाचे काम मोठया प्रमाणावर झाले आहे. मात्र खेदाची गोष्ट अशी की यांपैकी ९० टक्केपक्षा अधिक पाझर तलाव भुईसपाट झाली आहेत. विधानपरिषद कार्यकाळातही मारूतरावांनी धरणग्रस्तांचे हित जपले. विधानपरिषद उपभोगल्यांनंतर मारूतरावांनी सहकार वाढविण्यावर भर द्यायचा होता म्हणून प्रत्यक्षपणे राजकीय पदावर न राहण्याचे त्यांनी ठरविले होते. त्यामुळे १९७८ च्या निवडणूकींत मारूतरावांनी प्रत्यक्ष सहभाग न घेता स्वपक्षीयांना पाठींबा दिला.

### ३.८.८ : पुलोद सरकार : मारूतरावांची भूमिका :

१९७८ ची विधानसभा निवडणूक राज्याचे राजकारण ढवळून काढणारी होती. कारण शरद पवार आपल्या सहकारी आमदारांना घेऊन पुलोद या नव्या पक्षाची स्थापना केली. तर दुसरीकडे उरलेला कॉंग्रेस हा इंदिरा कॉंग्रेस या नावाने ओळखला जावू लागला. मुळ कॉंग्रेंसमध्ये अशी फुट पडल्याने याचा फायदा विरोधकांना होणार होता हे नक्कीच. या निवडणूकीत जनता पक्षाच्या साहकार्याने शरद पवार यांनी पुलोद सरकार स्थापन केले आणि पवार मुख्यमंत्री झाले. या सर्वात मारूतरावांच्या भूमिकेचा विचार करता असे स्पष्ट होते की, मारूतराव हे यशवंतराव चव्हाण यांना मानणाऱ्या गटाचे होते. पुलोदला चव्हाणांचा प्रत्यक्षपणे पाठींबा नसला तरी अप्रत्यक्षरित्या पाठींबाच होता असे

म्हणता येईल. कारण पुलोदच्या भूमिकेवर यशवंतराव तटस्थ होते. याचा अर्थ मारूतरावांनी समजून घेतला आणि स्वत: मारूतरावांनीही तटस्थ राहण्याची भमिका घेतली. म्हणजेच मारूतरावांचाही अप्रत्यक्षरित्या तरी पुलोदला पाठींबा होता.

या निवडणूकीत पुलोदचे जरी आगमण होते तरी शेवगाव विधानसभा मतदार संघासाठी ही निवडणूक कॉंग्रेस विरूध्द कम्युनिष्ठ अशीच होती. ही विधानसभा वकीलराव लंघे (सी.पी.आय) विरूध्द् एकनाथ निंबाळकर (कॉंग्रेस) अशी रंगली होती. या निवडणूकीत निंबाळकरांचा पराभव होऊन वकीलराव निवडूण आले परिणामी तालुक्यातील कम्युनिष्ठांची ताकद अधिक वाढू लागली. इथे एक गोष्ट मात्र नक्कीच नमुद करण्यासारखी आहे की मारूतराव १९६२ ते १९७२ या काळात कॉंग्रेस जिल्हा अध्यक्ष होते. त्यांनी आपल्या कार्यकाळात कॉंग्रेसचे अस्तित्व जपले आणि वाढविले आहे. १९७२ आणि १९७८ या दोन्ही निवडणूकांचा विचार करता तालुक्यात कम्युनिष्ठ पक्षाची सत्ता रूढ होती. १९९० साली पुन्हा विधानसभेसाठी मारूतरावांना कॉंग्रेस पक्षाची उमेव्दारी जाहीर झाली.

## ३.८.९. महाराष्ट्र विधानसभा निवडणूक १९७२ : शेवगाव तालुका :

**तक्ता क्रं. ३.४, (विधानसभा निवडणूक १९९०)**

| अ. क्र | उमेद्वाराचे नाव | पक्ष | मिळालेली मते | विजय/पराजय |
|---|---|---|---|---|
| १. | मारूतराव घुले | कॉंग्रेस | ४४२७८ | पराभूत |
| २. | तुकाराम गडाख | इनडिपेंडन्ट् पार्टी | ५०२०२ | विजयी |

१९७८ नंतर ते १९९० पर्यंत मारूतरावांनी कधी कधी प्रत्यक्षपणे राजकारणात भाग घेवून पद उपभोगलेले नाही. मात्र याचा अर्थ असा नाही की पक्षातील त्यांचे महत्व कमी झाले. १९९० च्या महाराष्ट्र विधानसभेचे तिकीट मारूतरावांना मिळाले. निवडणूक झाली आणि त्यांना ४४२७८ मते मिळाली तर तुकाराम गडाख यांना ५०२०२ मते मिळाली. म्हणजे तब्बल ५९२४ मतांनी या निवडणूकीत मारूतरावांचा पराभव झाला. मात्र पराभवाने ते अजिबात खचले नाहीत. कारण त्यांचा स्वभावच असा होता की, यश मिळाले म्हणून कधी त्यांना त्याचा उन्माद चढला नाही, आणि अपयश आले म्हणून कधी खचूनही गेले नाही. त्यांच्या अशा स्वभावामुळे कार्यकर्त्यांना स्फूर्ती मिळत असे. १९९० नंतर मात्र मारूतरावांनी कधीच राजकारणात प्रत्यक्षपणे सहभाग घेतला नाही.

१९९० च्या विधानसभा निवडणूकीचे विश्लेषण करता असे लक्षात येते की, मारूतरावांना ही निवडणूक जिंकणे अतिशय महत्वाचे होते. कारण त्यांना यावेळी सहाकार मंत्रीपद भेटणार होतं. मारूतराव मंत्री झाले तर जिल्ह्यातील गटांचे महत्व संपुष्टात येते की काय म्हणून मारूतरावांना पक्षातूनच मोठया प्रमाणावर अप्रत्यक्षरित्या विरोधच झाला. त्यामुळे मारूतरावांना या निवडणूकीत पराभव स्विकारावा लागला. पुढे १९९५ सालच्या विधानसभेसाठी श्री. पांडूरंग अभंग साहेब यांना उमेव्दारी मिळवून दिली आणि तुकाराम गडाख यांच्या विरोधात अवघ्या बारा मतांनी ते निवडून आले. पुढे १९९९ साली श्री. शरदचंद्रजी पवार यांनी कॉग्रसमधून बाहेर पडून स्वतंत्र राष्ट्रवादी पक्षाची स्थापना केली. श्री. पवारांशी सलोख्याचे संबंध असल्याने मारूतरावांनी राष्ट्रवादी सोबत जाण्याचा निर्णय घेतला. आणि १९९९ चे विधानसभा निवडणूकीचे तिकीट आपल्या मोठया मुलास, श्री. नरेंद्रजी घुले पाटील यांना मिळवून दिले आणि निवडूण आणण्यात मोठे सहकार्य केले. स्वतः प्रत्यक्ष सत्तेत नसले तरी तालुक्यात विविध कामांचा शुभारंभ केले. असेच एकदा ८ मार्च २००२ रोजी शेवगाव तालुक्यातील पिंगेवाडी येथे कार्यकर्ता सभेला गेले असता, तीथे त्यांना हृदय विकाराचा झटका आला आणि मारूतराव क्षणार्धात अनंतवासात विलीन झाले आणि त्यांनी आपल्या एकूणच प्रवासाला पूर्ण विराम दिला.

### ३.९. समारोप :

अशा प्रकारे प्रस्तुत प्रकरणातून मारूतरावांचे राजकारणातील हेवेदावे पुढे येतात. तर त्यांनी राजकीय क्षेत्रात दिलेल्या योगदानाचे महत्व पुढे येते. वडिलांनी घालवून दिलेल्या आदर्शाचे धडे गिरवत आदरनीय नरेंद्रजी घुले पाटील व आदरणीय चंद्रशेखर घुले पाटील हे तालुक्याच्या व जिल्ह्याच्या राजकारणात आपली बांधिलकी जपत आहेत.

# संदर्भ सूची

१. खानझोडे हेमंत, ''राजकीय सिध्दान्त'', पर्सन पब्लिकेशन, पुणे, पान. क्रं. १३.

२. बिरमल नितीन, बोकील नीता, पवार वैशाली, आवारे अंकुश, ''राजकीय सिध्दान्त आणि संकल्पना'', डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, पान क्रं. १

३. बिरमल नितीन, बोकील नीता, पवार वैशाली, आवारे अंकुश, ''राजकीय सिध्दान्त आणि संकल्पना'', डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, पान क्रं. २

४. भोंगळे सुधीर, राजकारण पाण्याचे, राजहंस प्रकाशन, पुणे, पान क्रं. २४५.

५. नरूभाऊ लिमये, ''एक लोभस व्यक्तिमत्व – श्री. मारूतराव घुले पाटील'', श्री.मारूतराव घुले पाटील ५१ वा. सुवर्ण महोत्सव गुणदर्शन अंक, प्रकाशक – यशवंतराव गडाख, महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, शिवाजीनगर, पान क्रं. ४.

६. देसाई भाऊसाहेब देशमुख, मुलाखत दि. १७/१०/२०१५

७. देसाई भाऊसाहेब देशमुख, मुलाखत दि. १७/१०/२०१५

८. भय्यासाहेब देशमुख, मुलाखत दि. २०/१०२२०१५

९. अण्णासाहेब शिंदे, ''सामाजिक कार्य, अर्थकारण व राजकारण यांचा समतोल साधला'', श्री.मारूतराव घुले पाटील ५१ सुवर्ण महोत्सव गुणदर्शन अंक, प्रकाशक – यशवंतराव गडाख, महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, शिवाजीनग, पान क्रं. १७.

१०. आबासाहेब निंबाळकर, ''सच्चा मित्र'', श्री.मारूतराव घुले पाटील ५१ सुवर्ण महोत्सव गुणदर्शन अंक, प्रकाशक – यशवंतराव गडाख, महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, शिवाजीनगर, पान क्रं. २१

११.अनन्तराव पाटील, ‘‘अबोल—विधायक कार्यकर्ता—नेता’’, श्री.मारूतराव घुले पाटील ५१ सुवर्ण महोत्सव गुणदर्शन अंक, प्रकाशक — यशवंतराव गडाख, महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, शिवाजीनगर, पान क्रं. २०.

१२.भीमराव पाटील, ‘‘भूपुत्राची जीवन—गाथा’’,श्री.मारूतराव घुले पाटील ५१ वा. सुवर्ण महोत्सव गुणदर्शन अंक, प्रकाशक — यशवंतराव गडाख, महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, शिवाजीनगर, पान क्रं. ३९.

१३.भय्यासाहेब देशमुख, ‘‘पूजनीय व्यक्तिमत्व : स्व. मारूतराव घुलेपाटील’’, मनामनातील मारूतराव घुलेपाटील, संपादक — भीमराव पाटील, पृथ्वीराज प्रकाशन, पुणे, पान क्रं. ५५

१४.दै. केसरी — विकासाची दृष्टी आणि कृतीची जोड, एस. एन. थिटे, दि. १७/०७/२००२.

१५. दै. सकाळ — ‘आईची माया’ असेलेले व्यक्तिमत्व, भीमराव पाटील, दि. १७/०७/२००२.

१६.व्ही. टी. कासार, ‘‘सामाजिक परिवर्तनाचे भान असणारा नेता’’, मनामनातील मारूतराव घुले पाटील, संपादक — भीमराव पाटील, पृथ्वीराज प्रकाशन, पुणे, पान क्रं. ६३

१७.बाळासाहेब तनपुरे, ‘‘दीपस्तंभ’’, संपादकीय — साप्ताहीक नेवासा टाईम्स दीपस्तंभ गौरव अंक, दि. १५/०९/२०००

१८.श्री. पद्‌माकर रा. जोशी, ‘‘लोकसेवाव्रती याज्ञिक’’, एक विश्वस्त, संपादक — भास्कर शंकरराव जोंधळे, प्रकाशक — चंद्रशेखर घुले पाटील, महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, शिवाजीनगर, पान क्रं. ८५

१९.डॉ. अच्युतराव रसाळ, ‘‘माणूसपण जपणारे नेतृत्व’’, एक विश्वस्त, संपादक — भास्कर शंकरराव जोंधळे, प्रकाशक — चंद्रशेखर पाटील घुले, महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, शिवाजीनगर, पान क्रं. ४२.

२०.दै. लोकसत्ता — ‘‘मारूतरावांचा आदर्श सर्वांनी जोपासला पाहिजे’’, शरद पवार, दि. १३/०७/२००२.

२१. डॉ. करणसिंह घुले — मुलाखत दि. ३/१०/२०१५.

२२.श्री. बापूसाहेब भोसले, ‘‘मारूतराव पाटील – एक द्रष्टा राजकारणी’’, एक विश्वस्त, संपादक – भास्कर शंकरराव जोंधळे, प्रकाशक – चंद्रशेखर घुले पाटील, महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, शिवाजीनगर, पान क्रं. ८८

२३.पवार प्रकाश, महाराष्ट्राच्या नव्या राजकारणाची पुनर्रचना, प्रतिमा प्रकाशन, पान क्रं. २३६

२४.देसाई भाऊसाहेब देशमुख, मुलाखत दि. १७/१०/२०१५

२५.अर्जुन तिडके पाटील – मुलाखत दि. १९/१०/२०१५

२६.बाळासाहेब तनपुरे, ‘‘दीपस्तंभ’’, संपादकीय – साप्ताहीक नेवासा टाईम्स दीपस्तंभ गौरव अंक, दि. १५/०९/२०००

२७.अरूण थोरात, मुलाखत दि. ०८/१०/२०१५

२८.दिलीप नवथर, मुलाखत दि. १५/०९/२०१५

२९.बाळासाहेब भारदे, ‘‘प्रस्तावना’’, मनामनातील मारूतराव घुले पाटील, संपादक – पाटील भीमराव, पृथ्वीराज प्रकाशन, पुणे, पान. क्रं. ९

३०.दादा पाटील शेळके, मनापासून साथ करणारा आणि जिवाभावाचा मित्र, दै. लोकमत, १७/०७/२००२.

३१.पांडुरंग अभंग, विचारांचा कल्पतरू, मनामनातील मारूतराव घुले पाटील, संपादक – पाटील भीमराव, पृथ्वीराज प्रकाशन, पुणे, पान. क्रं. ४५

३२.पांडुरंग अभंग, विचारांचा कल्पतरू, मनामनातील मारूतराव घुले पाटील, संपादक – पाटील भीमराव, पृथ्वीराज प्रकाशन, पुणे, पान. क्रं. ४७

३३.भोंगळे सुधीर, राजकारण पाण्याचे, राजहंस प्रकाशन, पुणे, पान क्रं. २३८.

३४. भैय्यासाहेब देशमुख, मुलाखत दि. २०/१०/२०१५.

३५.हनुमंत जगदाळे, मुलाखत दि. १४/११/२०१५.

# प्रकरण ४ थे.

# सहकार : कृषी व सामाजिक विकास

## ४.१. प्रस्तावना :

जिथे स्पर्धा असते तिथे विजय आणि पराजय या दोन बाजू आपोआप जन्म घेतात. मग यामध्ये विजय मिळविण्यासाठी अन्य मार्गांचा वापर केला जातो किंबहूना तो करावा लागतो. स्पर्धेत स्थान मिळविण्यासाठी एक उच्च, सुसंस्कृत वर्ग दुर्बल घटकांवर मात करत राहतो. परिणामी 'बळी तो कानपिळी' या म्हणीप्रमाणे समाजातील दुर्बल घटक अधिक दुर्बल आणि प्रस्थापित वर्ग अधिक प्रभावशाली बनत जातो. हा प्रकार थांबावा व समाजातील सर्व थरातील लोकांना एकत्र येवून गुण्यागोविंदाने नांदता यावं यासाठी सहकाराकडे एक प्रभावी चळवळ म्हणून बघता येईल. याच सहकाररूपी प्रभावी हत्याराचा प्रभावीपणे वापर करत समाजातील दुर्बल व सर्व जाती–धर्मांतील लोकांना एकत्र करून मारूतराव घुले पाटील यांनी अहमदनगर जिल्ह्यात एक मोठी सहकार चळवळ उभी केली. आणि सहकारातून सामाजिक व कृषी घटकाला प्राधान्यक्रम देवून सर्वांगिण विकास घडवून आणला. सहकार ही संकल्पना अधिक स्पष्टपणे मांडता यावी यासाठी सहकाराची व्याख्या विचारात घ्यावी लागेल.

## ४.२. अर्थ : सहकार :

सहकार म्हणजे एकमेकांना सहकार्य करणे असा एक सरळ आणि साधा अर्थ समाजात प्रचलित आहे. अनेक विचारवंतांनीही अर्थ समजावून सांगितला आहे तो पुढीलप्रमाणे —

सुप्रसिध्द् विचारवंत **ए.ई. ईमरसन** म्हणतात की, 'जीवनसृष्टीच्या उत्क्रांतीत मानवाचा विकास घडविण्यात व आपले स्वत:चे अस्तित्व टिकविण्याकरिता मानवाने केलेल्या संघर्षपेक्षा त्याची सहकारी प्रवृत्ती जास्त सामर्थ्यवाने ठरली. नैसर्गिक संकटांना तोंड देणे, नैसर्गिक साधनसामग्रीचा शोध

घेणे, आपल्या शत्रूचा प्रतिकार करणे अशा प्रत्येक बाबतीमध्ये मानवाने इतरांच्या मदतीनेच प्रगती केली आहे.' यावरून असे स्पष्टपणे नमूद करता येईल की सहकार हे मानवी जीवनाचे केवळ फळ मानून चालनार नाही तर त्यास मूळ मानावे लागेल.

मानवी समाजाची उत्क्रांती ही स्पर्धात्मक किंवा आक्रमक वृत्तीतून झालेली नसून ती सहकारातूनच घडून आलेली आहे. या बाबतीत **एच.जी. वेल्स** म्हणतात की, 'मनुष्य हा आक्रमक प्रवृत्तीपेक्षा सहकारी वृत्तीचा आहे हे विचारात घेतले पाहीजे. समाजशास्त्रज्ञांच्या मते सहकार ही एक सामाजिक व आर्थिक चळवळ आहे. मनुष्याच्या सामाजिक वृत्तीमुळे तो एकत्रित, समुदायामध्ये राहतो अआणि एकमेकांच्या मदतीने आपल्या विविध गरजा पूर्ण करतो.'

सहकाराला मानवी जीवनाचे मूळ माननारे **मॉट्येग्यू** म्हणतात की, 'प्रेम व सहकार्याव्द्ारे मानवी जीवन जगणे व ते सुखी करण्याचा मार्ग विज्ञान दर्शविते.'

वरिल विचारवंतांचे सहकाराचे मत विचारात घेता सहकारचे मूळ आणि दिशा लक्षात येते. सहकार ही संकल्पना सुस्पष्ट कळावी व ती समजून घेता यावी यासाठी सहकाराची व्याख्या विचारात घ्यावी लागेल.

**४.३. व्याख्या : सहकार :**

सहकार ही संकल्पना स्पष्ट करता यावी यासाठी काही विचारवंतांनी सहकाराची व्याख्या केली आहे.

**१) एच. कल्व्हर्ट : —**

''आपल्या आर्थिक हिताच्या वृध्द्ीसाठी, समानतेच्या तत्त्वावर मानवी भूमिकेतून व्यक्तिंनी स्वेच्छेने एकत्र येऊन स्थापन केलेली संघटना म्हणजे सहकारी संस्था होय.''

## २) श्री. वैकुंठलाल मेहता :—

''समान गरजा असलेल्या व्यक्तींनी एकत्र येऊन आपल्या समान आर्थिक उद्‌दीष्टांच्या पूर्ततेसाठी स्वेच्छेने स्थापन केलेला संघटन प्रकार म्हणजे सहकारी संस्था होय.''

वरिलप्रमाणे सहकारी संस्था'ची व्याख्या विचारात घेता सहकाराची पुढील वैशिष्टये सांगता येतील —

१. समानता हाच सहकाराचा आधार आहे.

२. सहकारी संस्था ही व्यक्तींची व स्वेच्छा संघटना आहे.

३. सहकारी संस्था स्थापन करण्यासाठी समान गरजेचे लोक एकत्र येतात.

४. सहकारी संस्था हा एक व्यवसाय संघटन प्रकार आहे.

५. सभासदांच्या आर्थिक हिताचे रक्षण करणे हा या संघटनेचा उद्‌देश असतो.

वरिलप्रमाणे सहकाराचा अर्थ, व्याख्या व वैशिष्टये लक्षात येतात. सहकार चळवळीची मुहुर्तमेढ आणि वाटचाल पुढील प्रमाणे स्पष्ट करता येईल.

## ४.४. सहकार चळवळीचा इतिहास :

सहकार चळवळ अचानकपणे उदयास आलेली नसून तिला एक मोठा इतिहास साक्षी आहे. १८ व्या शतकातच काही ग्राहक सहकारी संस्था उदयास आल्या. या प्रामुख्याने युरोप खंडात उदयास आलेल्या असल्याचे दिसून येते. सुरूवातीच्या काळात या संस्था अधिक प्रभावी नव्हत्या मात्र या सहकारी संस्थांची व्यापकता यासाठी रॉबर्ट ओवेन यांनी अतोनात प्रयत्न केले. त्यांच्या या प्रयत्नांना चांगला प्रतिसाद मिळत गेला. इ.स. १८४४ साली इंग्लंडमध्ये रॉश्डेलमध्ये पायोनिर सोसायटीची स्थापना झाली आणि सहकार चळवळीला मूर्त स्वरूप प्राप्त झाले. जसजशी खात्री पटत गेली तसतशी सहकारी चळवळ रूढ व व्यापक होत आली. ओवेन यांनी सहकार क्षेत्राच्या प्रचारात दिलल्या

योगदानाचे फलित म्हणून त्यांना सहकाराचा पिता असे संबोधले जावू लागले. पहिली सहकारी संस्था इंग्लंडमध्ये स्थापन झाली. पुढे ती विविध देशांत प्रभावित झाली. यांपैकीच एक देश भारतही होता. भारतातही ही सहकार चळवळ अधिक प्रभावी व व्यापक बनली.

### ४.५. भारत आणि सहकार चळवळ :

भारताचे वैभव भारतीय खेडयांनी वाढविलेले आहे. देशाची संस्कृती, राहणीमान, इत्यादी गोष्टींना आजही खेडयाकडे अधिक महत्व दिले जाते. काळानुरूप काही ग्रामीण बदल घडून आले असतील मात्र भारतीय संस्कृती त्यांनी आपल्या मनाशी घटट् रूजविली आहे. म्हणून तर, ''खरा भारत बघायचा असेल तर खेडयाकडे चला" हे सांगण्याचा मोह खुदद् महात्मा गांधींजींनाही आवरता आला नाही. देशातील दैनंदिन घडामोंडीचे परिणाम जसे शहरी जीवनावर होतात तसेच ते ग्रामीण जिवनावरही होत असतात.

भारतात सहकाराची मुहुर्तमेढही खेडयातच रूजली आहे. अफाट दुष्काळ आणि त्यात सावकारांचे कर्ज यामुळे शेतकरी हवालदिल झाला, त्यात ब्रिटिश आणि सावकारांची आरेरावी आणि यातून होणारी पिळवणूक यामुळे भारतीयांच्या भावनांचा असंतोषात उद्रेक झाला. या उद्रेकाचा स्फोट १८५७ च्या सूमारास दिसून आला. या काळात त्यांनी पुणे आणि अहमदनगर जिल्ह्यातील सावकारांची घरे जाळण्याचा प्रयत्न केला. याचा परिणाम ब्रिटिश शासनावर झाला. त्यांनी शेतकऱ्यांचा रोश थांबावा व त्यांना दिलासा मिळावा म्हणून काही उपाययोजना सुचविल्या मात्र त्या तात्पुरत्या स्वरूपाच्याच स्वरूपाच्या आणि ब्रिटिशांच्या मर्जीतील होत्या. वारंवार पडणाऱ्या दुष्काळी परिस्थितीवर कायमस्वरूपी काही पर्याय आहेत काय याचा अभ्यास करण्यासाठी तेव्हाचे व्हाईसरॉय लॉर्ड कर्झन यांनी १९०१ मध्ये फॅमीन कमिशन नेमले. या कमिशनने टंचाईगस्त भागाचा दौरा करून काही शिफारशी सुचविल्या. यामधील एक महत्वाची शिफारस म्हणजे सहकारी पतपेढया निर्माण केल्या पाहीजेत त्याचबरोबर सहकारी संस्था निर्माण करून तयांची निकोप वाढझाली पाहीजे.

शेतकऱ्यांना सावकारा व्यतिरिक्त कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी सहकारी संस्था हा प्रभावी आणि सर्वांच्या हिताचा पर्याय असू शकतो. पुढे वर्षभरात फॅमिन कमिशनच्या शिफारशींचा विचार करण्यासाठी सर एलवर्ड लो यांच्या अध्यक्षतेखाली एक कमिशन नेमले. ज्या विविध शिफारशी होत्या त्यांवर आधारित १९०४ साली हिंदुस्थान क्रेडिट सोसायटीचा कायदा पास झाला. आणि १९०४ मध्ये देशात पहिला सहकारी कायदा पास झाला. हा कायदा मंजूर झाल्यानंतर सोसायटी, विविध कारखाने तसेच कृषि क्षेत्राशी निगडीत विविध सहकारी तत्वावर प्रकल्प उभारण्यास सुरूवात झाली. मात्र ही चळवळ उभी राहत असताना भारतीय शेती व्यवस्था खूपच भरडून निघाली.

## ४.६. ब्रिटिश शासन आणि भारतीय शेती :

भारतात सहकार क्षेत्राची व्याप्ती सहजासहजी झालेली नाही. त्यासाठी अनेक सहकारमहर्षींनी आणि भारतीय नेत्यांनी आपले योगदान दिलेले आहे. १७५७ साली प्लासीची लढाई झाली. आणि इंग्रजांनी भारतात प्रवेश केला असं आपाण मानतो. व्यापाराच्या धोरणाने भारतात आलेले इंग्रज हळूहळू आपला प्रभाव पाडू लागले. १८१८ पर्यंत भारतात मराठा सत्तेचा बऱ्यापैकी वचक होता. मात्र याच वर्षी मराठा सत्तेचा पूर्णपणे ऱ्हास झाला आणि ब्रिटिशांनी भारतात ईस्ट इंडिया कंपनी मार्फत कारोभार पाहण्यास सुरूवात केली. हळूहळू कंपनीने संपूर्ण भारतावरच आपले प्रभुत्व गाजविण्यासा सुरूवात केली. कंपनीने भारतीयांवर अन्याय – अत्याचार सुरू केले. याचे रूपांतर १८५७ च्या राष्ट्रीय उठावात झाले. या उठावात ब्रिटिशांना यश मिळाले असले तरी त्यांनी या उठावामुळे चांगलीच धास्ती भरली. भारतीय सत्ता कंपनीच्या हाती सुरक्षित राहू शकत नाही याची त्यांना खात्री झाली. भारतीय सत्ता कायम ब्रिटिश अंमलाखाली रहावी यासाठी ब्रिटिश पार्लमेंट आले. त्यांनी काही धूर्त भारतीयांना सोबत घेवून राज्यकारभार सुरू केला. १८५८ साली कायदा करून भारतातील कंपनीची राजवट संपुष्टात आणली आणि सत्तेची सूत्रे ब्रिटिश सरकारने प्रत्यक्षपणे आपल्या हातात घेतली. या सरकारने भारतीय जनतेवर

जुलूम अत्याचार सुरू केले, प्रत्यक्षपणे जे जमिनीचे मालक होते ते भूदास झाले यामुळे त्यांच्या उदारनिर्वाहाचा प्रश्न उपस्थित झाला, अनेक कुटुंब रस्त्यावरती आले. परिणामी त्यांना सावकारांच्या चरणाशी भिक घालावी लागली. हे सावकारही ब्रिटीश शासनाच्या वरदहस्ताने भारतीय लोकांची मोठया प्रमाणात पिळवणूक करू लागले. यापूर्वीच १७८७ साली लॉर्ड कॉर्नवॉलिसने कर सुधारणा कायदा लागु करून कायमधारा नावाची जमिन महसूलाची पध्दत सुरू केली. भारतातील कच्चा माल इंग्लंडमध्ये पाठवून त्यावर प्रक्रिया करून तो भारतात आणला जात. या प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार चालत असे, यामुळे व्यापारातील तुट भरून काढण्यासाठी भारतीय उत्पादकांवर जास्तीचा कर लादला जात असे. लॉर्ड क्लाइव्ह आणि वॉरेन हेस्टिंग्ज भ्रष्टाचाराच्या जाळयात अडकल्याने ते बदनाम झाले मात्र कॉर्नवालिस या मोहजालातून अलिप्त होता. त्याने भ्रष्टाचार थांबविण्यासाठी प्रयत्न सुरू केले पण तो वर्णभेदी होता. त्याचा भारतीयांवर किंचीतही विश्वास नव्हता. म्हणून त्याने युरोपियनांना उच्च आणि अतिमहत्वाच्या पदी संधी दिल्या. यामुळे भारतीय हा अजूनच खाइत गाडला गेला. अशा पध्दतीने भारतीय कृषी क्षेत्राचा आणि उद्योगधंद्यांचा प्रश्न गंभीर होत चालला होता. ब्रिटिश शासनाच्या कृपेने सावकारशाहीला उत आला. ग्रामीण अर्थसत्ता पूर्णपणे धनिकांच्या (सावकार) आणि वणिक (व्यापारी) यांच्या हातात एकवटली. परिणामी वर्णभेदाबरोबरच गरिब—श्रीमंत ही संकल्पना माननारा आणखी एक वर्ग तयार झाला. कर्ज एकदा घेतलं की ते कर्जदार पुन्हा कर्ज कधीच फेडू शकणार नाही यासाठी कर्जदाते विविध युक्त्या लढवत. ही परिस्थिती जवळपास २० व्या शतकाच्या आरंभापर्यंत होती. आज या परिस्थितीत बदल होत असल्याचे दिसून येते. आजचे भारत सरकार असो किंवा राज्य सरकार हे खाजगी सावकारशाहीला शह देता यावा म्हणून कर्जदारांमागे उभे राहत आहे. खाजगी सावकारांचे कर्ज बुडीत काढण्याचेही अनेकदा शासनाने आदेश दिलेले आहेत. त्याचबरोबर कमी व्याजदरात तर कधी बिगरव्याजी शासकीय कर्ज उपलब्ध करून दिले आहे. यामुळे आधुनिक भारतात शेतकरी वर्ग कर्जाच्या गर्तेतून काही प्रमाणात बाहेर पडत असल्याचे चित्र दिसून येते.

ब्रिटिश सरकारने १९०४ साली सहकाराचा कायदा केला आणि कष्टकरी, गरीब शेतकरी समाजात अर्थस्वातंत्र्याचे पदार्पण झाले. मात्र या कायद्याचे दृश्य दिसायला जवळपास अर्ध्या शतकाचा कालावधी लागला. कायदा तयार झाल्यानंतर पहिली २५ ते ३० वर्षे फक्त कायदा समजावून घेण्यात आणि कायद्यात सुधारणा करण्यातच गेला. १९१३ ते १९१९ या कालखंडात पहिल्या महायुध्दाने जगात धुमाकुळ घातला. यामुळे जागतिक स्तरावर अर्थव्यवस्था डबघाईस आली यामुळे बहुतेक सहकारी पतपेढयांनी अचानक माघारी घेतल्याने ग्रामीण अर्थकारण पुन्हा धनिकांच्या पायी नतमस्तक झाले. याकाळात दुष्काळ असल्याने ब्रिटिशांनी दुष्काळी भागासाठी उभारलेल्या काही सिंचन सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला. मात्र यातही मोठया प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याने सावकारशाही पुन्हा मांड ठोकून उभी राहीली.

१८८५ साली स्थापन झालेल्या राष्ट्रीय सभेचे नेतृत्व १९२० साली महात्मा गांधीकडे आले. त्यांनी सत्य आणि अहिंसा या तत्वानुसार आपली चळवळ सुरू ठेवली. त्यांच्या विचारांनी देश प्रभावित होत चालला होता. १९२० ते १९४७ हा ‘गांधीयुगा’चा कालखंड समजला जातो. त्यांनी ब्रिटिश शासनाच्या हुलकावणीसाठी अखंड हिंदूस्थानात लढा उभारला आणि राष्ट्रीय कॉंग्रेस बरोबरच राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळीचे सर्वाधिक प्रभावी नेते ठरले. या स्वातंत्र्य लढ्यात आणि ब्रिटीशांच्या धोरण आणि कायद्यात पूर्णपणे विरोधाभास होता. राष्ट्रीय कॉंग्रेस ही राष्ट्रवादी विचार पेरणारी संस्था तर होतीच मात्र त्याचबरोबर धर्मनिरपेक्षतेला महत्व देणारीही संस्था होती. त्यामुळे ही ब्रिटीशांची डोकेदु:खी ठरत होती. लोकांना राष्ट्रीय कॉंग्रेसच्या ध्येयधोरणापासून वेगळे करण्यासाठी ‘फोडा व झोडा’ या नीतीचा ब्रिटिशांनी वापर करून धार्मिक मुद्यात हात घातला. आणि भारतीयांमध्ये अंतर्गत कलह माजवून आपले उद्‌दीष्टये साध्य करत राहीले. यावेळी मोठ्या प्रमाणात देशाच्या अंखंडत्वास तडा गेला. यात सामान्य जनता चांगलीच भरडून निघत होती. मात्र त्यांच्यापुढे दुसरा पर्याय नसल्याने त्यांना नाइलाजास्तव अन्याय सहन करावा लागत होता. १९३० च्या दशकात महाराष्ट्रात मोठया प्रमाणात सामाजिक व वैचारिक चंगळवाद माजला.

समाजव्यवस्थेच्या कल्पनाशक्तिवर प्रश्नचिन्ह उभे होते, शेतकरीवर्ग ग्रामीण व्यवस्थेशी संघर्ष करण्यास सज्ज झाला होता. या सर्वांवर १९१७ साली रशियात झालेल्य क्रांतीचा मोठ्या प्रमाणात प्रभाव होता. कारण या क्रांतीमुळे भांडवलशाही व्यवस्था व बाजारपेठांत होणाऱ्या डबघाईत भरडून निघणाऱ्या वर्गाचे प्रश्न जागतिक स्तरावर सिध्द् झाले. तसेच दारिद्र्य, कष्टकरी शेतकरी यांची शोषणातून मुक्तता करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर लढा उभारला होता. या कल्याणकारी—उदारमतवादी विचारप्रणालीचे प्रतिबिंब जगभर प्रभाव पाडू लागले. भारतातही याची ठिणगी पडली. आणि बुरखटलेला समाज जागृतेच्या दिशेने मार्गक्रमण करण्याइतकातरी सुज्ञ झाला. मात्र एक—ना—अनेक अडचणी त्याच्यासमोर उभी राहत होती. त्यांच्यासमोरील सर्वात मोठी अडचण म्हणजे गरिबी होय. ब्रिटिशांनी भारतीय कृषि सुधारण्यासाठी काही प्रयत्न केले मात्र ते सर्व शेतकरी वर्गांच्या जिव्हारी ठरल्याने त्यात त्यांना यश आले नाही. परिणामी ब्रिटिश कालखंडात भारतीय कृषि ही मागासलेली राहीली.

### ४.७. अहमदनगर जिल्ह्यातील सहकारी चळवळ :

महाराष्ट्र राज्यातील अहमदनगर जिल्ह्याचा विचार करता हा जिल्हा क्षेत्रफळाने सर्वात मोठा जिल्हा आहे. राज्याच्या नकाशात मध्यभागी स्थान मिळविलेला हा जिल्हा जणू राज्याचे काळीजच होय. २०० किमी. पर्यंत जिल्ह्यात उगम पावणारी व जिल्ह्यातच भिमेला मिळणारी प्रवरा नदीला अनन्य साधारण महत्व आहे. मात्र ब्रिटिश कालखंड आणि त्याआधीपासूनच जिल्ह्यात दुष्काळाची परंपरा राहीलेली आहे. मात्र येथील जिगरबाज कष्टकऱ्यांनी दुष्काळग्रस्त जिल्हा असूनही साखर उत्पादनात कमालीचे स्थान गाठले आहे. या सर्वांत जिल्ह्याच लाडके आणि कतृत्वशिल व्यक्तिमत्वाचे मोठे योगदान राहीले आहे. केवळ जिल्ह्यातच नव्हे तर आशिया खंडातील पहीला सहकारी साखर कारखाना उभारणारी ही व्यक्ति म्हणजे पद्मश्री विठठ्लराव विखे पाटील होय.

पद्मश्री विठठ्लराव विखे पाटीलांमुळे अहमदनगर जिल्ह्यात सहकार चळवळीने डोके वर काढले. त्यांना या सदकार्यात मदत म्हणून महाराष्ट्राचे भाग्यविधाते कै.

यशवंतराव चव्हाण, डॉ. धनंजय गाडगीळ तर खास कृषी क्षेत्रासाठी वैकुंठराव मेहता यांचे सहकार्य लाभले. प्रवरा नदीवरील धरणाच्या पाण्याचा फायदा घेण्यासाठी १९२६ साली ब्रॅडी नामक विदेशी कंपनीने अहमदनगर जिल्ह्यातील व प्रामुख्याने श्रीरामपूर तालुक्यातील हरेगाव येथे पहिला खासगी साखर कारखाना उभारला. कारखाना चांगला चालवा यासाठी इंग्रजांनी कारखान्याशी साटेलोटे करून शेतकऱ्यांच्या हजारो एकर जमिनी गडप केल्या आणि कारखान्यास ऊस लागवडीसाठी कायमस्वरूपी देवून टाकल्या. एकीकडे स्वातंत्र्याचा लढा तर दुसरीकडे शेतकऱ्यांची ही अवस्था देश अगदी होरपळून निघाला होता. ब्रॅडी कंपनीला मिळालेलं यश बघून अनेकांच्या तोंडाला लोणी लागलं आणि अनेक भारतीय भांडवलदार गोदावरी, नीरा, आणि प्रवरा खाऱ्यात एकवटले. हळूहळू साखर कारखानदारीला उत आला. कारखान्यांना ऊस मिळावा यासाठी लक्षावधी शेतकऱ्यांच्या जमीनी सरकारने उद्योजकांच्या घशात घशात घातल्या. १९३० ते १९५० या २० वर्षांत कोल्हापूर, सांगली, पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्ह्यांतील ८५ हजार एकर जमीन पाटपाण्याच्या हक्कासह या उद्योगांच्या हवाली करून हजारो शेतकऱ्यांना देशोधडीला लावले. यातून मार्ग कसा काढता येईल यासाठी पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील विचार करत होते. शेतकऱ्यांचे हाल त्यांना देखवत नव्हते. १९४५ साली डॉ. धनंजय गाडगीळ यांच्या अध्यक्षतेखाली अहमदनगर जिल्ह्यातील बेलापूर याठीकाणी बागायतदारांची परीषद भरली. या परीषदेत ‘साखर कारखाने हे शेतकऱ्यांच्या मालकीचे असावेत’ अशी ठाम भूमिका मांडली. साखर उद्योगासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी काढूण घेण्याऐवजी उलटपक्षी त्यांच्याकडूनच ऊस उत्पादन करून घ्यावे. पद्मश्री विठ्ठलराव यांचा विचार डॉ.गाडगीळ यांना इतका पटला की, हे कार्य करण्याची जबाबदारी त्यांनी पद्मश्री विठ्ठलरावांवर सोपवली. पद्मश्री विठ्ठलराव यांनी एकत्रितपणे दोन लाख रूपये भाग भांडवल गोळा करून १९५० साली आशिया खंडातील शेतकऱ्यांच्या हक्काचा पहिला सहकारी साखर कारखाना उभारला आणि शेतकऱ्यांची एक गुंठाही जमिन न घेता साखर उद्योग यशस्वी होवू शकतो हे सिध्द करून दाखविले आणि

देशापुढे सहकारी कारखानदारीचा एक नवा आदर्श घालवून दिला. त्यांच्या या यशस्वी प्रयोगाने ग्रामिण भागाचा कायापालट होवू लागला. एवढ्यावरच न थांबता त्यांनी सहकारी सोसायटी, सहकारी पतसंस्था तसेच इतर सहकारी उद्योग उभारण्यावर भर दिला आणि सहकाराला ग्रामिण समाजाची 'कामधेनू' उपाधि दिली. पुढे चालून त्यांनी जुन्या सहकार कायद्यात बदल करावेत असा हट्ट महाराष्ट्राचे भाग्यविधाते कै.यशवंतराव चव्हाण साहेब यांच्याकडे धरला. शेवगाव तालुक्यातील गांधीवादी नेते व कॉंग्रेस पक्षाचे कार्यकर्ते पद्‌मभूषण बाळासाहेब भारदे पाटील यांनी सहकारी कायद्यात काही प्रगतशील बदल सुचवणारा उत्तम मसुदा तयार केला. आदरणीय चव्हाण साहेबांनी या मसुद्याचा स्वीकार करताना एकच बदल केला. तो बदल म्हणजे 'सहकार संस्था सरकारी नियंत्रणानुसार चालतील' हे जुने कलम बदलुन 'सहकार चळवळीमध्ये केवळ सभासदांचंच सार्वभौमत्व असावं' ही भूमिका कायद्यात नमुद केली. अशाप्रकारे पद्‌मश्री विठ्ठलराव विखे पाटील यांचे सहकार क्षेत्रातील कार्य चालू असताना जिल्ह्यातील अनेकांनी त्यांचा व मा.चव्हाण साहेब यांचा आदर्श डोळ्यापुढे ठेवून सहकार क्षेत्रात आगमन केले. यांपैकीच एक उम्मेदी नेतृत्व म्हणजे दहिगाव—ने चे सहकार महर्षी स्व.मारूतरावजी घूले पाटील हे होय.

### ४.८. मारूतराव घुले पाटील यांचे सहकार :

१९५९ मध्ये दत्तकविधान होवुन पढेगावचे विश्वनाथराव बनकर घूले घराण्यात मारूतराव या नावाने प्रसिध्द झाले. त्यावेळी एखाद्या ज्यातिषानेही जरी सांगीतले असते की, मारूतराव भविष्यात एक मोठे सहकार महर्षी म्हणून नावाजतील तरी त्याच्या भविष्यवाणीवर कदाचित कोणीही विश्वास ठेवला नसता. मात्र पद्‌मभूषण भारदे पाटील, आबासाहेब निंबाळकर तसेच पद्‌मश्री विठ्ठलरावजी विखे पाटील यांच्याशी सलोखा असल्याने त्यांना कायमच यांच्याकडून प्रेरणा मिळत राहीली. मारूतरावांनीही पद्‌मश्री विठ्ठलराव विखे पाटीलांकडून प्रेरणा घेवून दहिगाव—ने आणि तालुक्यातील गोर—गरिबांचे प्रश्न मार्गी लावण्याचा प्रयत्न केला.

### ४.८.१. सहकाराचे रोप : दहिगाव—ने वि.का.से.सह.सोसा. :

दहिगावचे पाटीलकीचे वतन सांभाळत असतानाच मारूतरावांचे गावात समाजसेवेचे कार्य प्रभावीपणे चालू होते. दहिगाव—ने चा आणि परिसरातील शेतकरी सावकारांच्या कचाट्यात पूर्णत: अडकलेला असायचा. त्यातून बाहेर निघण्यासाठी त्याला मार्ग आणि संधी मिळत नसे. मार्ग मिळालाच तर तो मार्ग मुक्तिचा मिळायचा. हे सर्व थांबाव यासाठी मारूतरावांची तगमग चालली होती. शेतकरी बांधवांना सावकाराच्या पाशातून कसे मुक्त करता येईल याचा ते दिवस—रात्र विचार करत असे. आपल्या सोबत्यांना काही सूचते का म्हणून त्यांनाही या कल्पनेबद्दल विचारत. असाच विचार चालू असताना सहकारी सोसायटी हा विचार त्यांच्या पुढे आला. त्यांनी लगेचच आपल्या सहकाऱ्यांना याबद्दल कळविले. मित्रांनीही लगेचच होकार दिला, शेअर्सही जमा झाले आणि २३ मे १९५४ या दिवशी मारूतरावांच्या प्रयत्नाने दहिगाव—ने येथे विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीची स्थापना केली. शेतकरी वर्गास सावकाराच्या कचाट्यातून मुक्त करणे हा या सोसायटीच्या स्थापनेमागचा मुख्य हेतू होता. तर कमी व्याजात कर्ज उपलब्ध करून देणे, शक्य झाल्यास बिनव्याजी कर्ज उपलब्ध करून देणे, पिकांसाठी खते व बियाणांचे वाटप करणे अशी वैशिष्टय होती. सावकार शेतकऱ्यांना कर्ज वाटत मात्र मोबदल्यात जमीनी लिहून घेत असे, शेतकऱ्यांनी वेळेत कर्ज फेडले नाही तर त्यांच्या जमीनी सावकार गडप करत असे. या सर्व प्रकाराला शह देण्यासाठी दहिगाव विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीने अल्पदराने कर्ज पुरवठा करण्यास सुरूवात केली. परतफेड वेळेत झाली नाही तर त्याला मुदत वाढवून दिली मात्र कधी कोणाच्या जमीनीवर डल्ला मारण्याचा प्रयत्न केला नाही. यामुळे शेतकरी वर्ग बऱ्यापैकी सुखावला. एखाद्या वर्षी दुष्काळामुळे पिक आले नाही की धान्याचा तुतवडा अगदी शेतकऱ्यांनाही जाणवत असे. मग सावकार आपल्या काठारातून त्यांना धान्य देत असे. धान्य देतानाचे माप आणि धान्य परत घेतानाच्या मापात खुप तफावत असायची. धान्य देताना ते लहान आधुलीने देणे आणि घेताने मोठया आधुलीने घेणे. अशी रूढी सावकारांची

चालली असल्याचे मारूतरावांच्या कानावर येताच त्यांनी सहकारी तत्वावर व दहिगाव विविध कार्यकारी सेवा सोसायटी मार्फत ज्वारी बॅंकेची स्थापना केली. ज्वारी बॅंकेच्या नफ्यावर जनता शिक्षण प्रसारक मंडळाची इमारती उभारली. तर काही धान्य गावातील बोर्डींगच्या विद्यार्थ्यांसाठी मोफत दिले. असे विविध लोकोपयोगी कार्य या सोसायटीमार्फत करून गावाला व परिसराला योग्य दिशेने घेवून निघाले. सोसायटी ही सहकारी असून ती शेतकऱ्यांना लुटण्यासाठी नव्हे तर त्यांना जीवनदान देण्यासाठी उभारली आहे. त्यामुळे कदही असे होता कामा नये की सोसायटीमुळे एखाद्यावर अन्याय होईल, अशी त्यांची धारणा होती.

### ४.८.२. अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंक :

अहमदनगर जिल्हा महाराष्ट्रातील क्षेत्रफळाने सर्वांत मोठा जिल्हा असून दुष्काळग्रस्त नव्हे नव्हे अतिदुष्काळग्रस्त जिल्हा म्हाणून गणना झालेला जिल्हा आहे. अतिशय कमी पर्जन्यमान असल्याने जिल्हा कायमच दुष्काळाच्या कवेत राहीलेला आहे. आजही कुठे अहमदनगर हे नाव कानावर पडले की त्याचक्षणी डोळयांसमोर दुष्कळाचे भीषण दृश्य उभा राहते. जिल्ह्यातील १४ तालुक्यांपैकी अगदी दोन ते तीन तालुके सोडले तर इतर तालुके हे अतिदुष्काळग्रस्त आहेत. अहमदनगर जिल्हा हा विस्ताराने मोठा असल्याने भौगोलिकदृष्टया त्याचे चार विभाग निर्मिले आहेत. जिल्ह्यात काही धरणे व गोदावरी —प्रवरेच्या कृपेने काही भाग सुजलाम सुफलाम झालेले आहेत.

समाजातील एकूण घटकांचा उध्द्‌ार व्हावा, त्यांना एकत्रीत काम करण्याची संधी उपलब्ध व्हावी, त्यांच्या सामाजिक, आर्थिक तसेच राजकीय बाबींची उन्नती व्हावी हा सहकाराचा मुख्य हेतू असून राष्ट्राच्या उन्नतीत सहकार चळवळीने नवचैतन्य निर्मिले आहे. १९०४ मध्ये भारतात पहिला सहकार कायदा मंजूर झाला आणि तदनंतर काही वर्षातच म्हणजे १९१२ मध्ये को—ऑपरेटिव्ह सोसायटीज ॲक्ट नावाचा कायदा मंजूर झाला आणि सहकार चळवळीने पहिल्या टप्प्यातून दुसऱ्या टप्प्यात मुसंडी मारली. या कायद्यान्वये ‘क्रेडीट’ हा शब्द वगळण्यात आला. हा शब्द वगळण्यात आल्यामुळे

खरेदी—विक्री संध, सेंट्रल व प्रॉव्हिशियल बॅका, लॅड डेव्हलपमेंट बॅका, गृह पुरवठा सोसायटया तसेच सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांनी वरती डोके काढले आणि सहकाराची जोरदार वाटचाल सुरू झाली. सहकारची वाटचाल सुरू असताना १९४५ साली डॉ. गाडगीळ समितीने ग्रामीण कर्जविषयक प्रश्नांचा सर्वांगीण व सखोल अभ्यास करून आधुनिक उपाययोजना सुचविल्या तर श्री. सरैय्या यांच्या अध्यक्षतेखाली सहकारी योजना समिती मुंबई सहकारी बॅकेचा संघ आणि श्री. नानावटी यांचे अध्यक्षतेखली शेती पुरवठा संघटना समिती नेमून झालेल्या विचारमंथनातून सध्या अस्तित्वात असलेली पीक कर्जपध्द्ती जन्माला आली. पुढे आणखी काही उपाययोजना सुचवून जिल्हा सहकारी बॅक आणि जिल्हा परिषदा यांच्यावर जिल्ह्यातील आर्थिक विकासाची जबाबदारी धेरणात्मकरित्या सोपविण्यात आली. त्यामुळे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅकांच्या पतपुरवठयाच्या धोरणास आर्थिक विकासामध्ये महत्वाचे स्थान प्राप्त झाले. गोरवाल समितच्या शिफारशीनुसार प्रत्येक जिल्ह्यासाठी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅकांची स्थापना होवू लागली. कामगार दिनाचे औचित्य साधून व्दैभाषिक मुंबई राज्याचे तत्कालिन मुख्यमंत्री ना. श्री. यशवंतरावजी चव्हाण साहेबांनी १ मे १९५८ रोजी अहमदनगर जिल्ह्यासाठी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅक स्थापनेची घोषणा केली. त्यावेळी मुंबई राज्याचे सहकार मंत्री बाळासाहेब भारदे यांच्याकडे हस्तांतरीत करण्यात आले. आणि श्री. भारदे यांनी याबाबत पुढाकार घेवून प्रत्यक्षपणे कार्याची आखणी केली. आणि दि. २८ फेब्रुवारी १९५८ रोजी राज्य सरकारने जिल्हा बॅकेचे पहिले संचालक मंडळ नियुक्त केले. ते पुढीलप्रमाणे होते :

**तक्ता क्रं. ४.१ (नियुक्त संचालक मंडळ : १९५८)**

| **अ.क्रं.** | **संचालकाचे नाव** | **हुद्दा** |
|---|---|---|
| १. | श्री. मो.कु फिरोदिया | चेअरमन |
| २. | श्री. के.बी. रोहमारे | व्हा. चेअरमन |
| ३. | श्री. एम. एस. घुले | संचालक |
| ४. | श्री. डॉ. एस.व्ही. निसळ | संचालक |
| ५. | श्री. पी.जे.अंबाारे पाटील | संचालक |
| ६. | श्री. वि.ए.विखे पाटील | संचालक |
| ७. | श्री. आर. आर. खटोड | संचालक |
| ८. | श्री. ज. व्ही. बनकर | संचालक |
| ९ | श्री. एस. एस. पाटील | संचालक |
| १०. | श्री. बी. एन. देशमुख | संचालक |
| ११. | श्री. बी. जी. पाटील | संचालक |
| १२. | श्री. एस. वाय. पाटील | संचालक |
| १३. | श्री. धनवटे पाटील | संचालक |
| १४. | श्री. कुलकर्णी (नियुक्त) | संचालक |
| १५. | श्री. वाय. बी. वायतोंडे मॅनेजर बी.एस.सी बॅक मुंबई. (नियुक्त) | संचालक |

(अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती बॅक सुवर्ण महोत्सव अंक १९८२)

अशा पध्द्तीने अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅकेची स्थापना होवून आदरणीय मारूतरावजी घुले पाटील यांनी बॅकेच्या स्थापनेपासून तर मरेपर्यंत (१९५८ ते २००२) संचालकपद भूषविले आहे. त्यांच्या पदाचा आढावा पुढील तक्त्यावरून लक्षात येईल —

**तक्ता क्रं. ४.२ मारूतरावांचा जिल्हा सहकारी बॅकेवरील कार्यकाल :**

| अ.क्रं. | वर्ष | पद |
|---|---|---|
| ०१. | १९५८ ते १९७७ | संचालक |
| ०२. | १९७८ ते १९८० | चेअरमन |
| ०३. | १९८१ ते १९८५ | संचालक |
| ०४. | १९८६—८७ | चेअरमन |
| ०५. | ७९८८ | संचालक |
| ०६. | १९८९ ते १९९०—९१ | चेअरमन |
| ०७. | १९९१ ते २००२ (मृत्यू) | संचालक |

सदर तक्त्याचा विचार करता मारूतरव हे अनेक वेळा म्हणजेच एकूण पाच वेळा अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅकेचे चेअरमन राहीलेले आहे. जिल्हा बॅकेला केवळ नगर शहरापूरतेच मर्यादित न ठेवता जिल्ह्यात खेडोपाडी तिच्या फांद्या रूतविल्या. ही बॅक म्हणजे शेतकरी, अल्पभूधारक, नवभूधारक, दुर्बल घटक, छोटे कारागीर यांचे विकासासाठी सातत्याने प्रयत्न करणारी बॅक आहे. या बॅकेच्या जिल्ह्यात जवळ—जवळ १२५ शाखा आहे. या शाखांमधील एक शाखा दहिगाव सारख्या ग्रामीण भागात उभारून ग्रामीण विकासाला प्रगतीच्या दिशेने मार्गक्रमण करण्यास सुरूवात केली. या बॅकेमार्फत भागातील अनेकांना अनुदान तत्वावर विहीरी खोदून दिल्या. शेतीसाठी पाणी पुरेल इतके पाणी परिसरात असल्याने गुलाबराव पाटील घुले यांच्या सहकार्याने १०२ विहीरी शेतकऱ्यांना खोदून दिल्या आणि कोरडया शेतीसाठी पाणी उपलब्ध करून दिले. तसेच मुळा धरणाचे पाणी परिसरातून वाहत जावून पुढे ते जायकवाडी धरणाला जावून मिळते. यासाठी गावतलावांचा उपक्रम हाती घेतला. आणि पाटपाण्यावर हे पाझर तलाव गच्च भरून भागात पाण्याचा स्त्रोत कायम जिवंत ठेवला. शेतीसाठी आणि लहान उद्योगांसाठी कर्जपुरवठा करणारी बॅक अल्पावधीतच प्रसिध्द्‌ीस आली. मारूतराव जिल्हा सहकारी बॅकेचे प्रमुख

असताना ही बॅक आशिया खंडातील प्रथम क्रमांकाची सहकारी बॅक म्हणून नावारूपास आली. यामध्ये मारूतराव आणि त्यांच्या ग्रुपचे प्रयत्न आणि कर्तव्यनिष्ठा होती. बॅकेने कायमच शेतकऱ्यांचे हित जपले आहे. साखर कारखाने, शेतकरी, शैक्षणिक संस्था, चारिटेबल ट्रस्ट, बचत गट, पतसंस्था अशा विविध घटकांना कर्जपुरवठा करून या संस्थांना डबघाईला येण्यापासून सावरले आहे. या सगळयांत मारूतराव घुले पाटील यांचा सिंहाचा वाटा राहीलेला आहे.

### ४.८.३. ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना पायाभरणी व वाटचाल :

महाराष्ट्राचे भाग्यविधाते मा. श्री. यशवंतरावजी चव्हाण साहेबांनी ठरविलेल्या कृषि औद्योगिक धोरणाची वाटचाल म्हणून नगर जिल्ह्यात कृषी क्षेत्राला डोळयासमोर ठेवून विविध प्रयोग सुरू झाले. जायकवाडी व मुळा सारख्या धरणांच्या बांधणीचे कार्य सुरू झाले. नेवासा व शेवगाव तालुका आनंदाने लहरत होता कारण जायकवाडी धरण बांधणी झाल्यानंतर आपल्या दारासमोरून गंगा दुथडी भरून वाहणार याचा त्यांना मोह झाला  होता त्याचबरोबर या भागातील शेती कित्येक दिवसांनी हिरव्या शालूने मोहणार होती. शेवगाव व नेवासा तालुक्याला सुरूवातीपासूनच एक वेगळी ओळख होती. ती म्हणजे हे दोन्ही तालुके ज्वारीच्या धान्याचे कोठार म्हणून ओळखले जात. मारूतराव घुले पाटील, गुलाबराव घुले पाटील, लक्ष्मण बाबा नवथर, खामगावचे आगळे पाटील, लोखंडे पाटील, सकाहरी पाटील घुले अशा काही मोजकेच शेतकरी ऊसाचे पिक घेत असतं. १९६३—६४ साली भीषण परिस्थिती निर्माण झाली. शेवगाव व नेवासा तालुक्यातील हजारो शेतकऱ्यांनी ऊसाचे पिक घेतले. मात्र या दोन्ही तालुक्यांत स्वत:च्या हक्काचा साखर कारखाना नसल्याने त्यांच्यापुढे मोठी समस्या निर्माण झाली. बाहेरील कारखान्यांनीही हा ऊस नण्यास स्पष्ट नकार दिला. शेतकरी हवालदिल झाला, त्यांनी मारूतराव घुले पाटीलांना साकडे घालून आमदार साहेब तुम्हीच यातुन काहीतरी मार्ग काढा. मारूतरावांना शेतकऱ्यांच्या डोळयातील तगमग शांत बसू

देत नव्हती. त्यांनी आपले वजन वापरून बाहेरील दोन ते तीन कारखान्यांना ऊस नेण्यास भाग पाडले. मात्र मारूतरावांना अजूनही शांत बसवत नव्हते, कारण हे असंच किती दिवस किती वर्ष चालणार. आता आपल्या भागातील म्हणजे नेवासा, शेवगाव आणि पाथर्डी तालुक्यातील शेतकऱ्यांना स्वतःच्या हक्काचा साखर कारखाना असावा अशी त्यांनी खुणगाठ बांधली आणि आपली इच्छा परिसरातील लोकांना बोलावून दाखविली. सर्वांनी त्याच क्षणी आदरणीय घुले पाटीलांचा जयजयकार केला. आणि कारखाण्यासंदर्भातील चर्चेसाठी शेवगाव येथे बैठक बोलावण्यात आली.

### ४.८.३.१. पहिली बैठक :

शेवगाव, नेवासा आणि पाथर्डी तालुक्याला स्वतःच्या हक्काचा कारखाना काढण्याचा निर्णय निश्चित झाल्यानंतर शेवगाव येथे पद्श्री विठ्ठलराव विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली कारखाण्यासंदर्भात प्राथमिक बैठक घेण्यात आली. या बैठकीत कारखान्याचे नाव व जागा निश्चित करण्यात आली. त्यावेळी ०१ कोटी रूपयांच्या आतील कारखान्यास केंद्रसरकारकडील परवान्याची गरज नव्हती. तसा कायदाच होता. यानुसार दि. १९ जानेवारी १९७० रोजी कारखान्यास रजिस्टेशन मिळाले. कारखाना इमारतीसाठी माळीनगरचा प्लॅट निश्चित झालेला होता. मात्र माळीनगरने त्यांना नवीन प्लॅट देण्याचे मान्य केले. अशा सुज्ञ आणि नेटक्या व्यवहारावर मेहरबान होत केंद्रसरकारकडून नवीन प्लॅट मिळविला आणि तत्काळ कामास सुरूवात केली.

### ४.८.३.२. कारखाना शुभारंभ :

जे ठरविले ते जिद्दीने करायचे, ठरविलेले काम पूर्णत्वास नेण्यासाठी मारूतराव जिवाचे रान करत. म्हणूनच तर १९७० ला लायसन्स मिळाल्यानंतर अवघ्या ४—५ वर्षातच कारखान्याचा गळीप हंगाम सुरू झाला. यामागे त्यांची दिव्यदृष्टी दडलेली आहे. कारण आजही आपण बघतो अनेक सामुहीक कामांना/संस्थांना मान्यता मिळते परंतू कामातील कुचराईपणा आणि

अव्यवहारीपणा यामुळे अनेक योजना पडून राहतात प्रसंगी त्या पुन्हा शासनाकडे वर्ग होतात. मात्र मारूतरावांनी एकदा मनाशी एखादी गोष्ट ठरविली की ती पुर्ण होईपर्यंत त्यांना चैन पडत नसे. यावरून त्यांच्या कार्यातील सातत्य व पारदर्शकपणा दिसून येतो. कारखाण्याचे काम पूर्ण होवून १७ मे १९७५ रोजी पहिल्या गाळप हंगामाचा शुभारंभ महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री मा. ना. शंकररावजी चव्हाण यांच्याहस्ते झाला तर पहिल्या साखर पोत्याची पुजा माजी केंद्रीय राज्यमंत्री मा. अण्णासाहेब शिंदे यांच्या हस्ते झाली. त्याचवेळी कारखाना मुख्य इमारतींच्या कोनशिलांची पुजा मा. वसंतदादा पाटील यांच्या हस्ते झाली. आणि कारखान्याची यशाच्या दिशेने वाटचाल सुरू झाली. कारखाना उभारून मारूतरावांनी धरणग्रस्त आणि गरिब कुटुंबातील युवकांना नोकरीसाठी प्राधान्यक्रम दिला. त्यांच्या या धोरणामुळे गरिब जनतेच्या आशा—अकांक्षांना खऱ्या अर्थाने न्याय मिळाला आहे. आपल्या सवंगडींना सोबत घेवून या बहीरूपी व्यक्तिमत्वाने ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याला राज्यात प्रथम स्थान मिळवून दिले.

१९७६ साली कारखाना साईटवर शेतकरी मेळावा आयोजित केला होता. या मेळाव्यासाठी प्रमुख उपस्थिती म्हणून तत्कालिन परराष्ट्रमंत्री आदरणीय यशवंतरावजी चव्हाण साहेब आले होते. त्यांनी या मेळाव्यात मारूतरावांचे तोंडभरून कौतूक केले. आणि सांगितले की, १९६२ साली आम्ही मारूतरावांना विधानसभेवर काही अपेक्षा ठेवून घेतले ती अपेक्षा खऱ्या अर्थाने त्यांनी फलितास आणली. त्यांच्याकडून केलेल्या अपेक्षेपक्षा त्यांनी या भागातील जनतेला दिले. याबद्दल त्यांचे करावे तेवढे कौतूक कमीच आहे. चव्हाण साहेबांच्या या उद्गारांनी मारूतरावांना भारावून आले. कारण मारूतराव स्वत:ला यशवंतराव चव्हाण साहेबांचे अनुयायी मानत कारण त्यावेळी यशवंतराव आणि मारूतराव असे एक समिकरणच बनलेले होते. हे समिकरण दिवसेंदिवस घट्टच होत चालले होते. कारखाना उभारणीपासून अनेकदा मारूतरावांनी चेअरमन म्हणून तर अनेकदा संचालक मंडळात तसेच तज्ञ म्हणून काम केलेले आहे.

कारखाना उभारणीपासून ते आजवर अनेकांनी चेअरमनपद भूषविले आहे. त्यांची सूची पुढील प्रमाणे :

**तक्ता क्रं. ४.३ (ज्ञानेश्वर सह. साखर कारखाना चेअरमन)**

| अ.क्र | चेअरमनचे नाव | कार्यकाल |
|---|---|---|
| ०१. | श्री. मारूतराव घुले पा. | १९/१०/१९७० ते १३/०८/१९७८ |
| ०२. | श्री. नरवडे नारायणराव | १४/०८/१९७७ ते २३/०३/१९८३ |
| ०३. | श्री. मारूतराव घुले पा. | २४/०३/१९८३ ते २७/०५/१९८७ |
| ०४. | श्री. नरवडे नारायणराव | २८/०५/१९८७ ते ०५/०१/१९९४ |
| ०५. | श्री. मारूतराव घुले पा. | ०६/०१/१९९४ ते २८/०२/१९९९ |
| ०६. | श्री. चंद्रशेखर घुले पा. | ०१/०३/१९९९ ते आजपर्यंत(२०१५) |

(श्री. ज्ञा.सह.सा.का. कार्या. माहीतीवरून)

वरील तक्त्याचा विचार करता असे लक्षात येते की, श्री. ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन पद सर्वाधिक काळ मारूतरावांनी उपभोगले आहे. असे असले तरी त्यांना या पदावर कायमस्वरूपी रहावे ही सभासद व शेतकऱ्यांची इच्छा होती. त्यांच्या कार्यकाळात कधी कुणी त्यांच्या कायमच या पदावर राहण्याबाबत किंवा त्यांच्या कार्यभारावर बोट ठेवले नाही. अगदी विरोधकही मारूतरवांना कारखाना निवडणूकांत सहकार्य करत. यामागचा महत्वाचा उद्‌देश म्हणजे कारखान्याला जर राष्ट्रीय पातळीवर घेऊन जायचे असेल तर मारूतरावांच्या तोडीतलं व्यक्तिमत्व दुसरं कोणी नव्हतं. मारूतरावांची काम करण्याची पध्द्‌तच वेगळी होती. आजची परिस्थिती पाहता राजकीय

विरोधक एकदम टोकाची भूमीका घेतात, तसे मारूतरावांचे नव्हते. ते विरोधकांनाही आपुलकीची वागणूक देत. त्यांचे लग्नकार्य किंवा इतर कार्यक्रमाला आवर्जून हजेरी लावत असे हा त्यांचा गुण विरोधकांना आकर्षित करून घेत असे. वरिल तक्त्यात सर्वच चेअरमनपदी राहीलेल्या व्यक्तिंनी कारखान्याला यशाच्या शिखरापर्यंत नेण्यासाठी महत्वाचे योगदान दिलेले आहे, देत आहे. मात्र तरिही या सर्वांत संस्थापक चेअरमन आदरनीय मारूतरावजी घुले पाटील यांचे योगदान अव्दितीय आहे. कारण त्यांच्या कार्यकाळातच ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना हा महाराष्ट्रातील अव्वल क्रंमाकांचा कारखाना ठरला. मारूतरावांनी कारखान्यासाठी दिलेले योगदान, कामगार वर्गाबद्दलची त्यांची आत्मियता आणि मा. यशवंतराव चव्हाण यांच्यावर असणारी त्यांची निष्ठा यामुळे मारूतरावांनी उभारलेला ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान आजही राज्यातील प्रमुख कारखान्यांपैकी एक आहे.

### ४.८.३.३. कारखाना अंतर्गत सुविधा :

कारखाना सुरू झाल्यानंतर ऊसतोडणी मजूरांची तसेच वाहन ड्रायव्हर व शेतकरी बांधवांची कारखान्यावर प्रचंड गर्दी होते. त्यांची जेवणाची सोय नसल्याने इच्छा नसूनही त्यांना महागडया हॉटेलमध्ये जेवण करावे लागत, हे मारूतरावांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी कारखाना साईटवर गरिब—कष्टकरी वर्गासाठी व कामगारांसाठी स्वस्तात व सर्वांना परवडेल असे कारखानामार्फत झुन्का भाकर केंद्र सुरू केले. त्याचबरोबर शेतकरी बांधवांना वरदान ठरलेल्या जिल्हा सहकारी बॅकेची व बॅक ऑफ बडोदा या राष्ट्रीयकृत बॅकेची कारखाना साईटवर शाखा उघडली. कल्चरल मंडळ स्थापन केले. टपाल ऑफीस, दवाखान, दिवाबत्तींची सोय, शौचालये तसेच भेटीसाठी येणाऱ्या पाहुण्यांची सोय म्हणून एक विश्रामगृह बांधण्यात आले. कामगारांच्या मुलांना शिक्षण घेता यावे यासाठी सुरूवातीला प्राथमिक शाळा, हायस्कूल आणि महाविद्यालये स्थापन करण्यात आली. कामगारामध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी आणि ज्यांना वाचनाची आवड आहे अशांसाठी कारखान्यामार्फत सुसज्ज असे ग्रंथालय

उभारण्यात आले. अशा अन्य काही सोई—सुविधा कारखान्यामार्फत मारूतरावांनी सुरू केल्या. आजही त्यांच्या नंतरच्या पिढीनेही त्यांच्या कार्याच्या आदर्शात सातत्य ठेवलेले आहे.

मारूतरावांच्या हयातीत कारखान्याच्या कामकाजाची माहीती पुढील तक्त्यावरून लक्षात येते. :

## तक्ता क्रं. ४.४ (कारखान्याच्या कामकाजाची सर्वसाधारण माहीती)

| अ. न. | गळीत हंगाम | हंगामाचे दिवस | बंद काळा सह मे.टन | बंद काळ सोडून मे.टन | गळीत (मे.टन) | पोती (क्विंटल) | साखर उतारा (टक्केवारीत) | हेक्टरी सरासरी उत्पादन | ऊस खरेदी दर | गाळप क्षमता प्रतिदिन मे. टन | इतर कारखान्याचा दिलेला ऊस मे.टन |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४(अ) | ४(ब) | ५(अ) | ५(ब) | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १ | १९७४—७५ | ८ | २८९ | ६६१ | २२१३ | १२०२ | ५.४७ | ७९ | १४०—०० | १२५० | —— |
| २ | १९७५—७६ | १८७ | १०८७ | १४१८ | २०१२९६ | २१५०७२ | १०.६६ | ८३ | १३१—०० | १२५० | —— |
| ३ | १९७६—७७ | १५३ | १३२० | १४७० | २९८६७२ | १९८३२२ | ९.९२ | ६७ | १२१—०० | १२५० | —— |
| ४ | १९७७—७८ | २३६ | १२६७ | १४४७ | २८४८३५ | ३२६०७५ | ११.०० | ८० | १११—०० | १२५० | —— |
| ५ | १९७८—७९ | २०९ | १३६८ | १४९९ | १९६२५२ | ३१५२७० | ११.१० | ७३ | १३१—०० | १२५० | ०.४१ |
| ६ | १९७९—८० | १४९ | १३२५ | १५०३ | २७४६२९ | २०४१०३ | १०.४७ | ५७ | १८३—०० | १२५० | ०.२७ |
| ७ | १९८०—८१ | १८३ | १५०२ | १६२१ | ३७१८०३ | ३०५८९४ | ११.२१ | ७१ | २७७—०० | १२५० | ०.८२ |
| ८ | १९८१—८२ | २५७ | १४५० | १६१५ | ४१३९७४ | ३९८८५० | १०.८० | ७१ | २१५—०० | १२५० | १.६१ |
| ९ | १९८२—८३ | १९९ | २०९२ | २२६० | ३०६४७७ | ४३९२०५ | १०.६९ | ६७ | १९७—०० | २००० | ०.७५ |
| १० | १९८३—८४ | १५० | २०५९ | २२४६ | ४१३९७४ | ३४३८६० | ११.२२ | ५३ | २१७—०० | २००० | ०.१२ |
| ११ | १९८४—८५ | १७९ | २३५१ | २५२२ | ३०६४७७ | ४८७२७१ | ११.६० | ६७ | ३२०—०० | २००० | ०.६२ |
| १२ | १९८५—८६ | १६८ | २३७३ | २५३५ | ४१९४५१ | ४७६१५० | ११.९९ | ७७ | ३५७—०० | २००० | १.३१ |
| १३ | १९८६—८७ | १४६ | २२६६ | २४७२ | ३९७२९२ | ३६७९४५ | ११.१८ | ६० | ३४०—०० | २००० | —— |
| १४ | १९८७—८८ | १६६ | २३११ | २४८४ | ३२९००२ | ४१८९३५ | १०.९८ | ६८ | ३३५—०० | २००० | —— |
| १५ | १९८८—८९ | १६० | २५०० | २७३६ | ३८०७९१ | ४३३७४१ | १०.५३ | ५९ | ३३५—०० | ३००० | —— |
| १६ | १९८९—९० | २३५ | २५७० | २९४० | ४११७०० | ६२६३२५ | १०.४२ | ७० | ३८१—०० | ३००० | —— |
| १७ | १९९०—९१ | २२२ | २९६९ | ३३२३ | ६००७२५ | ६६८७२० | १०.१६ | ६३ | ३८१—०० | ३००० | —— |
| १८ | १९९१—९२ | २०२ | ३०९४ | ३३३५ | ६५७०४१ | ७१०१२५ | ११.४० | ७१ | ४२५—०० | ३००० | —— |
| १९ | १९९२—९३ | १५० | ३२०६ | ३४१३ | ६२२२६९ | ५३५८१५ | ११.१६ | ५६ | ६४५—०० | ३००० | १.२३ |
| २० | १९९३—९४ | १३७ | २५५२ | २९४८ | ४७८९०८ | ३६७२५८ | १०.५७ | ५० | ७४०—०० | ३००० | —— |
| २१ | १९९४—९५ | २२८ | ३४६४ | ३८०२ | ३४७५१२ | ८३७९४० | १०.६४ | ६४ | ७००—०० | ३००० | २.५१ |
| २२ | १९९५—९६ | १२६ | ३२५३ | ३६६० | ७८७५१३ | ७९७७८० | १०.३० | ५० | ६५५—०० | ३००० | १.८७ |
| २३ | १९९६—९७८ | २०५ | ३०५४ | ३३७५ | ७७१०६४ | ४०९३०० | १०.६४ | ४८ | ६७५—०० | ३००० | —— |
| २४ | १९९७—९८ | २१५ | ३११० | ३४४३ | ३८१८७२ | ६९७७६० | १०.३० | ७५ | ८५०—०० | ३००० | २.१३ |
| २५ | १९९८—९९ | २३३ | २९५६ | ३२९० | ६३४७८५ | ७१४१७० | १०.६४ | ६८ | ८५९—०० | ३००० | ३.७२ |
| २६ | १९९९—०० | १७६ | ३४६० | ३७७९ | ६३१७७७ | ९२१४८० | १०.९६ | ७४ | ८७५—०० | ३००० | ३.४२ |
| २७ | २०००—०१ | १६४ | ४२४८ | ४६३८ | ८००८६३ | ८७४६९० | ११.२० | ८१ | ८८५—०० | ५००० | ४.०६ |
| २८ | २००१—०२ | १७८ | ४७५५ | ५०९० | ७४४५९५ | ९१८५०० | ११.४८ | ६४ | ७९३—०० | ५००० | १.४८ |

(श्री ज्ञानेश्वर सह. साखर कारखाना, भेंडा, संक्षिप्त माहीती)

वरील तक्त्यावरून असे लक्षात येते की, कारखान्याचा पहिला गळीत हंगाम सन १९७४—७५ साली पार पडला या वर्षी गाळपाची क्षमतेचा वेग हा प्रतिदिन १२५० मे. टन चा होता. सन १९७४—७५ ते सन १९८१—८२ पर्यंत कारखान्याने गाळपाचा वेग समपातळीवर ठेवला आहे. यामध्ये बाहेरील कारखान्यांकडूनही ऊस आयात केल्याचे दिसून येते. त्यानंतर कारखान्याने कामगार, आधुनिक यंत्रणा, आधुनिक प्रयोग राबवून कारखान्याच्या साखर उत्पादनात वाढ घडवून आणली. सन १९८२—८३ ते १९८७—८८ च्या काळात कारखान्याने आपले उत्पादन वाढवून प्रतिदिन गाळप वेग २००० मे. टन पर्यंत नेला. मारूतरावांनी केलेल्या प्रयत्नांना दिवसेंदिवस यश मिळत गेले. कारखाना आणखी वेगवान बनावा म्हणून मारूतरवांनी कारखाना सभासद व परिसरातील शेतकऱ्यांना ऊसाचे महत्व पटवून दिले. ऊस हा बक्कळ पैसा मिळवून देणारे पिक असल्याने शेतकऱ्यांनीही भरपूर प्रमाणात ऊस लागवड केली आणि सन १९८८ ते १९९९ या या दशमकाळात गाळप क्षमता प्रतिदिन ३००० मे. टन पर्यंत वेग आला. हा मारूतरावांनी कामगार, शेतकरी व सभासद यांच्यात केलेल्या जनजागृतीमुळे शक्य झाले. १९९९ साली कारखान्याचे चेअरमनपद मारूतरावांचे तीसरे रत्न मा. चंद्रशेखर घुले पाटील यांच्याकडे आले. आपल्या वडीलांनी दाखवून दिलेल्या सत्याच्या व स्नेहाच्या मार्गाने आज चंद्रशेखर घुले पाटील यांनी आपल्या वडीलांचे स्वप्न पूर्ण करताना त्यांच्याच मार्गाचा अवलंब करत आहे. यामुळे मारूतरावांच्या अनंतवासानंतरही त्यांची उणीव चंद्रशेखर भाऊंच्या रूपाने भरून निघाली. १९९९ साली चंद्रशेखर भाऊंकडे कारखान्याचे चेअरमनपद देवून मारूतरांवांनी एक प्रकारे भाऊंची कसोटीच घेण्याचे ठरविले मात्र भाऊंनी आपल्या वडीलांनी दाखवून दिलेल्या सत्याच्या मार्गाने निरंतर सेवा देऊन कारखाण्याची गाळप क्षमता वेग ५००० मे. टनापर्यंत पोहचवून राज्यातील प्रथम क्रमांकाचा सहकारी साखर कारखाना म्हणून श्री. ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याचे नाव लौकीक केले. १९९९ पासून ते आजवर हे पद चंद्रशेखर घुले पाटीलांकडे त्यांच्या कर्तृत्वशिल नेतृत्वामुळे त्यांच्याकडे टिकूण राहीले आहे. कारखान्याच्या स्थापनेपासून कारखान्याच्या उत्पादनात वाढच होत आलेली


आहे. आज देशातील व राज्यातील अनेक खाजगी व सहकारी साखर कारखाने बंद पडले मात्र मारूतरावांनी उभारलेला श्री. ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना आजही प्रगतीपथावर कार्यरत आहे. यामागे मारूतरावांची प्रेरणा महत्वाची ठरते. अशा पध्द्तीने सदर तक्त्याच्या आधारे कारखान्याच्या कामकाजाचा निश्चित अंदाज बांधता येतो. याव्यतिरिक्त कारखान्याने विविध लोकोपयोगी उपक्रम व निसर्गसंवर्धनासाठी कार्यक्रम राबविले आहेत आणि राबवित आहेत.

**४.८.३.४. कारखान्याचे विविध उपक्रम / कार्यक्रम :**


**१. उसतोड, वाहतूक योजना व रस्ते विकास—बांधकाम योजना :** कारखान्याचे उत्पादन दिवंसेदिवस वाढतच चालल्याने वाहतूकीसाठी अडचणी येवू लागल्या. वाहतूकीची साधने कमी पडू लागली. यावर उपाय म्हणून कारखान्यानेरस्ते विकास योजना सुरू केली. या योजने अंतर्गत १९८८—८९ व १९९१—९२ साली अनुक्रमे एक—एक असे दोन चेन पध्दतीचे बुलडोझर खरेदी केली.ही बुलडोझर कमी दराने सभासदांना व इतरांना भाड्याने देण्याची योजना विकसीत करण्यात आली. रस्ते विकासावर भर देवून वाहतूकीचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी १९८९ मध्ये ५५ ट्रक्स खरेदी केल्या. त्यामुळे कारखान्याला वेळेत व अधिक ऊस पुरविण्यात मदत झाली.रस्त्यांचा विकास करताना प्रत्येक रस्त्यासाठी ३० लाख रूपये असा निधी कारखान्याकडून पुरविला जातो. हे रस्ते कारखाना ऊस उत्पादन क्षेत्राअंतर्गत येतात.

**२. अत्याधुनिक सुधारित बेणे :** पारंपारिक व कमी उत्पादन देणारी बेण्यांना हद्दपार करत नवीन व अत्याधुनिक संशोधनात्मक बेणे शेतकरी बांधवांपर्यंत पोहचवून त्यांच्या उत्पादनात वाढ घडवून आणली. यासाठी वसंतदादा शुगर इन्टिट्यूट, पुणे मधील शास्त्रज्ञ, कृषी व विद्या विभाग यांनी विकसित केलेल्या आधुनिक ऊस लागण तंत्रज्ञानाची पध्द्त अवलंबिली जावू लागली.

**ऊसाची मांडणी पुढील आकृतीवरूनलक्षात येते :**




वरिल आकृतीवरून ऊस या पिकाची शरिर रचना लक्षात येते. ऊसाचे मुळं आणि फुटवे यांची माहीती पुढील आकृतीवरून लक्षात येईल.




वरिल दोन्ही आकृतीमंधून ऊस या पिकाची सर्वसाधारण माहीती लक्षात येते.

**३. कंपोष्ट खत प्रकल्प :** रासायनिक खतांचा अत्याधिक मारा झाल्याने शेतातील आर्द्रता नष्ट होवून उत्पादन कमी आणि खर्च जादा असे उलट समिकरण होवू लागले. यावर उपाय म्हणून कंपोष्ट खतांचा वापर शेतकरी बांधवांनी करावा यासाठी सदर प्रकल्प उभारून शेतकऱ्यांमध्ये याबाबत जनजागृती घडवून आणली.हा प्रकल्प दोन टप्प्यात विकसित झालेला असून यापासून उत्पादन स्वरूपात २९०९९७६ रू. आजवरची मिळकत आहे.

**४. श्री. मा. घु. पा. गृहनिर्माण संस्था :** आपल्या आयुष्याची महत्वाची वर्षे कारखान्याच्या सेवेत घालविणाऱ्या सेवकाा त्याच्या निवृत्तीनंतर स्वतःच्या हक्काचे घर घेता यावे या हेतूने कारखान्याकडून अत्यल्प दरात जमीन व बडोदा बॅकेकडून गृहकर्ज उपलब्ध करून दिले जाते. त्यामुळे कामगार — सेवक स्वतःच्या हक्काच्या घराचे स्वप्न पूर्ण करण्यात यशस्वी ठरतो. हा महाराष्ट्रातील पहिला व एकमेव उपक्रम आहे.

अशा पध्द्तीने ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याचा प्रवासचित्रीत होतो.

## ४.८.४. शेवगाव विभाग सहकारी कापूस जिनिंग व प्रेसिंग सोसायटी लि. शेवगाव :

अहमदनगर जिल्ह्यातील शेवगाव तालुका हा कापसासाठी प्रसिध्द् समजला जातो. त्याचबरोबर हा तालुका ज्वारीसाठीही प्रसिध्द् आहे. कापूस व ज्वारी यांसारख्या पिकांसोबतच या भागातील लोक तूर, करडी, हरभरा यांसारखी पिके घेत. या पिकांचा बाजारभाव करून येणाऱ्या पैशांतून उदारनिर्वाह भागवत असत. आजच्यासारखेच १९५०—६० च्या दशकातही शेवगाव—नेवासा तालुक्यात कापूस या पिकाला अधिक महत्व होते त्यामुळे या भागातील लोक कापसाचे उत्पन्न अधिक घेत असे. यामध्ये प्रामुख्याने ज्यांच्या जमिनी नदीकाठलगत आहे त्यांच्या जमिनी पांढऱ्या सोन्याने डौलदार दिसत. हाच डौलदार, मनमोहक असणारा दागिना शेतकरी जेव्हा बाजारात आणत असे तेव्हा त्याला कधीच रास्त भाव मिळत नसे. त्यामुळे पोटच्या पोरासारखे जपलेले पिक मातीमोल भावात विकावे लागे. शेतकरी राजा हवालदिल झाला होता. शेतकऱ्यांचे हे दुःख मारूतराव जवळून बघत होते. शेतकऱ्यांना या संकटातून बाहेर काढण्यासाठी काही कार्यकर्त्यांना सोबत घेवून मारूतरावांनी ०६ फेब्रुवारी १९६० साली शेवगाव येथे या शेवगाव विभाग सहकारी कापूस जिनिंग व प्रेसिंग सोसायटीची स्थापना केली.

शेवगाव विभाग सहकारी जिनिंग व प्रेसिंग सोसायटी उभारून मारूतरावांनी शेतकऱ्यांच्या कष्टाला न्याय देण्यासाठी केलेला हा प्रत्यय एवढा सफल ठरला की आज जिल्ह्यातील अनेक कापूस उद्योग डबघाईला गेले मात्र मारूतरावांनी उभारलेली शेवगाव विभाग सहकारी कापूस जिनिंग व प्रेसिंग सोसायटी दिवसेंदिवस भरभराटीला येत आहे. आजही जिल्ह्यातील काही प्रमुख कापूस उद्योगांपैकी अव्वल ठरलेली ही संस्था आहे. यामागचे कारण म्हणजे मारूतरावांनी शेतकऱ्यांच्या पिकाला रास्त भाव देवून त्यांचा विश्वास संपादन केला आणि शेतकरी बांधवांप्रति एक आत्मियता जागृत ठेवली. त्यांच्या पश्चात आजही या संस्थेने आपले स्थान प्रगतीपथावर ठेवलेले आहे.

स्थापनेपासूनच या संस्थेने शेतकऱ्यांचे हित जोपासले आहे आणि जोपासत आहे. २२०८५ हा नोंदणी क्रमांक मिळवून शेवगाव विभाग सहकारी कापूस जिनिंग व प्रेसिंग सोसायटी जेव्हा उभारली त्यावेळी सभासदांसाठी काही आवश्यक अटी ठेवण्याचा निर्णय संस्थेने व मारूतरावांनी ठेवण्याचे ठरविले. त्या अटी अशा ठेवायाच्या की ज्यातून सोसायटीबरोबरच शेतकरी बांधवांचे अधिक हित साधले जाईल.या अटी पुढील प्रमाणे होत्या :

**सभासदांसाठीच्या अटी :**

१. त्याच्या वयाची किमान १८ वर्षे पूर्ण असावी.

२. तो शेतकरी असावा व कापूस उत्पादक असावा.

३. त्याच्या सभासदाचा लेखी अर्ज बोर्डाने मंजूर केलेला पाहिजे.

४. त्याने सोसायटीस कपासी देणेबाबतचा करारनामा केला पाहिजे.

५. त्याने प्रवेश फी म्हणून रू. १०० दिली असली पाहिजे.

वरील सभासद अटींचा विचार करता असे लक्षात येते की सभासद कोणत्याही परिस्थितीत शेतकऱ्याचे हित जपणारा असावा असा यातून निष्कर्ष काढता निघतो.

### ४.८.५. जायकवाडी धरण — सहकारी जलसिंचन योजना :

जायकवाडी धरण बांधणीच्या वेळी शेवगाव तालुक्यातील एकूण २९ तर नेवासा तालुक्यातील ९ गावे ही पाण्याखाली गेल्याने या गावांचे पुनर्वसन झाले होते. यांच्या पुनर्वसनाचा प्रश्न निकाली काढण्यासाठी मारूतरावांनी सरकारी दरबारी चकरा मारल्या. त्यावेळी महाराष्ट्रात कॉग्रेस पक्षाची सत्ता होती. तरीही प्रकल्पग्रस्तांसाठी स्वत:च्या पक्षाविरोधी भूमिका घेणारे मारूतराव घुले पाटील होते. जायकवाडी धरण झाल्यानंतर जायकवाडी जलाशय फुगवटयावर मुळा उजव्या कालव्यावर व जायकवाडी उजव्या कालव्यावर एकूण १४ उपसा जलसिंचन कार्यान्वित करून ३ टक्के पाणी बॅक वाटरसाठी राखीव ठेवले. याची माहीती पुढील प्रमाणे :

### श्री. दत्त पाणी पुरवठा सहकारी संस्था मर्यादित दहिगाव—ने :

या संस्थेची उभारणी करून मारूतरावांनी परिसराला दिलेला शब्द पाळला अशी आजही लोकांची मारूतरावांबद्दची निष्ठा सांगते. दहिगाव विभागासाठी मर्यादित स्वरूपाची ही सहकारी संस्था उभारून या भागातील ओसाड शेती कायमस्वरूपी ओलिताखाली आणण्याचा एक प्रामाणिक प्रयत्न मारूतरावांनी आपल्या कार्यकर्त्यांना सोबत घेवून केला. या संस्था एकूण ४०० हेक्टर जमिनीसाठी कार्यरत आहे. तर यामध्ये एकूण ३२२ सभासद आहेत. Rg.noANR/shevgaon/LFT/861/1983 हा या संस्थेचा नोंदणी क्रमांक आहे. स्थापनेवेळी या स्थापनेवळी या संस्थेमध्ये एकूण ०७ सदस्य होते. ते पुढील प्रमाणे —

**तक्ता क्रं. ४.५ (पहिले नियुक्त मंडळ, श्री.द.पा.पु.सह.संस्था मर्या. दहिगाव—ने)**

| अ.क्रं. | नाव | प्द |
|---|---|---|
| ०१ | मारूतराव घुले पाटील | संस्थापक—चेअरमन |
| ०२ | पघाकर रामकृष्ण | सदस्य |
| ०३ | मनसुरभाई पठाण | सदस्य |
| ०४ | बबनराव कमानदार | सदस्य |
| ०५ | यादुराव बारगुजे | सदस्य |
| ०६ | भिकाजी गुंजाळ | सदस्य |
| ०७ | सुहास गांधी | सदस्य |

(कार्यालयिन माहीती श्री. दत्त पाणी पुरवठा सह. संस्था मर्या. दहिगाव—ने)

सुरूवातीला स्थापनेवेळी या संस्थेत एकूण ०७ जण सहभागी होते. त्यांच्या संख्येत वाढ घडवून तिथे आता ७ ऐवजी १३ जणांचे टिमवर्क आहे. अशाच पध्द्तीने ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या साहय्याने शेवगाव व नेवासा तालुका मिळून एकूण १४ उपसा जलसिंचन योजना कार्यरत आहे. यांपैकी काही जायकवाडी तर काही मुळा कालवावर आधारलेले आहेत. त्यांची माहीती पुढील तक्त्यावरून लक्षात येईल —

## तक्ता क्रं. ४.६ (पाणी पुरवठा सहकारी संस्था यादी)

| अ. क्र | योजनेचे नाव | टोलिताखालील क्षेत्र (एकर) | पाण्याची सोय |
|---|---|---|---|
| ०१ | श्री. दत्त सहकारी पाणी पुरवठा संस्था मर्यादीत दहिगाव—ने, ता. शेवगाव | १००० | जायकवाडी जलाशय फुगवटा |
| ०२ | श्री. ज्ञानेश्वर सहकारी पाणी पुरवठा संस्था मर्यादीत, गळनिंब ता. नेवासा. | १००० | जायकवाडी जलाशय फुगवटा |
| ०३ | श्री. दघेश्वर सहकारी पाणी पुरवठा संस्था मर्यादीत, दहिफळ ता. शेवगाव | १००० | जायकवाडी जलाशय फुगवटा |
| ०४ | श्री. विठ्ठल सहकारी पाणी पुरवठा संस्था मर्यादीत, सुरेगाव ता. नेवासा | १००० | जायकवाडी जलाशय फुगवटा |
| ०५ | श्री. शनैश्वर सहकारी पाणीपुरवठा संस्था मर्यादीत, बोडखा ता. शेवगाव | ८०० | जायकवाडी जलाशय फुगवटा |
| ०६ | यशवंत सहकारी पाणी पुरवठा मर्यादीत, कन्हेटाकळी ता. शेवगाव | ८२३ | जायकवाडी जलाशय फुगवटा |

| | | | |
|---|---|---|---|
| ०७ | श्रीराम सहकारी पाणी पुरवठा संस्था मर्यादीत, रामडोह ता. नेवासा | १००० | जायकवाडी जलाशय फुगवटा |
| ०८ | गेदावरी सहकारी पाणी पुरवठा संस्था मर्यादीत, दादेगाव, ता. शेवगाव | ८०० | जायकवाडी जलाशय फुगवटा |
| ०९ | जगदंबा सहकरी पाणीपुरवठा संस्था मर्यादीत, माळीवाडा ता. शेवगाव | ७०० | जायकवाडी जलाशय फुगवटा |
| १० | मंगळेश्वर सहकारी पाणी पुरवठा संस्था मर्यादीत, मंगळापूर ता. नेवासा | १००० | जायकवाडी जलाशय फुगवटा |
| ११ | मुळा सहकारी पाणी पुरवठा संस्था मर्यादीत, सौंदाळा ता. नेवासा | १००० | जायकवाडी जलाशय फुगवटा |
| १२ | जगदंबा सहकारी पाणीपुरवठा संस्था मर्यादीत, रांजणगाव नं.०१, ता. नेवासा | १००० | मुळा उजवा कालवा |
| १३ | अंबिका सहकारी पाणी पुरवठा संस्था मर्यादीत, रांजणगाव नं. ०२ ता. नेवासा | १००० | मुळा उजवा कालवा |
| १४ | श्री. हत्तेश्वर सहकारी पाणी पुरवठा संस्था मर्यादीत, हातगाव ता. शेवगाव | १००० | जायकवाडी उजवा कालवा |

### ४.९. समारोप :

अशा प्रकारे मारूतरावांचा सहकार क्षेत्रातील प्रवासाचे वर्णन होते. मारूतरावांनी राजकारणापेक्षा सहकार वाढविण्यावर व तो टिकविण्यावर भर दिला. आजही अनेक सहकारी संस्था उभ्या राहतात परंतू त्यांची काय अवस्था आहे हे आपण बघतच आहोत. सहकार संस्थांचे सर्वांत महत्वाचे उद्दिष्ट असते ते एकमेकांचे हितसंबंध जोपासणे आणि मारूतरावांनी या तत्वाचे मनापासून जतन केले आणि त्यामुळे त्यांना सहकारात यश मिळाले. त्यांचे समकालीन पद्मश्री विखे पाटील, कोल्हे पाटील, थोरात पाटील, राजळे पाटील, काळे पाटील, इत्यादींनी सहकार वाढविला आणि टिकविला. हि पिढीच सहकार टिकविणारी पिढी म्हणता येईल. कारण प्रत्येकांनी आपापल्या परिने आपापल्या भागात जमेल तेवढे सहकार क्षेत्र वाढविले व लोकहित जपले. म्हणूनच त्यांना सहकार टिकविण्यात यश मिळाले आहे असं म्हणता येईल. मारूतरावांनी सहकार क्षेत्र भरभराटीला आणले मात्र त्यांनी कधी राजकारणात जाण्यासाठी त्याचा फायदा उठवला नाही. केवळ शेतकरी व सर्वसामान्यांचे हित जोपासण्यासाठीच त्यांनी सहकार निर्मिला.

# संदर्भ सूची


१. चेंगुले, पठाण, ‘‘भारतीय सहकार चळवळ’’, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, पान क्रं. ३.

२. चेंगुले, पठाण, ‘‘भारतीय सहकार चळवळ’’, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, पान क्रं. ८

३. सुदामराव मते, ‘‘गतिमान नेतृत्वाची वाटचाल’’, ‘‘श्री. मारूतराव घुले पाटील ५१ सुवर्ण महोत्सव गुण दर्शन’’, प्रकाशन — यशवंतराव गडाख, १९८१ पान. क्रं. ८९

४. श्री. काकासाहेब शिंदे (जनरल मॅनेजर ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना, ज्ञानेश्वरनगर), मुलाखत — दि. १९/०६/२०१५

५. आर.एम.जगधने, ‘‘एक विश्वस्त’’, प्रकाशक— चंद्रशेखर घुले पाटील, ज्ञानेश्वरनगर, २००३, पान. क्रं. ५२.

६. श्री. ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखारा लि. ज्ञानेश्वरनगर कारखाना कारभाराची संक्षिप्त माहिती १९७० ते ७७, पान क्रं. ०७.

७. कारभारी गायके (प्रशासकीय अधिकारी, ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना, ज्ञानेश्वरनगर) — मुलाखत दि. २५/०६/२०१५.

८. १६ वा वार्षिक अहवाल, श्री. ज्ञा.सह.सा.का. ज्ञानेश्वरनगर १९८५—८६ पान क्रं १७

९. १७ वा वार्षिक अहवाल, श्री. ज्ञा.सह.सा.का. ज्ञानेश्वरनगर १९८६—८७ पान क्रं १२.

१०. १९ वा वार्षिक अहवाल, श्री. ज्ञा.सह.सा.का.ज्ञानेश्वरनगर १९८८—८९ पान. क्रं. १३.

११. २० वा वार्षिक अहवाल, श्री. ज्ञा.सह.सा.का. ज्ञानेश्वरनगर १९८९—९० पान क्रं. १२.

१२.२१ वा वार्षिक अहवाल, श्री. ज्ञा.सह.सा.का. ज्ञानेश्वरनगर १९९०—९१ पान क्रं. १३.

१३.२२ वा वार्षिक अहवाल, श्री. ज्ञा.सह.सा.का. ज्ञानेश्वरनगर १९९१—९२ पान क्रं. १८.

१४.३१ वा वार्षिक अहवाल, श्री. ज्ञा.सह.सा.का. ज्ञानेश्वरनगर २००१—०२ पान क्रं. ११.

१५. यशवंत गडाख पाटील, ''सहकारातील किमयागार हरपला'', मनामनातील मारूतराव घुले पाटील, संपादक — भीमराव पाटील, पृथ्वीराज प्रकाशन, पुणे, पान क्रं. ३९

१६. सुधाकर शेरकर, ''मारूतराव पाटील : महामानव'', दै. लोकमत १७—०७—२००२.

१७. डॉ. भवान महाजन, ''सहकार पंढरीचा वारकरी'', एक विश्वस्त — मारूतराव घुले पाटील जीवनदर्शन, संपादक — भास्कर शंकरराव जोंधळे, प्रकाशक— चंद्रशेखर घुले पाटील, महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, शिवाजीनगर, पुणे, २००३. पान क्रं. ४९

१८. नवनीतभाई बार्शीकर, ''ज्ञानेश्वर महाराजांच्या अथांग लोककल्याणाचे सार जाणणारा मर्मज्ञ'' श्री. मारूतराव घुले पाटील ५१ सुवर्ण महोत्सव गुणदर्शन, प्रकाशक — यशवंत गडाख पाटील. पान क्रं. ४२.

१९. काकासाहेब शिंदे, ''सहकारी विचारांची गंगा'', श्री. मारूतराव घुले पाटील ५१ सुवर्ण महोत्सव गुणदर्शन, प्रकाशक — यशवंत गडाख पाटील, पान क्रं. ४४.

२०. बी. बी. पवार, ''सहकाराचा नंदादीप'', श्री. मारूतराव घुले पाटील ५१ सुवर्ण महोत्सव गुणदर्शन, प्रकाशक — यशवंत गडाख पाटील, पान क्रं. ६९

२१. चंद्रशेखर घुले पाटील (चेअरमन ज्ञा.सह.सा.का) — मुलाखत दि. ०८/९/२०१५.

२२. श्री. एम.टी. लहारे, ''लोकमान्य मारूतरावजी घुले पाटील'', एक विश्वस्त, संपादक – भास्कर शंकरराव जोंधळे, प्रकाशक – चंद्रशेखर घुले, महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, शिवाजीनगर, पान क्रं. ७७.

२३. बाळासाहेब तनपुरे, '' दीपस्तंभ'', गौरव विशेषांक साप्ताहीक – नेवासा टाईम्स, १५/०९/२०००.

२४. भीमराव पाटील, ''खंदा सहकार कार्यकर्ता'', दैनिक सामना, १०/०७/२००२

२५. बाळासाहेब भाऊसाहेब उगले, ''सहकार क्षेत्रातील अमोल ठेवा'', श्री. मारूतराव घुले पाटील ५१ सुवर्ण महोत्सव गुणदर्शन, प्रकाशक – यशवंत गडाख पाटील, पान क्रं. ७७.

२६. लक्ष्मण बाबा नवथर – मुलाखत दि. १२/०७/२०१५.

२७. लोखंडे भाऊसाहेब – मुलाखत दि. १९/११/२०१५.

२८. गुलाबराव घुले पाटील – मुलाखत दि. २५/०६/२०१५.

२९. नरूभाऊ लिमये, ''एक लोभस व्यक्तिमत्व–श्री मारूतराव घुले पाटील'', श्री. मारूतराव घुले पाटील ५१ सुवर्ण महोत्सव गुणदर्शन, प्रकाशक – यशवंत गडाख पाटील, पान क्रं. ४.

३०. भीमराव पाटील, ''भूपुत्राची जीवन–गाथा'' श्री. मारूतराव घुले पाटील ५१ सुवर्ण महोत्सव गुणदर्शन, प्रकाशक – यशवंत गडाख पाटील, पान क्रं. ३८, ४०.

३१. शंकर मोहन मतकर (कार्यालयीन कर्मचारी श्री. दत्त पाणी पुरवठा सहकारी संस्था मर्या. दहिगाव) – मुलाखत दि. २१/०९/२०१५

३२. श्री. निवृत्ती गणपतराव मोटे, ''सहकारातील कुशल मार्गदर्शक'', एक विश्वस्त, संपादक – भास्कर शंकरराव जोंधळे, प्रकाशक – चंद्रशेखर घुले, महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, शिवाजीनगर, पान क्रं. ५३.

३३. डॉ. गो. स. कामत, ''महाराष्ट्रातील सहकारी साखर उद्योग – गति व संभवशक्ती'', श्री. मारूतराव घुले पाटील ५१ सुवर्ण महोत्सव गुणदर्शण, प्रकाशक – यशवंत गडाख पाटील. पान क्रं. ९५, ९६.

# प्रकरण ५ वे

# शैक्षणिक क्षेत्रातील योगदान

## ५.१. प्रास्ताविक :

अहमदनगर जिल्हा म्हणजे संत परंपरेने भरलेला अथांग सागर. नेवासा येथे श्री. संत ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरी सांगितली आणि सचिदानंद बाबा यांनी ती घटीत केली. अशा भागाचे नेतृत्व करण्याची संधी मारूतरावांना मिळाली. बालपणापासूनच मारूतरावांना शिक्षणाची आणि वाचनाची आवड असल्याने ते एक बुध्द्‌ीवादी व्यक्तिमत्व म्हणून फळास आले. त्यांनी आपल्या कार्यकतृत्वातून जनसामान्याची मने जिंकून घेतली. शालेय जीवनात मारूतरावांनी आपल्या कला—कौशल्याच्या जोरावर स्वत:ची एक आगळी छाप पाडली म्हणून तर ते सर्वांचे आवडते विश्वासराव ठरले. शिक्षणातील अडाणीपणामुळे समाज कोणत्या स्तरावरचे जीवन जगू शकतो याची त्यांना चांगलीच अनुभूती आली. त्यांचे शिक्षण इंटर आर्ट पर्यंतचे मात्र त्यावेळी या शिक्षणाला चांगल्यापैकी महत्व असायचे. शालेय जिवनात मारूतरावांनी नेतृत्व आणि वकृत्व यांसारख्या महत्वाच्या कलांवर कमांड बसविलेली होती. साने गुरूजींचे साहीत्य हे त्यांना अतिप्रिय. त्यांच्याच पुस्तकातील धडे गिरवित सामाजिक, राजकीय आणि शैक्षणिक क्षेत्राचा एक आदर्श वस्तूपाठ जिल्ह्याला घालून दिला.

## ५.२. शैक्षणिक पार्श्वभूमी :

पढेगावचे लाडके विश्वासराव बनकर १९४९ साली दत्तक म्हणून दहिगाव—ने येथील घुले पाटील घराण्यात आले आणि मारूतराव घुले पाटील म्हणून ओळखले जाऊ लागले. दहिगाव—ने येथे स्थायिक झाल्यानंतर मारूतरावांनी गावाची पाहणी केली. गावातील बहुतांश तरूण पिढी व्यसनाच्या आहारी गेलेली त्यांच्या लक्षात आलं. त्यांनी अशा भरकटलेल्या समाजाला योग्य मार्गावर आनण्याचा दृढनिश्चय केला आणि मार्गाला लागले. गावात

गांधीजींचे ग्रामस्वच्छतेचे प्रयोग सुरू केले, दर शुक्रवारी पहाटे गावात श्रमदान सुरू केले तसेच शरीय सौष्ठव हा तरूणांचा खरा पैलू असतो हे मान्य करून गावातील तरूण पिढीसाठी गावातच व्यायामशाळा सुरू केली. मात्र या सर्वांत कुठेतरी काहीतरी राहीलयं याची चुनचून त्यांना जाणवत होती. समाजात क्रांती आणि उन्नती घडवून आणायची असेल तर फुले दांपत्य आणि डॉ. आंबेडकरांनी दाखवून दिलेला शिक्षणाचा मार्ग हा त्यावरील सर्वोत्तम उपाय आहे हे मारूतरावांनी ओळखले आणि समाजात शैक्षणिक क्रांती घडवून आणण्याची शपथ घेतली. इ.स. १९५९ पर्यंत दहिगाव—ने येथे फक्त १ली ते ७ वी पर्यंतची मराठी शाळा होती. जिची स्थापना १९०८ साली झाली होती. त्यापुढील शिक्षणाची काहीच सोय नाही. त्यामुळे गावात सर्वाधिक शिक्षणाचे प्रमाण इयत्ता ७ वी वर्ग असे झाले होते. या वर्गाच्या पुढे शिक्षण घेण्याची इच्छा असूनही त्यापासून वंचित रहावं लागत होतं. कारण पुढील शिक्षण घ्यायचं झालं तर त्यासाठी तालुका व जिल्ह्याच्या ठिकाणी जावं लागत असे. यासाठी मोठा खर्च होत असे, हा खर्च गरिब कुटुंबियांना पेलत नसे त्यामुळे गावात सर्वाधिक सुशिक्षीत हे ७वी पास होते. नकळत एखाद—दुसरा की ज्याची परिस्थिती बेताची आहे असेच पुढील शिक्षणासाठी बाहेरगावी जाण्याचे धाडस करत. मग याने फक्त ठराविक समाजच पुढारेल की ज्याकडे पत आणि प्रतिष्ठा आहे. प्रत्येक घटकाला शिक्षण मिळावे आणि ते आपल्या पायावर उभे रहावेत यासाठी मारूतरावांनी त्यांना उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्याचा मानस बाळगला आणि दहिगाव—ने येथे 'जनता शिक्षण प्रसारक मडंळा'ची स्थापना केली.

### ५.३. जनता शिक्षण प्रसारक मंडळ : स्थापना व वाटचाल :

'खरा भारत बघायचा असेल तर, खेडयाकडे चला' हे महात्मा गांधीजींचे शब्द् मारूतरावांच्या मनामध्ये खोलवर रूजलेले होते. त्यांना एक प्रश्न कधीच शांत बसू देत नसत. तो म्हणजे, ग्रामीण समाजावर ठाकलेले सर्वांगिण संकट. यातून बाहेर पडायचे असेल आणि त्यांना प्रगती पथावर घेवून जायचे असेल

तर एकच पर्याय आहे, तो म्हणजे शिक्षण! गरीब कष्टकऱ्यांची पोरं शिकावीत त्यांनी शिक्षण घेवून विविध क्षेत्रात आपल्या कुटुंबाचे व भागाचे नाव प्रगतीपथावर न्यावे असे मारूतरावांना कायमच वाटत म्हणून गावात आता इयत्ता ७ वी वर्गाच्या पुढे शिक्षण उपलब्ध करून दिलेच पाहीजे हा मानस ठेवून १९५९ साली जनता शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना केली. आणि शैक्षणिक क्रांतीला सुरूवात केली. या मंडळाच्या अंतर्गत दहिगाव—ने येथे परिसरातील पहिले 'नवजीवन माध्यमिक विद्यालय' स्थापन केले. विद्यार्थ्यांनी फक्त शिक्षणच नाही तर शिक्षण घेता घेता त्यांच्या व्यक्तिमत्व आणि सामाजिक बांधीलकीची जडणघडण व्हावी या उद्‌दशाने मारूतरावांनी शेवगाव व नेवासा तालुक्यात शिक्षणाचे महत्व पटवून देत शिक्षण प्रसाराला सुरूवात केली. दर शुक्रवारी पहाटे गावात श्रमदान होतच होते त्यामुळे गावातील लोकांना श्रमदानाचे महत्व बऱ्यापैकी समजले होते. यात सातत्य रहावे म्हणून मारूतरावांनी गावकऱ्यांना सोबत घेवून श्रमदानातून नवजीवन विद्यालयाची इमारत उभी केली. एवढेच काय स्वत: मारूतरावांनी श्रमदानात सहभाग घेतला होता. गावातील सरकारी हॉस्पिटलची जुनी इमारतही श्रमदानातूनच उभारली गेली आहे. विद्यालय सुरू झाले आणि भागातील गरिब कष्टकऱ्यांची मुले शिकू लागली. त्यांना फक्त माध्यमिक स्तरावरील शिक्षण देवून भागणार तर त्यांना उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून दिली पाहीजे ही उणीव मारूतरावांना जाणवू लागली. महात्मा फुले अडाणीपणाचे मार्मिकपणे विवेचन करताना सांगतात की, ''**विद्येविना मती गेली, मतीविना गति गेली, गति विना निती गेली, नितीविना वित गेले, वित्तविना शुद्र खचले, एवढे अनर्थ एका अविद्येने केले**'' तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर शिक्षणाचे गुणगाण गाताना म्हणतात की, ''**शिक्षण हे वाघीणीचे दुध आहे, ते पिल्यावर माणूस गुरगुरल्याशिवाय राहणार नाही.**'' याहीपुढे जावून ते सांगतात की, केवळ शिकू नका तर संघटीत होवून आपल्या न्याय आणि हक्कासाठी लढा द्या. तुम्हाला तुमचे हक्क मिळवायचे असेल तर संघर्ष करावाच लागेल परंतू त्यासाठी तुम्ही आधि सुशिक्षित व्हा. याच विचारांची शिदोरी मारूतराव अहमदनगर जिल्ह्यात वाटत होते. त्यांनी

स्थापन केलेल्या शिक्षण संस्थेचे ब्रिदवाक्यच त्यांनी **'बहुजन हिताय, बहुजन सुखाय'** हे ठेवले.

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री मा. यशवंतरावजी चव्हाण यांच्या प्रेरणेने आणि श्रीरामपूर येथील दानशूर आणि ज्यांना शिक्षणाची अप्रतिम अशी आवड होती असे शिक्षण प्रेमी श्रीमान चंद्रभानशेठ डाकले यांच्या कडून ज्ञानेश्वरांच्या पवित्र भूमीत महाविद्यालयाच्या रूपाने मंदिर उभारण्याच्या कामात एक लाख रूपयांची देणगी मिळवून या कार्यास सुरूवात केली. इ.स. १९६४ मध्ये नेवासे येथे ज्ञानेश्वर महाविद्यालय सुरू झाले. त्वरीत महाविद्यालयाची वास्तू उभारण्यास सुरूवात झाली. बांधकाम पूर्ण होवून १९७५ साली वर्गही सुरू झाले आणि एक सामान्य कुटुंबातील युवकाचे उच्च महाविद्यालयात शिक्षण घेण्याचे स्वप्न साकारले. ग्रामीण भागातील युवक या महाविद्यालयातून यश संपादन करून जाताना मारूतराव व त्यांच्या टिमचे आवर्जून आभार मानत असे. कारण मारूतरावांनी शिक्षण क्रांतीचा हा ध्यास ठेवला नसता तर आम्हाला आजही त्याच खाईत खितपत पडावे लागले असते जेथे प्रस्थापितांची जुलुमशाही मांड ठोकूण बसलेली होती आणि याच जुलुमशाहीला सलाम करत धन्यता मानावी लागली असती. नेवासा येथील महाविद्यालयाप्रमाणेच मारूतरावांनी शेवगाव येथील अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे, न्यू आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज'च्या उभारणीत मोलाचे सहकार्य केले आहे. ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना आणि जिल्हा सहकारी बॅकेच्या माध्यमातून या महाविद्यालयाच्या उभारणीसाठी एकूण पन्नास हजार रूपयांची आर्थिक मदत मिळवून दिली. शाळा—महाविद्यालये ही ज्ञानदेवतेची मंदीर असते त्यामुळे भविष्यातील एक सुज्ञ पिढी या ज्ञानमंदीरांतून घडत असते तेव्हा अशा सदकार्यासाठी आमचा पैसा उपयोगी पडतो हे बघून आम्हास खुप बरे वाटते ही मारूतरावांची मयाळू शैली सर्वांचे मन जिंकून घेत असे.

या भागातील कितीतरी मुलं हुशार व प्रयत्नवादी होती मात्र आर्थिक परिस्थिती हालाखीची असल्याने त्यांना पुढील शिक्षण घेणे शक्य नसायचे हे

ज्यावेळी मारूतरावांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी अशा मुलांची यादी तयार केली. यांत ज्या विद्यार्थ्यांची गुणवत्ता चांगली आहे अशांना पुढील शिक्षणासाठी गावकरी, ज्वार बॅक यांच्या मदतीने तर कधी स्वखर्चाने पाठवत. त्याचबरोबर त्यांची होस्टेल व जेवणाची सोयही केली जायची. हा त्यांच्यातील निस्वार्थीपणा अनेक विद्यार्थ्यांचे आयुष्य बदलण्यास कारणीभूत ठरला. गावात ब्रिटिशकालीन विद्यार्थ्यांसाठी एक वसतीगृह होते. त्याची अवस्था खूपच वाईट झाली होती. त्यामध्ये आवश्यक सुधारणा करून मारूतरावांनी ती भागातील गरिब विद्यार्थ्यांसाठी राखीव ठेवून अन्नछत्र योजना सुरू केली. जिल्ह्यात शैक्षणिक क्रांती घडवून आणण्यासाठी मारूतरावांनी केलेले कार्य अतुलनात्मक आहे. ग्रामीण युवकांना विविध क्षेत्रात संधी उपलब्ध करून देण्यासाठी मारूतरावांनी आणखी एक शैक्षणिक संस्था उभारली.

### ५.४. मारूतराव घुले पाटील शिक्षण संस्थेची स्थापना व वाटचाल :

जनता शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना करून अनेक विद्यालये स्थापन केली. आपल्या भागातील व तालुक्यातील विद्यार्थ्यांना भागातील विद्यार्थ्यांना पुढील उच्च शिक्षण जवळच घेता यावे म्हणून मारूतरावांनी ०७ डिसेंबर १९७९ रोजी '**मारूतराव घुले पाटील शिक्षण संस्थेची** स्थापना केली. या शैक्षणिक संस्थेने अनेक माध्यमिक, ज्युनियर आणि सिनीयर महाविद्यालयांची स्थापना केली. त्यांचा आढावा पुढील प्रमाणे :

### १) जिजामाता माध्यमिक तांत्रिक व उच्च माध्यमिक विद्यालय :

तांत्रिक शिक्षण घेवून विद्यार्थ्यांना स्वत:चा व्यवसाय उभारता यावा हा उद्देश डोळयासमोर ठेवून १९८० साली या विद्यालयाची स्थापना झाली. तांत्रिक घटकाशी निगडीत कोर्सेस शिकवून विद्यार्थ्यांना स्वयंरोजगाराठी मार्गदर्शन केले जाते. इथे एकूण वर्ग ३४, सेवकांची संख्या ७२.

**२) जिजामाता उच्च माध्यमिक विद्यालय :**

कारखाना कामगारांच्या मुलांना व परिसरातील सर्वच थरातील मुलांना उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी घुले पाटीलांनी १९८६ मध्ये कारखाना परिसरात अर्थात ज्ञानेश्वरनगर येथे या विद्यालयाची स्थापना केली. आणि कारखाना कामगारांना आपल्या मुलांच्या शैक्षणिक भवितव्याची काळजी करण्याची गरज ठेवली नाही कारण मारूतरावांच्या कृपेने अगदी दारातूनच शिक्षणरूपी गंगा वाहू लागल्याने कामगारांना आपल्या मुलांना बाहेरगावी पाठविण्याची गरज राहीली नाही. या उच्च माध्यमिक विद्यालयाचे एकूण १२ वर्ग आहे.

**३) जिजामाता कला व शास्त्र महाविद्यालय :**

प्रत्येक सुज्ञ पिढी ही एका विशिष्ठ काळात घडत असते आणि हा विशिष्ठ काळ असतो तो महाविद्यालयीन काळ त्यामुळे फक्त माध्यमिक शिक्षण देवून चालणार नाही तर विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा यासाठी १९९२ साली जिजामाता कला व शास्त्र महाविद्यालयाची स्थापना केली. विद्यापीठाचे कार्यक्रम याठीकाणी राबविण्यास सुरूवात केली. कला व शास्त्र विभागाचे ज्ञान तर इथे दिलेच जाते मात्र त्यासोबत एन.एस.एस, एन.सी.सी, कमवा व शिका यांसारक्षे उपक्रम आणि एमपीएसी, युपीएसी, बीएड या क्षेत्राशी संबधीत माहीती व ज्ञानही दिले जाते. मुलांना शिक्षणाबरोबर आपल्या कला—गुणांना वाव मिळावा म्हणून विविध सांस्कृतिक कार्यक्रम राबविले जातात.

**४) गुरूदत्त माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय :**

अहमदनगर जिल्हा वारकरी सांप्रदायाचे भूषण श्री क्षेत्र देवगड हे नेवासे तालुक्यातील श्री गुरूदत्त आणि सदगुरू किसनगिरी बाबांच्या वास्तव्याने पुनीत झालेले क्षेत्र असून असंख्य लोकांचे ते श्रध्द्यास्थान आहे. समस्त राज्यभरातून भाविक त्याठिकाणी दर्शनासाठी येत असतात. अशा पावनभूमीत एखादे विद्यालय असावे म्हणून मारूतराव घुले पाटील शिक्षण संस्थेने देवगड

याठिकाणी गुरूदत्त माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाची स्थापना केली. या ज्ञानालयाची एकूण ८ वर्ग आहेत. या महाविद्यालयाचे एक वेगळे वैशिष्टय म्हणजे या महाविद्यालयातील विद्यार्थी हे शाळेत येताना व जाताना तसेच रस्त्यावरून चालताना व घरी जातानेही रांगेतच चालतात. हे बघून दर्शनासाठी आलेले लोक मोहून जातात. विद्यार्थ्यांना स्वयंशिस्तीचे धडे देण्यात हे विद्यालय यशस्वी झाले आहे असे म्हणता येईल.

**५) जिजामाता पब्लिक स्कूल :**

ग्रामीण भागात शिक्षण घेताना विद्यार्थ्यांना सर्वात जास्त भिती वाटते ती इंग्रजी या विषयाची. इंग्रजी ही त्यांच्यापुढील सर्वात मोठी समस्या आहे. ही भिती लहानवायतच गेली तर किती उत्तम! म्हणून २००३ साली भेंडा बु! येथे इंग्रजी माध्यमाचे जिजामाता पब्लिक स्कूल सुरू मारूतरावांना खऱ्या अर्थाने श्रध्द्ांजली दिल्याचे भासते.

**६) जिजामाता औद्योगिक प्रशिक्षण केंद्र :**

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतात औद्योगिक क्रांतीचे वारे वाहू लागले. कालांतराने ते महाराष्ट्रात येवून पोहचले आणि महाराष्ट्रात औद्यागिक क्षेत्राशी निगडीत प्रशिक्षण देण्यासाठी संस्था असाव्यात असे मा. यशवंतराव चव्हान यांना वाटू लागले म्हणून त्यांनी १९८० च्या दशकात जिल्हास्तरावर औद्यागिक प्रशिक्षण केंद्रे सुरू केली. मात्र ग्रामीण भागातील होतकरूंना त्याठीकाणी जाणे परवडणारे नव्हते त्यामुळे इच्छा असूनही ते औद्योगिक शिक्षणाला मुकत होते. हे जेंव्हा मारूतरावांच्या लक्षात आले तेव्हा त्यांनी अशी केंद्रे तालुका स्तरावर उभारता यावीत यासाठी हट्ट धरला आणि १९८४ साली ज्ञानेश्वरनगर, भेंडा बु! येथे तालुका स्तरावर पहिले जिजामाता औद्योगिक प्रशिक्षण केंद्र उभारले. टर्नर, फिटर यांसारखी महत्वाची ट्रेड उपलब्ध करून दिली. आज या औद्योगिक प्रशिक्षण केंद्रात फिटर, इलेक्ट्रीशियन, इलेक्ट्रानिक्स

मेकॅनिक, टर्नर, वेल्डर, वायरमन, टु व्हीलर मेकॅनिक यांसारखे महत्वाचे कोर्सेस सुरू आहेत.

मारूतराव घुले पाटील यांनी उभारलेल्या शैक्षणिक संस्थांची माहीती पुढील प्रमाणे : —

**७) जनता शिक्षण प्रसारक मंडळाची विद्यालये :**

**तक्ता क्रं. ५.१ ज.शि.प्र.मंडळाची विद्यालये**

| अ.क्र | विद्यालय / महाविद्यालयाचे नाव | ठिकाण |
|---|---|---|
| ०१. | लोकनेते मारूतराव घुले पाटील महाविद्यालय | दहिगाव—ने, ता. शेवगाव |
| ०२. | भातकुडगाव हायस्कूल | भातकुडगाव, ता. शेवगाव |
| ०३. | नवजीवन माध्य. व उच्च माध्य. विद्यालय | दहिगाव—ने, ता. शेवगाव |
| ०४. | जिजामाता नर्सिंग स्कूल | दहिगाव—ने, ता. शेवगाव |
| ०५. | मुंगादेवी माध्य. व उच्च माध्य. विद्यालय | मुंगी, ता. शेवगाव |
| ०६. | श्रीराम माध्यमिक विद्यालय | देवगाव, ता. नेवासा |
| ०७. | लाडजळगाव हायस्कूल | लाडजळगाव, ता. शेवगाव |
| ०८. | श्री. संत वामनभाऊ विद्यालय | वडुले, ता. शेवगाव |
| ०९. | रामेश्वरदास माध्य. विद्यालय | हातगाव, ता. शेवगाव |
| १०. | गोदावरी व्हॅली पब्लिक स्कूल | दहिगाव—ने, ता. शेवगाव |
| ११. | मारूतराव घुले पाटील महाविद्यालय | एम.आय.डी.सी, नागापूर, अहमदनगर. |
| १२. | काकासाहेब म्हस्के माध्य. विद्यालय | एम.आय.डी.सी, नागापूर, अहमदनगर |
| १३. | काकासाहेब म्हस्के प्राथमिक विद्यालय | अहमदनगर |
| १४. | पार्वतीबाई म्हस्के प्राथमिक विद्यालय | पाईपलाईन रोड, अहमदनगर |
| १५. | गजानन माध्यमिक व उच्च माध्य. विद्यालय | आव्हाणे बु!, ता. शेवगाव |
| १६. | नवनाथ माध्यमिक विद्यालय | भायगाव |
| १७ | मारूतराव घुले पाटील माध्यमिक विद्यालय | विजयपूर |

(जनता शि.प्र. मंडळ संस्था कार्यालयीन माहीतीवरून)

## ८) मारूतराव घुले पाटील शिक्षण संस्थेची विद्यालये :

### तक्ता क्रं. ५.२ (मा.घु. शि. सं. संचलित विद्यालये/महाविद्यालये)

| अ.क्र | विद्यालय / महाविद्यालयाचे नाव | ठिकाण |
|---|---|---|
| ०१. | जिजामाता माध्यमिक तांत्रिक व उच्च माध्यमिक विद्यालय | ज्ञानेश्वर नगर, ता.नेवासा |
| ०२. | जिजामाता उच्च माध्यमिक विद्यालय | ज्ञानेश्वर नगर, ता.नेवासा |
| ०३. | जिजामाता शास्त्र व कला महाविद्यालय | ज्ञानेश्वर नगर, ता.नेवासा |
| ०४. | जिजामाता औद्यागिक प्रशिक्षण केंद्र | ज्ञानेश्वर नगर, ता.नेवासा |
| ०५. | ज्ञानेश्वर विज्ञान केंद्र संचलित यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ.. | ज्ञानेश्वर नगर, ता.नेवासा |
| ०६. | जिजामाता कृषी विद्यालय | ज्ञानेश्वर नगर, ता.नेवासा |
| ०७. | जिजामाता पब्लिक स्कूल | ज्ञानेश्वर नगर, ता.नेवासा |
| ०८. | गुरूदत्त माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय | देवगड, ता. नेवासा |
| ०९. | सुदामराव मते पाटील माध्यमिक विद्यालय | गोगलगाव, ता. नेवासा |
| १०. | दहेश्वर माध्यमिक विद्यालय | दहिफळता. शेवगाव |
| ११. | जिजामाता माध्यमिक तांत्रिक व उच्च माध्यमिक विद्यालय | खानापूर ता. शेवगाव |
| १२. | भगवानबाबा माध्यमिक विद्यालय | थाटे वडगाव ता.शेवगाव |
| १३. | जिजामाता माध्यमिक विद्यालय | देवटाकळी ता. शेवगाव |
| १४. | पांडूरंग माध्यमिक विद्यालय | वरूर ता. शेवगाव |
| १५. | शहालीबाबा माध्यमिक विद्यालय | पिंप्री शहाली ता. नेवासा |

(मा.घु.पा.शि.संस्था कार्यालयीन माहीती)

## ५.५. समारोप :

ग्रामीण विद्यार्थ्यांची शैक्षणिक गरज पूर्ण करता यावी म्हणून मारूतरावांनी वरिल प्रमाणे शैक्षणिक क्रांती घडवून आणली. आणि ग्रामीण विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रात संधी उपलब्ध करून दिली. शैक्षणिक संस्था उभ्या करून मारूतरावांनी बक्कळ पैसाही जमवला असता मात्र त्यांनी तसं केलं नाही. किंवा राजकारणात संधी मिळविण्यासाठी शैक्षणिक संस्था उभ्या केल्या असही नाही. मारूतराव स्वत: ग्रामीण भागातील असल्याने ग्रामीण विद्यार्थ्यांचे प्रश्न त्यांना चांगलेच माहिती होते. ग्रामीण विद्यार्थी कल्याण हा एकमेव हेतू डोळयासमोर ठेवून मारूतरावांनी शिक्षण संस्था उभारल्या.

## संदर्भ सूची


१. भीमराव पाटील, ''भूपुत्राची जीवनगाथा'', श्री. मारूतराव घुले पाटील ५१ सुवर्ण महोत्सव गुणदर्शन, प्रकाशक — यशवंत गडाख पाटील, पान क्रं. ३३

२. हेमराज प्रेमराज बोरा, ''महान कर्मयोगी'', श्री. मारूतराव घुले पाटील ५१ सुवर्ण महोत्सव गुणदर्शन, प्रकाशक — यशवंत गडाख पाटील, पान क्रं. ४१

३. प्राचार्य कारभारी नजन — मुलाखत दि. ११/०६/२०१५

४. आर. के. आगळे, ''आधारवड'', श्री. मारूतराव घुले पाटील ५१ सुवर्ण महोत्सव गुणदर्शन, प्रकाशक — यशवंत गडाख पाटील, पान क्रं. ४५.

५. रा.गो. ढुमणे गुरूजी, ''आवडता विद्यार्थी'', श्री. मारूतराव घुले पाटील ५१ सुवर्ण महोत्सव गुणदर्शन, प्रकाशक — यशवंत गडाख पाटील, पान क्रं. ५४

६. भय्यासाहेब गुलाबराव देशमुख, ''शैक्षणिक प्रगतीचा प्रणेता'' श्री. मारूतराव घुले पाटील ५१ सुवर्ण महोत्सव गुणदर्शन, प्रकाशक — यशवंत गडाख पाटील, पान क्रं. ५७

७. एल. बी. शेख, ''विधायक शैक्षणिक विचार'', श्री. मारूतराव घुले पाटील ५१ सुवर्ण महात्सव गुणदर्शन, प्रकाशक — यशवंत गडाख पाटील, पान क्रं. ६०.

८. भीमराव पाटील, ''भूपुत्राची जीवनगाथा'', श्री. मारूतराव घुले पाटील ५१ सुवर्ण महोत्सव गुणदर्शन, प्रकाशक — यशवंत गडाख पाटील, पान क्रं. ३५.

९. भीमराव पाटील — ''दिपस्तंभ'' गौरव विशेषांक साप्ताहिक — नेवासा टाईम्स, राजहंस प्रकाशन २००१ पान क्रं. ६९.

१०. पांडूरंग भागवत जोशी, ''शैक्षणिक प्रगतीचा वाटा'', श्री. मारूतराव घुले पाटील ५१ सुवर्ण महोत्सव गुणदर्शन, प्रकाशक — यशवंत गडाख पाटील, पान क्रं. ५९.

११. दैनिक सार्वमत — याकुब शेख, ०८ जुलै २००२, पान क्रं. ०५
१२. गुलाबराव घुले — मुलाखत दि. ०३/०६/२०१५
१३. दैनिक गावकरी — दिनकरराव टेकणे, १७/०७/२००२.
१४. शाम भलके, ''संस्थाहित सांभाळणारे घुले पाटील'', मनामनातील मारूतराव घुले पाटील, संपादक — भीमराव पाटील, पृथ्वीराज प्रकाशन, पुणे, पान क्रं. ८६.
१५. श्री. के. वाय. बनकर पाटील, ''सत्संस्कासंपन्न सर्वस्नेही'', एक विश्वस्त, संपादक — भास्कर शंकरराव जोंधळे, प्रकाशक — चंद्रशेखर घुले पाटील, महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, शिवाजीनगर, पान क्रं. ६३.
१६. गुलाबराव घुले पाटील — मुलाखत दि. २५/०६/२०१५
१७. रा.गो. ढुमणे गुरूजी, ''आवडता विद्यार्थी'', श्री. मारूतराव घुले पाटील ५१ सुवर्ण महोत्सव गुणदर्शन, प्रकाशक — यशवंत गडाख पाटील, पान क्रं ५५.
१८. भय्यासाहेब गुलाबराव देशमुख, ''शैक्षणिक प्रगतीचा प्रणेता'' श्री. मारूतराव घुले पाटील ५१ सुवर्ण महोत्सव गुणदर्शन, प्रकाशक — यशवंत गडाख पाटील, पान क्रं. ५८.
१९. श्री. संभाजी काळे —मुलाखत दि. १९/०९/२०१५
२०. बाबासाहेब नरवडे, ''आमची अस्मिता'', श्री. मारूतराव घुले पाटील ५१ सुवर्ण महोत्सव गुणदर्शन, प्रकाशक — यशवंत गडाख पाटील, पान क्रं ४९.
२१. पंडितराव मुळे, ''जसा विचार तसा आचार'', श्री. मारूतराव घुले पाटील ५१ सुवर्ण महोत्सव गुणदर्शन, प्रकाशक — यशवंत गडाख पाटील, पान क्रं ७३.
२२. मारूतराव घुले पाटील, ''मंतरलेले दिवस'' — दैनिक लोकसत्ता वर्धापनदिन विशेषांक ०१/०५/२००१.

२३. रा. गा. ढुमणे गुरूजी, ''आवडता विद्यार्थी'', मनामनातील मारूतराव घुले पाटील, संपादक – भीमराव पाटील, पृथ्वीराज प्रकाशन, पुणे, पान क्रं. २९.

२४. श्री. शेख सर, ''अनेक अंगांनी बहरणारे नेतृत्व'' एक विश्वस्त, संपादक – भास्कर शंकरराव जोंधळे, प्रकाशक – चंद्रशेखर घुले, महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, शिवाजीनगर, पान क्रं. ८५.

२६) जिजामाता औद्योगिक प्रशिक्षण केंद्र माहीती पुस्तिका २००७–०८.

२७) मारूतराव घुले पाटील शिक्षण संस्था भेंडा, संक्षिप्त माहीती पुस्तिका २००१–०२ व २०१२–१३.

# प्रकरण ६ वे

# निष्कर्ष आणि फलनिष्पत्ती

## ६.१. प्रास्ताविक :

महाराष्ट्र म्हणजे भारतातील अव्वल दर्जाचे राज्य समजले जाते. यासाठी अनेकांनी आपले श्रम ओतले. यामध्ये एक महत्वाचे व्यक्तिमत्व म्हणजे महाराष्ट्राचे भाग्यविधाते कै. यशवंतराव चव्हाण होय. चव्हाण साहेबांनी महाराष्ट्राची आर्थिक, सामाजिक, राजकीय तसेच सांस्कृतिक जडणघडण करत असतान अनेक हिरे निवडले व घडविले यामध्ये मारूतराव घुले पाटील हे अग्रस्थानी होते. त्यांच्या सर्वांगिन कार्यामुळे अहमदनगर जिल्ह्यातील माळरान हिरव्या सोन्याने मढले आहे.

शेवगाव–नेवासा तालुका माळरानावर बसलेला, जमीन आहे पण पाणी, साधने यांसारख्या एक–ना–अनेक कारनांनी तीही पडीक पडलेली. मारूतरावांनी शेतकऱ्यांची अडचण ओळखली आणि त्यादृष्टिने प्रयत्न केले व त्यांच्या या प्रयत्नांना नक्कीच यश मिळालेले दिसून येते. मुळा धरणाचे पाणी या भागात आणून या भागाचे नंदनवन केले. जायकवाडी सारखे मोठे धरण उभारणीत मध्यस्ती केली. धरणग्रस्तांचे व शेतकरी बांधवांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी श्री. ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना उभारला. कारखाना उभारून मारूतरावांनी शेतकरी बांधवांना अव्वल दर्जा प्राप्तीचे ऊसाचे पिक घेण्यासाठी व त्यांच्या आर्थिक घटकांत प्रगती घडवून आणण्यासाठी प्रयत्न केले. तसेच कर्जासाठी हावसलेला शेतकरी आणि यांना लुटण्यासाठी बसलेला सावकार यांचा चंगळवाद माजलेला असताने शेतकऱ्यांना या बंदीवासातून सोडविण्यासाठी विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी सारख्या काही सोसायटया उभारून शेतकऱ्यांना कमी व्याजाने कर्ज वाटले. १९५४ साली दहिगाव–ने येथे विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी स्थापन करून सहकाराला सुरूवात केली आणि या क्षेत्रात उंचावर झेप घेतली. या सोसायटीमार्फत गरजू शेतकऱ्यांना

कमी व्याजदरात कर्ज देवू केले यामुळे सावकारशाहीला आपोआप विरोध झाला आणि शेतकरी वर्गाची कर्जासाठी होणारी पिळवणूक थांबली. त्याच बरोबर धान्याबाबतीतही सावकार लुट करत असे. धान्य देताना सपाट माप मात्र घेताना धान्य मापातून सांडेपर्यंत भरून घेतले जात असायचे अशी सारी पिळवणूकीची परिसस्थिती होती, शेतकरी हवालदिल झाला होता मात्र गरिबी मोठी वाईट असेत अशी एक म्हण प्रचलित आहे. त्यामुळे शेतकरी बांधवांच्या कष्टाचे चीज त्यांना मिळाले पाहीजे, यासाठी मारूतरावांनी दहिगाव विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी अंतर्गत ज्वार बॅकेची स्थापना करून शेतकरी बांधवांना व गरिब जनतेला धान्य पुरवठा सुरू केला. ज्यांनी कोणी ज्वार बॅकेतून ज्वारी घेतली त्यांनी आपले खळे झाल्यानंतर ते आणून देणे असा नियमही होता. याच ज्वार बॅकेच्या दहिगावातील वसतीगृहातील विद्यार्थ्यांसाठी धान्य पुरविले जावू लागले. गावातील पोलिस पाटीलकीचे वतन असताने मारूतरावांनी गावाला शांतीच्या मार्गाने घेवून जाण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी स्वत: ठगांशी अनेकदा दोन हात केले. त्यांच्या या धाडशी कृत्यामुळे परिसरातील अबाल स्त्रीयांना निर्भिडपणे घराबाहेर पडता आले. जुलुमशाहीला आळा बसला. ठगांनी लुठमारी सोडून शेती व्यवसाय सुरू केला, मारूतरावांची प्रेरणा त्यांच्यासाठी अनमोल ठरली. यावरून त्यांचा परिस्थिती हाताळण्याचा एक सुप्तगुण लक्षात येतो.

ग्रामीण भागातील विद्यार्थी हा जवळपास गरिबच असतो हे सहजपणे व खात्रीपुर्वक सांगता येईल. कारण ग्रामीण भाग हा शेती व्यवसायावर आधारलेला आहे. मात्र शेतीतून कायमच चांगले उत्पन्न निघते असे नाही. अनेकदा पिक उभा राहूनही वाया जाते. कारण पाणी हा महत्वाचा स्त्रोत स्थिर नाही. ज्यावर्षी अधिक पाऊस पडतो त्या वर्षी शेतकरी वर्ग अधिक सुखावलेला दिसून येतो. त्याला बाहेर शिक्षण घेण्यासाठी परवडणारे नाही तर अनेकदा असही होत की आर्थिक पाठबळ मिळत नसल्याने अनेक हुशार मुलांना शाळा सोडावी लागली. हा प्रकार थांबावा यासाठी १९५९ साली जनता शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना व नवजीवन माध्यमिक विद्यालय , दहिगाव—ने ची स्थापना परिसरात

शैक्षणिक क्रांती घडवून आणली. ग्रामीण भागात सहकार, कृषी व शैक्षणिक क्रांती घडवून परिसर सुजलाम—सुफलाम बनविला. म्हणून तर त्यांना जनतेकडून मालक ही उपाधी मिळाली. कॉंग्रेस पक्ष कमिटीवर महत्वाची पद भूषवून तसेच १९६२ ला विधानसभेचे तिकीट मागितले नसूनसुध्दा ते बळच स्विकारावे लागले. पक्षश्रेष्ठींनी विधानसभा तिकीट तुम्हाला देत आहाते असे म्हणटल्यांवर, 'मला तिकीट नको मी बरा आहे माझ्या लोकांतच सेवा करायला!' तरीही पक्षश्रेष्ठींनी केलेल्या आग्रहास्तव 'मला आईना विचारावे लागेल' असे मार्मिक उत्तर मारूतरावांनी दिले. यावरून त्यांच्यातील आईबद्दलचे प्रेम याठिकाणी प्रकट होताना दिसून येते त्याचबरोबर त्यांच्या अंगातील प्रामाणिकपणा आणि निस्वार्थही इथे भासतो. शेवटी पद्मभूषण भारदे पाटीलांनी मारूतरावांच्या आईची भेट घेवून परवानगी मिळविली. मारूतरावांचे पक्ष श्रेष्ठींचा विश्वास संपादन करण्याचा एक महत्वाचा गुण इथे दिसून येतो. राजकारण हे समाजकारणाचे दुसरे अंग आहे. राजकारणात मतभेद होवू शकतात मात्र ते फक्त राजकीय व तेवढयापुरते मर्यादीत असावेत ते कायमस्वरूपी व व्यवहारी विरोधी नसावेत. त्यांच्या या नितीमुळे विरोधकही त्यांना तितकेच मानतात जितके हितचिंतक. मारूतरावांच्या राजकीय, आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्याचा आढावा घेता त्यांच्या विविध पैलूंचे दर्शन घडते. सलग १६ वर्षे आमदार असूनही मंत्रीपद नाकारले कारण त्यांचे म्हणने होते की मंत्रीपद घेवून समाजाची सेवा होते, परिसराचा विकास होतो ही भ्रामक कल्पना आहे. मला इथेच माझ्या लोकांत राहून त्यांचा उध्द्र करावयाचा आहे. त्यासाठी मंत्रीपद हवेच असं काही नाही. हा भल्या मनाचा माणूस यशवंतराव चव्हाण साहेबांना कायम भावत व ते कधी जिल्ह्यात दौऱ्यावरती आले तर मारूतरावांचे तोंडभरून कौतूक केल्याशिवाय जात नसत. मारूतराव आणि यशवंतराव चव्हण साहेब हे कोणालाही न सुटणारं एक घटट् समिकरणचं बनलं होतं. महाराष्ट्राचे नेते श्री. शरदचंद्रजी पवार साहेब मारूतरावांबद्दल सांगताना आवर्जून सांगतात की मारूतरावांचा आदर्श आजच्या पिढीने डोळयासमोर ठेवला पाहीजे. मा. यशवंतराव चव्हाण, मा. वसंतदादा पाटील, माजी केंद्रिय राज्यमंत्री मा.

अण्णासाहेब शिंदे, माजी अर्थमंत्री मा. सुशिलकुमार शिंदे, मा. आबासाहेब निंबाळकर , मा. शरदचंद्रजी पवार साहेब यांसारख्या मातब्बर नेत्यांचे मार्गदर्शन आणि पद्‌मभूषण बाळासाहेब भारदे पाटीलांचा सहवास लाभल्यानेच मारूतराव यशाच्या शिखरापर्यंत पोहचण्यात यशस्वी झाले. या सर्वांनीच मारूतरावांवर भरभरून प्रेम केले. यावरून मारूतरावांची आत्मियता व कृतज्ञता असे दोन्ही गुण दिसून येतात.

अहमदनगर जिल्हा सहकारी बॅकेवर स्थापनेपासून तर शेवटपर्यंत संचालक म्हणून तर काही वर्ष बॅकेचे चेअरमन म्हणून काम बघितले. मारूतराव जिल्हा सहकारी बॅकेचे प्रमुख असताना ही बॅक आशिया खंडातील पहिल्या क्रमांकाची सहकारी बॅक म्हणून नावारूपाला आली. शेतकरी बांधवांची स्वत:च्या हक्काची बॅक म्हणजे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅक. ज्या ज्या वेळी जिल्हा सहकारी बॅक अडचणीत असेल त्या त्या वेळेला बॅकेचे प्रमुखपद आपोआप मारूतरावांकडे येत. आणि मारूतराव त्यावेळी परिस्थिती अतिशय भारदस्तपणे हाताळत व बॅकेस पूर्ववत करत. यावरून मारूतरावांचे परिस्थिती हाताळण्याचा एक परिणामकारक गुण स्पष्ट होतो. अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅक, विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी, श्री. ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना, भेंडा यांच्या आधाराने मारूतरावांनी परिसराचे व जिल्हयाचे नंदनवन केले आहे. त्यांचे सहकारातील समग्र कार्याचा आढावा घेता असे दिसून येते की मारूतरावांना सहकारात अधिक रूची होती. ती त्यांनी शेवटपर्यंत जपली आणि वाढवली.

राजकारण करताना किंवा वैयक्तिक हीत जपताना मारूतरावांनी जातीधर्माचा कधी तिरस्कार केला नाही. माणूस या घटकावर त्यांनी अधिक जोर दिला. दलित बांधवांसाठी अनेक सोई—सुविधा उपलब्ध करून दिल्या. सहकार क्षेत्र असेल किंवा शालेय तसेच नोकरीविषयक बाब असेल अशा सर्व घडामोडींत या वर्गास त्यांनी प्राधान्य दिले. यावरून असा निष्कर्ष निघतो की,

मारूतराव हे डॉ. आंबेडकर, महात्मा फुले यांचे वैचारिक अनुयायी होते. कारण त्यांनी कायमच सर्व जाती धर्माला सोबत घेऊन राष्ट्रीय ऐक्यात भर घातली.

शेवगाव – नेवासे तालुक्याचा उध्द्वार खऱ्या अर्थाने कोणी केला असेल तर तो लोकनेते स्व. मारूतराव घुले पाटील यांनी केला आहे. ग्रामीण भागापर्यंत वीज, रस्ते, शिक्षण, रोजगार, आरोग्य इत्यादी सुखसोई पोहचल्या कारण त्यासाठी मारूतरावांनी अतोनात कष्ट केले म्हणून हे शक्य झाले. त्यांच्या सामाजिक व सहकार क्षेत्रातील योगदानाचा विचार करता त्यांना जिल्हा बॅंकेकडून सहकारभूषण पुरस्कार मिळाला तसेच इंदिरा गांधी प्रियदर्शनी सारखे काही महत्वाचे पुरस्कार त्यांना सर्वांगिण क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल मिळाले.

प्रस्तुत अभ्यासातून मारूतराव घुले पाटील यांचे अहमदनगर जिल्हयातील सर्वांगिण क्षेत्रातील योगदान कळते मात्र तरीही काही मर्यादा जाणवतात. या मर्यादा पुढील प्रमाणे.

१. एकूण १६ वर्षे आमदार असूनही मारूतरावांना मंत्री पदासाठी आपली वर्णी लावता आली नाही. मारूतरावांनी आपले वजन वापरले असते तर नक्कीच मारूतरावांना मंत्री पद मिळाले असते मात्र मारूतरावांनी तसे प्रयत्न केले नाही.

२. मारूतरावांनी राजकीय व सहकार क्षेत्राला समान महत्व दिले नाही. त्यांनी राजकारणापेक्षा सहकाराला अधिक महत्व दिले नाही.

**६.२. फलनिष्पती :**

१) घुले पाटील यांचे जायकवाडी धरणग्रस्तांचे प्रश्न मार्गी लागण्यासाठी विशेष प्रयत्न राहीले आहे.

२) मतभेद हे वैचारिक असावेत ते जातीवंत नसावेत हा मारूतरावांचा मानस होता.

३) यशवंतराव चव्हाण साहेबांनी अनेक निष्ठावंत व कर्तबगार लोक राजकारणात आणले यात मारूतरावांचा वरचा क्रम लागतो.

४) ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना काढून सहकारातून राजकारण साधन हा त्यांचा हेतू नव्हता, कारखाना हा जायकवाडी धरणामुळे विस्थापित झालेल्या वर्गाला रोजगार उपलब्ध करून देणे हाच होता.

५) घुले पाटीलांना शेतकरी कुटुंबाप्रती खुपच आत्मियता होती.

६) घुले पाटीलांनी प्रसिध्द्‌ीपेक्षा कार्याला अधिक महत्व दिल्याने त्यांना प्रसिध्द्‌ी आपोआप मिळाली.

७) सहकार, सामाजिक, राजकीय तसेच आर्थिक अशा सर्वच क्षेत्रातील मारूतरावांचे काम उच्चकोटीचे राहीलेले आहे.

### ६.३. समारोप :

थोडक्यात लोकनेते मारूतराव घुले पाटील यांनी राजकीय सामाजिक, आर्थिक तसेच सहकार क्षेत्रात दिलेले योगदान उच्चकोटीचे ठरले आहे. त्यांचे हे कार्य भावी पिढीला आदर्शवत ठरणारे आहे. मारूतराव घुले पाटील यांच्या कार्याचा वारसा त्यांचे सुपुत्र मा. नरेंद्रजी घुले पाटील आणि चंद्रशेखर घुले पाटील चालवित आहेत. मारूतरावांची उणीव या दोन सुपुत्रांनी भरूण काढली आहे असे म्हणता येईल. आपल्या वडीलांनी दिलेला सामाजिक बांधिलकीचा मूलमंत्र घेऊन हे दोन्ही सुपुत्र सामाजिक, राजकीय आणि सहकार क्षेत्रात आपली सेवा देत आहेत.

# परिशिष्ट

**अ) प्रश्नावली :**

१. पुर्ण नाव :—

२. पत्ता :—

३. वय :—

४. स्व. मारूतराव घुले पाटील यांच्या विषयी माहीती आहे काय?

५. स्व. मारूतराव घुले पाटील यांच्या कार्याबद्‌दल आपले काय मत आहे?

६. स्व. मारूतराव घुले पाटील यांच्या कार्यात आपण प्रत्यक्ष सहभागी होतात काय?

७. स्व. मारूतराव घुले पाटील यांच्या राजकीय कारकिर्दीद्‌दल आपले काय मत आहे?

८. स्व. मारूतराव घुले पाटील यांचा सामाजिक दृष्टिकोन कोणता.

९. स्व. मारूतराव घुले पाटील यांनी जायकवाडी धरण बांधणीवेळी पुर्नवसनासाठी दिलेला लढा आठवतो काय? असेल तर त्यावेळी काय परिस्थिती होती?

१०. स्व. मारूतराव घुले पाटील यांचे सहकार क्षेत्रातील योगदान कोणते?

११. स्व. मारूतराव घुले पाटील यांचे नेतृत्व कसे होते?

१२. विरोधकांचे राजकारणाचे व समाजकारणाचे स्वरूप काय होते?

१३. मारूतराव घुले पाटील यांच्या धरणग्रस्त आंदोलनाच्या मागे राजकीय हेतू होता काय?

१४. आपण मारूतरावांच्या सानिध्यात केंव्हापासून आलात?

१५. मारूतरावांनी राजकारणापेक्षा सहकार क्षेत्रात अधिक कार्य केले याबाबत आपले मत का?

१६. विरोधकांच्या कार्यापेक्षा मारूतरावांचे कार्य काय वेगळे होते?

१७. मारूतरावांवर कधी भ्रष्टाचारासारखे आरोप झाले होते काय?

१८. अहमदनगर जिल्हा हा गटाच्या राजकारणासाठी प्रसिध्द् आहे, मग मारूतराव कोणत्या गटाचे होते?

१९. यशवंतराव चव्हाण यांनी मारूतरावांना त्यांच्या कार्याबदद्ल वेळोवेळी शाबासकी दिली, मारूतरावांचे कार्य तुम्हाला खरंच एवढे महान वाटते का?

२०. मारूतरावांनी जनता शिक्षण प्रसारक ही शैक्षणिक संस्था असूनही पुन्हा नव्याने मारूतराव घुले पाटील शिक्षण संस्था का काढली?

२१. १९९० साली मारूतरावांचे विधानसभेवर पराभव झाला याचे नेमके कारण काय?

२२. मारूतरावांचे सहकार व राजकारण याबदद्ल आपल्याला काय वाटते?

२३. मारूतराव आपल्या कार्यकतृत्वाची माट बांधत असताना त्यांना जिल्ह्यातील कोणकोण्त्या नेत्यांनी मदत केली?

२४. बाळासाहेब भारदे आणि मारूतरावांचे संबंध कसे होते?

२५. शेवगाव व नेवासा तालुका व्यतिरिक्त मारूतरावांचे अजून कोणत्या तालुक्यात योगदान आहे काय?

**ब) मुलाखत :**

१. श्री. काकासाहेब शिंदे

जनरल व्यवस्थापक, श्री. ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना, ज्ञानेश्वरनगर, भेंडा,

मुलाखत दिनांक १९/०६/२०१५

२. श्री. कारभारी गायके

प्रशासकीय अधिकारी, श्री. ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना, ज्ञानेश्वरनगर, भेंडा,

मुलाखत दिनांक २५/०६/२०१५

३. श्री. गुलाबराव घुले पाटील

माजी अध्यक्ष, अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅक,

मुलाखत दिनांक २५/०६/२०१५

४. श्री. अनिल शेवाळे

कार्यकारी संचालक,जनरल व्यवस्थापक, श्री. ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना, ज्ञानेश्वरनगर, भेंडा

मुलाखत दिनांक ११/०७/२०१५

५. श्री. कारभारी नजन

प्राचार्य, नवजीवन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, दहिगाव—ने

मुलाखत दिनांक १८/०७/२०१५

६. श्री. शंकर मोहन मतकर

कार्यलय कर्मचारी, श्री. दत्त पाणी पुरवठा सहकारी संस्था मर्यादीत दहिगाव—ने

मुलाखत दिनांक २१/०७/२०१५.

७. श्री. ह.भ.प. लक्ष्मण बाबा नवथर

जेष्ठ नागरीक, रांजणी

मुलाखत दिनांक २१/०७/२०१५

८. डॉ. संभाजी काळे

उपप्राचार्य, जिजामाता महाविद्यालय, भेंडा. ता. नेवासा

मुलाखत दिनांक २३/०८/२०१५

९. श्री. चंद्रशेखर पाटील घुले

चेअरमन, जनरल व्यवस्थापक, श्री. ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना, ज्ञानेश्वरनगर, भेंडा

मुलाखत दिनांक ०८/०९/२०१५

१०.प्रा. अमोल गुंड

प्राध्यापक, मारूतराव घुले पाटील महाविद्यालय, दहिगाव—ने

मुलाखत दिनांक १५/०९/२०१५

११.श्री. दिलीपराव नवथर

कार्या. कर्मचारी, श्री. ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना, ज्ञानेश्वरनगर, भेंडा.

मुलाखत दिनांक १५/०९/२०१५

१२.श्री. सकाहरी पाटील घुले

जेष्ठ नागरीक, दहिगाव—ने

मुलाखत दिनांक १९/०९/१५

१३.श्री. रामभाऊ शिदोरे

माजी चेअरमन, श्री. कानिफनाथ पाणी वापर वाटप संस्था, रांजणी

मुलाखत दिनांक २१/०९/२०१५

१४.श्री. पद्‌माकर थोरात,

ग्रामपंचायत कार्यालय दहिगाव—ने

मुलाखत दिनांक २७/०९/२०१५

१५. डॉ. करणसिंह घुले

संस्थापक, समर्पक फॉऊंडेशन, नेवासा

मुलाखत दिनांक ०३/१०/२०१५

१६.श्री. अरूण थोरात

सरपंच, रांजणी ग्रामपंचायत, शेवगाव

मुलाखत दिनांक ०८/१०/२०१५

१७.श्री. दिलीप पवार

सरपंच, पिंपरी शहाली,ता.नेवासा

मुलाखत दिनांक. ११/१०/२०१५.

१८.श्री. दिलीपराव सातपुते

सामनगाव,शेवगाव,सभासद–श्री.ज्ञा.सह.सा.का

मुलाखत दिनांक. ११/१०/२०१५.

१९.श्रीकांत अकोलकर

नागरिक, करंजी, पाथर्डी

मुलाखत दिनांक. १४/१०/२०१५

२०.श्री. बाळासाहेब नवथर पा.

कार्यकर्ते राष्ट्रवादी कॉ. पक्ष, रांजणी, सभासद–ज्ञा.सह.सा.का.

मुलाखत दिनांक १४/१०/२०१५

२१. श्री. भाऊसाहेब गरड

माजी सरपंच, सुकळी ग्रामपंचायत, शेवगाव

मुलाखत दिनांक १५/१०/२०१५

२२.श्री.शेखर भारस्कर

माजी जिल्हाध्यक्ष. रा.वि.कॉ.अहमदनगर

मुलाखत दिनांक १५/१०/२०१५

२३.सौ. छायाताई धोंडे

माजी सभापती शेवगाव पंचायत समिती

मुलाखत दिनांक १९/१०/२०१५

२४.श्री. बाळासाहेब धोंडे

माजी सरपंच, मठाचीवाडी, शेवगाव

मुलाखत दिनांक १९/१०/२०१५

२५.श्री. संजय सुरवसे

ग्रामपंचायत कार्या. कर्मचारी, शेवगाव

मुलाखत दिनांक १९/१०/२०१५

२६.संपतराव नवथर नागरिक, पिंपरी शहाली, नेवासा

मुलाखत दिनांक १९/१०/२०१५

२७.अशोक आढाव पाटील

नागरिक, भायगाव

मुलाखत दिनांक १९/१०/२०१५

२८.रामभाऊ लिपने

नागरिक, नांदूर शिकारी, नेवासा

मुलाखत दिनांक १९/१०/२०१५

२९.अर्जुन तिडके पाटील

नागरिक, रानेगाव, शेवगाव

मुलाखत दिनांक १९/१०/२०१५

३०.अंबादास माने

नागरिक, बालमटाकळी, शेवगाव

मुलाखत दिनांक १९/१०/२०१५

३१.भाऊसाहेब मरकड

नागरिक, भावीनिमगाव, शेवगाव

मुलाखत दिनांक १७/१०/२०१५

३२.नामदेव आरगडे

नागरिक, सौंदाळा, नेवासा

मुलाखत दिनांक १७/१०/२०१५

३३.प्रा. गणेश शेळके

न्यू आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, शेवगाव –

मुलाखत दिनांक – १७/१०/२०१५

३४. दिनकरराव टेकणे

प्रशासक मा.घु.पा.शिक्षण संस्था

मुलाखत दि. २०/१०/२०१५

३५. प्रा. महेश शेजूळ,

प्रशासक जनता शिक्षण प्रसारक मंडळ

मुलाखत दि. २०/१०/२१५

३६.पांडूरंग अभंग,

माजी विधानसभा सदस्य

मुलाखत दि. २०/१०/२०१५

३७.ॲड. देसाई भाऊसाहेब देशमुख,

समकालीन, कुकणा

मुलाखत २४/१०/२०१५

३८.डॉ. कैलास कानडे

दहिगाव–ने

मुलाखत दि २४/१०/२०१५

३९.प्रा.राम ढाकणे,

नागरिक, मठाचीवाडी

मुलाखत दि : २४/१०/१५

४०.एस.बी.उगले

नागरिक, शेवगाव

मुलाखत २४/१०/२०१५

४१. भैय्यासाहेब देशमुख,

समकालीन, कुकाणा

मुलाखत २८/१०/२०१५

४२. म्हस्के एम.एम,

कार्यकर्ता शेवगाव,

मुलाखत दि. २९/१०/२०१५.

४३. श्री. बाळासाहेब आवळे

नागरिक, पिंपरी शहाली

मुलाखत दि. २९/१०/२०१५

४४. श्री. दामोधर वखरे

समकालीन, मठाचीवाडी

मुलाखत दि. ०३/११/२०१५

४५. श्री. लक्ष्मण म्हसरूप

समकालीन, नांदूर शिकारी

मुलाखत दि. ०३/११/२०१५

४६. श्री. शांताराम नवथर

नागरिक, रांजणी

मुलाखत दि. ०३/११/२०१५

४७. श्री. जीजासाहेब घुले

नागरिक रांजणी

मुलाखत दि. ०५/११/२०१५

४८. श्री. जनार्धन घुले

नागरिक, रांजणी

मुलाखत दि. ०९/१/२०१५

४९. श्री. लहु पवार

नागरिक, मठाचीवाडी

मुलाखत दि. ९/११/२०१५

५०. श्री. मनोहर नवथर

नागरिक, रांजणी

मुलाखत दि. ९/११/२०१५

५१. श्री. भाऊराव राऊत

समकालीन, पिंपरी शहाली

मुलाखत दि. १४/११/२०१५

५२. श्री. गोपीनाथ खेडेकर

समकालीन, गोयगव्हाण

मुलाखत दि. १४/११/२०१५

५३. श्री. अमित लिपने

नागरिक, कुकाणा

मुलाखत दि. १४/११/२०१५

५४. श्री. हनुमंत जगदाळे

समकालीन, मठाचीवाडी

मुलाखत दि. १४/११/२०१५

५५. डॉ. अरूण पवार

सरपंच, दहिगाव—ने

मुलाखत दि. २०/११/२०१५

५६. श्री. लक्ष्मण म्हसरूप

समकालीन, नांदूर शिकारी

मुलाखत दि. २०/११/२०१५

५७. श्री वखरे रामजी

नागरिक, मठाचीवाडी

मुलाखत दि. २३/११/२०१५

५८. श्री. अशोक माने

नागरिक, बालमटाकळी

मुलाखत दि. २३/११/२०१६

५९. श्री. यादव तनपुरे

समकालीन, अहमदनगर

मुलाखत दि. २३/११/२०१६

६०. श्री. श्रीधर लिपणे — नांदूर शिकारी

नागरिक, नांदूर शिकारी

मुलाखत दि. २३/११/२०१५

६१. श्री. पद्‌माकर चिन्धे

नागरिक, कुकाणा

मुलाखत दि. २३/११/२०१५

६२. श्री. बाळासाहेब गुंड

सरपंच, सुकळी, ता. नेवासा.

मुलाखत दि. २५/११/२०१५

६३. श्री. जगन्नाथ कचरे

समकालीन, पिंपरी शहाली

मुलाखत दि. २५/११/२०१५

६४. महेंद्र मुळे

नागरिक, पिंपरी शहाली

मुलाखत दि. २५/११/२०१५

६५. कारभारी नवले

नागरिक, ज्ञानेश्वरनगर, भेंडा

मुलाखत दि. २५/११/२०१६

६६. नानासाहेब चेडे

ग्रामीण पत्रकार, शेवगाव तालुका.

मुलाखत दि. २६/२६/२०१५

६७. श्री. नानासाहेब गवळी

नागरिक, रांजणी

मुलाखत दि. २६/११/२०१५

६८. श्री. संजय चव्हाण

नागरिक, रांजणी

मुलाखत दि. २९/११/२०१५

६९. बबन राऊत

नागरिक, दहिगाव—ने

मुलाखत दि. ०३/१२/२०१५

७०. कविता नवथर

सदस्य, नेवासा पंचायत समिती

मुलाखत दि. ०३/१२/२०१५

७१. देवराव पवार

समकालीन, मठाचीवाडी

मुलाखत दि. ०३/१२/२०१५

७२. नवनाथ कर्डीले

कार्यकर्ता, रांजणी

मुलाखत दि. ९/१२/२०१५

७३. उत्तमराव गुंड

समकालीन, सुकळी

मुलाखत दि. ०९/१२/२०१५

७४. सौ. कौशल्या सोणवणे

नागरिक, भायगाव

मुलाखत दि. १७/१२/२०१५

७५. श्री. गंगाधर कचरे

समकालीन, भायगाव

मुलाखत दि. १७/१२/२०१५

७६. विवेक कुटे

समकालीन, ज्ञानेश्वरनगर

मुलाखत दि. १९/१२/२०१५

७७. सौ.नम्रता मेटे

समकालीन, शेवगाव

मुलाखत दि. १९/१२/२०१५

७८. वसीम सय्यद

नागरिक, शेवगाव

मुलाखत दि. २१/१२/२०१५

७९. भानुदास जीवडे

नागरिक, दहिफळ

मुलाखत दि. २१/१२/२०१५

८०. कुलटे सदाशिव

समकालीन, दहिफळ

मुलाखत दि. २१/१२/२०१५

८१. भाऊराव शिरसाठ

समकालीन, सुकळी

मुलाखत दि. ११/१२/२०१५

८२. भीमराज नवथर

कार्यकर्ता, पिंपरी शहाली

मुलाखत दि. २१/१२/२०१५

८३. भाऊसाहेब गरूड

कार्यकर्ता, बोधेगाव

मुलाखत दि. २१/१२/२०१५

८४. प्रशांत मरकड

कार्यकर्ता, भावीनिमगाव

मुलाखत दि. २५/१२/१५

याशिवाय मारूतराव घुले पाटीलांच्या संबंधित कार्यकर्ते, सहकारी, नातेवाईक, ईत्यादींशी चर्चा औपचारिक अनौपचारिक चर्चा करून माहिती जमा करण्यात आली.

**क) मारूतराव घुले पाटील यांच्या कार्यकतृत्वाचा थोडक्यात आढावा :— मारूतरावांच्या कार्यकतृत्वाचा आलेख :**

**१. नाव** : मारूतराव शंकरराव घुले

**२. पत्ता** : मु.पो. दहिगाव—ने, ता. शेवगाव, जि. अहमदनगर

**३. जन्म ता.** : १५ सप्टेंबर १९३०

**४. शिक्षण** : इंटर आर्ट.

**५. सन १९५४** : दहिगाव—ने येथे विविध सेवा सहकारी सोसायटीची स्थापना.

**६. सन १९५८** : शेवगाव तालुका सहकारी खरेदी—विक्री संघाचे संचालक व शेवगाव तालुका मार्केट कमिटीचे संचालक.

**७. सन १९५९** : दहिगाव—ने येथ्जनता शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना व नवजीवन विद्यालय व वसतिगृह सुरू केले.

**८. सन १९५९** : आशिया खंडातील अग्रगण्य समजल्या जाणाऱ्या अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक म्हणून काम पाहण्यास प्रारंभ. (शेवटपर्यंत संचालक, अनेकदा अध्यक्षपदही भूषविले आहे).

**९. सन १९६०** : कॉंग्रेस कमिटीचे सक्रिय कार्यकर्ते.

**१०. सन १९६१** : अखिल भारतीय कृषक समाज नवी दिल्लीचे सदस्य.

**११. सन १९६१** : शेवगांव तालुका शेतकरी संघाचे अध्यक्ष म्हणून उत्तम कामगिरी.

**१२. सन १९६२** : शेवगाव—नेवासा मतदार संघातून विधानसभेवर निवड.

**१३. सन १९६२** : जिल्हा कॉंग्रेस अध्यक्षपदी. (सन १९६२ ते १९७२ पर्यंत).

**१४. सन १९६६** : जायकवाडी धरणग्रस्तांच्या मुलांसाठी शेवगाव येथे औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरू केली.

**१५. सन १९६६** : २७/०७/१९६६ रोजी कारखान्यासंदर्भात पहिली सभा.

**१६. सन १९६७** : शेवगाव—नेवासा मतदार संघातून पुन्हा विधानसभेवर.

**१७. सन १९६८** : ज्ञानेश्वर महाविद्यालयाची स्थापना करण्यात विशेष वाटा.

**१८. सन १९७०** : श्री. ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्यास दि. १९ ऑक्टोंबर १९७० रोजी सरकारकडून रजिस्ट्रेशन.

**१९. सन १९७२** : अहमदनगर जिल्हा मतदार संघातून आमदार म्हणून विधान परिषदेवर निवड

**२०. सन १९७३** : दि. २७ एप्रिल १९७३ सरकारकडून कारखान्यास औद्योगिक परवाना.

**२१. सन १९७८** : सन १९७८ साली अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅकेच्या चेअरमनपदी.

**२२. सन १९७९** : सन १९७९ साली अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅकेच्या चेअरमनपदी.

**२३. सन १९८६** : सन १९८६ साली अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅकेच्या चेअरमनपदी.

**२४. सन १९८९** : सन १९८९ साली अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅकेच्या चेअरमनपदी.

**२५. सन १९९०** : सन १९९० साली अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅकेच्या चेअरमनपदी.

**२६. ८ जुलै २००२ :** मृत्यू.

**ड). पुरस्कार :**

मारूतरावांच्या कार्याची दखल घेत त्यांना राष्ट्रीय व राज्य पातळीवर काही महत्वाची पारितोषिके मिळालेली आहेत ते पुढीलप्रमाणे :

**०१. उत्कृष्ठ कार्यक्षमतेचे प्रथम कमांकाचे पारितोषिक, सन. १९८५—८६ :**

हा पुरस्कार राष्ट्रीय उत्पादकता परिषद नवी दिल्ली मार्फत दिला जातो.

सदरचा पुरस्कार मिळवणारा ज्ञानेश्वर सह. साखर कारखाना महाराष्ट्रील पहीला साखर कारखाना आहे. २२ एप्रिल १९८७ रोजी जे वेंगलकर, उद्योगमंत्री — भारत सरकार यांच्याहस्ते कारखान्याचे संस्थापक मा. मारूतरावजी घुले पाटील यांना देण्यात आला.

**०२. मिलमधील उत्कृष्ठ तांत्रिक कार्यक्षमतेबद्दल राष्ट्रीय कार्यक्षमता पारितोषिक, सन १९८७—८८.**

हा पुरस्कार भारत सरकारच्या अन्न व नागरी पुरवठा खात्यामार्फत दिला जातो. दि. ९ एप्रिल १९८९ रोजी ना. नथुराम मिर्धा — अन्न व नागरी पुरवठा मंत्री यांचे शुभहस्ते दिनांक २१ सप्टेंबर १९८९ रोजी हा पुरस्कार मिळाला.

**०३. उत्कृष्ठ कार्यक्षमता व्दितीय क्रमांकाचे पारितोषिक, सन १९८८—८९ :**

हा पुरस्कार नॅशनल फेडरेशन ऑफ को—ऑपरेटीव्ह शुगर फॅक्टरीज लि., नवी दिल्ली या संस्थेकडून दिला जातो. या संस्थेकडून व्दितीय क्रमांकाचे पारितोषिक ना. सुखरामजी — केंद्रिय अन्न व नागरी पुरवठा मंत्री यांचे शुभहस्ते दिनांक २१ सप्टेंबर १९८९ रोजी हे पारितोषिक मिळाले.

**०४. रिडयुस्ड ओव्हरऑल रिकव्हरीबद्दल व्दितीय क्रमांकाचे पारितोषिक, सन १९९३—९४ :**

हा पुरस्कार वसंतदादा शुगर इन्स्टिटयुट, पुणे यांच्याकडून दिला जातो. सन १९९३—९४ साठीचा हा पुरस्कार ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्यास मिळाला.

**०५. इंदिरा गांधी प्रियदर्शनी पुरस्कार, सन १९९४—९५ :**

हा पुरस्कार भारताच्या माजी पंतप्रधान स्व. इंदिराजी गांधी यांच्या जन्मदिनानिमित्त अखिल भारतीय एकता परिषदेमार्फत दिला जातो. इंदिरा गांधी यांच्या ७५ व्या जन्मदिनानिमित्ताने भारताचे परराष्ट्र खात्याचे माजी मंत्री ना. रघनंदलाल भाटीया यांचे शुभहस्ते दि. १८/०९/१९९४ रोजी मारूतरावांना मिळाला.

**०६. भारतीय उद्योगरत्न पुरस्कार, सन १९९५—९६ :**

हा पुरस्कार अखिल भारतीय अर्थ विकास व संशोधन या संस्थेमार्फत दिला जात असून १९९६ साठीचा हा पुरस्कार माजी अर्थमंत्री पी. चिंदबरम् यांच्या शुभहस्ते दि. २८ मार्च १९९७ रोजी मारूतरावांना देण्यात आला.

**०७. सहकारभुषण पुरस्कार, सन १९९६—९७ :**

हा पुरस्कार सहकार व सामाजिक क्षेत्रातील उत्कृष्ठ कामगिरीबद्दल अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅकेमार्फत दिला जातो. १९९७ साठीचा हा पुरस्कार लोकनेते सहकारमहर्षी मारूतराव घुले यांना प्रदान करण्यात आला.

**०८. आय. एस. ओ. ९००२ प्रमाणपत्र :**

उत्पादन व उत्पादनाची क्षमता, कुशल व्यवस्थापनाबद्दल श्री. ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्यास आंतराष्ट्रीय पातळीवरील आय.एस.ओ. — ९००२ हे प्रमाणपत्र दिनांक १९ जानेवारी २००० रोजी प्राप्त झाले.

---

**इ) छायाचित्रे :**



**सहधर्मचारिणी सौ. जिजाबाई समवेत मा. मारूतराव घुले पाटील**




श्री. मारूतराव घुले पाटील यांनी उभारलेली पहिली वि. कार्य. सह. सोसायटी




दहिगाव—ने येथील गरिब विद्यार्थ्यांसाठीचे श्री. छ. शिवाजी विद्यार्थी वसतीगृह



**भव्य राजकीय सभेमध्ये मार्गदर्शन करताना मारूतराव घुले पाटील.**



मिथेन गॅस रिकव्हरी प्लॅटच्या उद्‌घान समारंभात मार्गदर्शन करताना मारूतराव.



मा. वसंतदादा पाटील यांच्यासमवेत विविध विषयांवर चर्चा करताना मारूतराव.



भारताचे पहिले पंतप्रधान पं. नेहरू यांचे स्वागत करताना मारूतराव व शेतकरी.



श्री. ज्ञा.सह.सा.का. स्थळावर ज्ञानेश्वर महाराजांची मुर्तीस्थापना करण्यापर्वी माऊलींची भव्य दिंडी काढण्यात आली यांत सहभागी झालेले मारूतराव.



मा. ना. अण्णासाहेब शिंदे यांच्यासमवेत श्री. मारूतराव घुले पाटील



शेतकरी मेळावा, श्री.ज्ञा.सह.सा.का. याठीकाणी मा. यशवंतराव चव्हाण यांचे स्वागत करताना मारूतराव.

स्व. मारूतरावांच्या मळ्यातील शेती कामगार सुधाकर थोटे यांच्याशी चर्चा करताना संशोधक.



श्री. मारूतरावांनी उभारलेला ताजनापूर जलउपसा सिंचन प्रकल्प.



स्व. मारूतरावांच्या मळ्यातील शेती कामगार सुधाकर थोटे यांच्याशी चर्चा करताना संशोधक.



माजी आमदार श्री. पांडूरंग अभंग यांच्याशी चर्चा करताना संशोधक



अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंक, दहिगाव–ने चे माहितीदाता राजेंद्र पाऊलबुधे यांच्याशी सल्ला करताना संशोधक




स्व. मारूतरावांचे समकालीन श्री भैय्यासाहेब देशमुख यांच्याशी चर्चा करताना संशोधक.



मारूतरावांचे समकालीन ॲड. देसाई भाऊसाहेब देशमुख यांच्याशी चर्चा करताना संशोधक.

ई) घुले घराण्याची वंशावळ :






**श्री. मारूतरावांचे दोन्ही कुटंब आणि डावीकडून पढेगावचा व उजवीकडून दहिगावचा वाडा**

# ९. संदर्भग्रंथ :


१. आगलावे प्रदिप, संशोधन पध्द्तीशास्त्र व तंत्रे, विद्या प्रकाशन, नागपूर.

२. आवारी विलास, प्रा. सुरेश देवरे, आधुनिक राजकीय विश्लेषण, डायमंड पब्लिकेशन, पुणे.

३. ऋषी पी. डी, १०० वर्षातील नगरचे बदलते समाज जीवन, शार्प प्रिन्टर्स, अहमदनगर.

४. खानझोडे हेमंत, राजकीय सिध्दांत —परिचय, पर्सन पब्लिकेशन, पुणे.

५. गडाख यशवंत, श्री.मारूतराव घुले पाटील ५१ वा. सुवर्ण महोत्सव गुणदर्शन, महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे ४.

६. चव्हाण किसन, आंदकोळ — आत्मकथन, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई.

७. चव्हाण यशवंत, भूमिका, रोहण प्रकाशन, पुणे.

८. चोंगुले, पठाण, भारतीय सहकार चळवळ, कॉन्टिनेन्टल.

९. जोंधळे भास्कर शंकरराव, एक विश्वस्त, महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे.

१०.दास्ताने संतोष, महाराष्ट्र २०१२, नितीन प्रकाशन, पुणे.

११.देशमुख रा.नी, अहमदनगर जिल्हा माहिती पुस्तिका, कल्पना प्रकाशन, नांदेड.

१२.पाटील भीमराव, मनामनातील मारूतराव घुले पाटील, पृथ्वीराज प्रकाशन, पुणे.

१३.पंडित बन्सी बिहारी, शिक्षणातील संशोधन, नित्य नूतन प्रकाशन, पुणे.

१४.पवार शरद, लोक माझे सांगाती — राजकीय आत्मकथन, राजहंस प्रकाशन, पुणे.

१५.पवार प्रकाश, महाराष्ट्राच्या नव्या राजकारणाची पुनर्रचना, प्रतिमा प्रकाशन.

१६.पळशीकर सुहास, कुलकर्णी सुहास, महाराष्ट्रातील सत्तासंघर्ष, समकालीन प्रकाशन.

१७.बालवड रमेश, अहमदनगर जिल्हा विशेषांक, विद्याभारती प्रकाशन, लातूर.

१८.बिरमल नितीन, बोकील नीता, पवार वैशाली, अवारे अंकुश, राजकीय सिध्दान्त आणि संकल्पना, डायमंड पब्लिकेशन, पुणे.

१९.भुजबळ चंद्रकांत, लोकसभा निवडणूक मार्गदर्शक, लोकमित्र प्रकाशन, पुणे.

२०.भिंताडे वि.रा, शैक्षणिक संशोधन पध्द्ती, नित्य नूतन प्रकाशन, पुणे.

२१.भोंगळे सुधीर, राजकारण पाण्याचे, राजहंस प्रकाशन, पुणे.

२२.राठी शुभांगी दिनेश, आधुनिक राजकीय विचारप्रणाली, अथर्व पब्लिकेशन, धुळे.

२३.साधू अरूण, सहकारधुरिण, रोहण प्रकाशन, पुणे.

२४.सिरसीकर व.मं, आधुनिक महाराष्ट्राचे राजकारण, कॉन्टिनेन्टल पब्लिकेशन, पुणे.

२५.क्षीरसागर शकुंतला, प्रबंध लेखनाची पध्द्ती, युनिव्हर्सल प्रकाशन, पुणे.

## वार्षिक अहवाल

१. १६ वा वार्षिक अहवाल, श्री. ज्ञा.सह.सा.का.भेंडा १९८५—८६

२. १७वा वार्षिक अहवाल, श्री. ज्ञा.सह.सा.का.भेंडा १९८६—८७

३. १८वा वार्षिक अहवाल, श्री. ज्ञा.सह.सा.का.भेंडा १९८७—८८

४. १९वा वार्षिक अहवाल, श्री. ज्ञा.सह.सा.का.भेंडा १९८८—८९

५. २०वा वार्षिक अहवाल, श्री. ज्ञा.सह.सा.का.भेंडा १९८९—९०

६. २१ वा वार्षिक अहवाल, श्री. ज्ञा.सह.सा.का.भेंडा १९९०—९१

७. २२वा वार्षिक अहवाल, श्री. ज्ञा.सह.सा.का.भेंडा १९९१—९२

८. २३वा वार्षिक अहवाल, श्री. ज्ञा.सह.सा.का.भेंडा १९९२—९३

९. २४वा वार्षिक अहवाल, श्री. ज्ञा.सह.सा.का.भेंडा १९९३—९४

१०. ३१वा वार्षिक अहवाल, श्री. ज्ञा.सह.सा.का.भेंडा २००१—०२

११. मारूतराव घुले पाटील शिक्षण संस्था भेंडा. संक्षिप्त माहीती पुस्तिका २००१—०२

## वृत्तपत्रे

**१. दैनिक सकाळ :**

१७/०२/२००२, १७/०७/२००२, १८/०७/२००२,

**२. दै. लोकसत्ता :**

१३/०७/२००२, २०/०७/२००२,

**३. दै. केसरी :**

१७/०७/२००२,

**४. दै. सार्वमत :**

०८/०७/२००२

**५. दै. गावकरी :**

१७/०७/२००२

**साप्ताहिक :**

मार्मिक साप्ताकि, १३ मार्च २०१६